# प्रीतीची परिपूर्णता

## (पवित्र जीवनाचा पाया)




**लेखक**
डॉ. विल्यम् एम्. ग्रेटहाउस

**अनुवादक**
संतोष डोंगरदिवे
विद्यालक्ष्मी गोठोस्कर

**गीत अनुवादक**
सालोमन लुथर मानमोठे
संतोष डोंगरदिवे

जो प्रीती करीत नाही
तो देवाला ओळखीत नाही,
कारण देव प्रीती आहे.
देवाने आपल्या एकुलत्या एका पुत्राला
जगात पाठविले आहे,
ह्यासाठी की, त्याच्याव्दारे आपणास जीवन प्राप्त व्हावे.
प्रीती म्हणावी तर हीच;
आपण देवावर प्रीती केली असे नाही,
तर त्याने तुम्हाआम्हावर प्रीती केली आणि तुमच्या-आमच्या
पापांचे प्रायश्चित्त व्हावे म्हणून स्वपुत्राला पाठविले.
प्रियजन हो,
देवाने जर आपल्यावर अशा प्रकारे प्रीती केली तर
आपणही एकमेकांवर प्रीती केली पाहिजे.
देवाला कोणीही कधीही पाहिले नाही;
आपण एकमेकांवर प्रीती करीत असलो तर
देव आपल्या ठायी राहतो
आणि त्याची प्रीती आपल्या ठायी
पूर्णत्व पावली आहे.

▪▪▪

**१ ले योहान ४:८-१२**

# प्रीतीची परिपूर्णता

( पवित्र जीवनाचा पाया )


लेखक

**डॉ. विल्यम् एम्. ग्रेटहाउस**

अनुवादक

**संतोष डोंगरदिवे**

**विद्यालक्ष्मी गोठोस्कर**

गीत अनुवादक

**सालोमन लुथर मानमोठे**

**संतोष डोंगरदिवे**



दक्षिण आशिया नॅझरीन साहित्य समिती, पुणे

**LOVE MADE PERFECT**
(Translation in Marathi)

© **Copyright 2004**
By World Mission Literature (Church of the Nazarene).
All rights reserved.

Originally published in English by Nazarene Publishing House, Kansas City, MO, USA, and the permission is granted to the World Mission Literature to translate and print in Marathi.

Printed and Published in India by South Asia Nazarene Literature, a Division of World Mission Literature (Church of the Nazarene), with the permission of Beacon Hill Press of Kansas City, MO, USA.

**Address in India :**
Rev. Santosh Dongardive
P. O. Box No. 1512
Wanawadi, Pune - 411 040. (MS)
India
**Ph. :** (020) 26821288
**E-mail :** ssdongardive123@rediffmail.com

**Printed at :** Shri Mudran Mandir
914 Sadashiv Peth,
Pune - 411 030.

# प्रस्तावना

''देव प्रीती आहे'' हे तीन शब्द लहानपणापासून आम्हा सर्वांच्या परिचयाचे आहेत. या तीन शब्दांच्याद्वारे देवाचे व्यक्तिमत्त्व प्रकट होते. देवाची प्रीती येशूच्या वधस्तंभावरील बलिदानाच्याद्वारे प्रामुख्याने प्रकट झाली. याच प्रीतीमध्ये आम्ही परस्परांच्या सहभागितेत रहावे ही देवाची इच्छा. हेच आमचे पवित्र जीवन होय.

डॉ. ग्रेटहाऊस यांनी अगदी सोप्या व सरळ भाषेमध्ये ''आमचे पवित्र जीवन'' म्हणजेच 'प्रीतीची परिपूर्णता' असलेले जीवन आहे हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. आपण जर विश्वासणारे आहात, तर हे पुस्तक आपणासाठी आहे.

"Love Made Perfect" या इंग्रजी पुस्तकाचे भाषांतर करण्यासाठी विद्यालक्ष्मी गोठोस्कर यांनी भरीव मदत केली. तसेच प्रमुख गीतांचे भाषांतर अगदी सुलभ भाषेत सालोमन लुथर मानमोठे यांनी केले, त्याबद्दल या दोघांचाही मी आभारी आहे.

तर चला, आपण हे पुस्तक वाचू या.

**संतोष डोंगरदिवे**

चेअरमन

दक्षिण आशिया नॅझरीन साहित्य समिती, पुणे

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| ✱ | | प्रारंभिक निवेदन | 5 |
| ✱ | | आभार प्रदर्शन | 8 |
| प्र. | 1 | परिपूर्ण प्रीतीचे अभिवचन | 9 |
| प्र. | 2 | पवित्रतेवरील शिक्षणाचा जुन्या करारातील मूलभूत पाया | 18 |
| प्र. | 3 | पूर्णतेकडे | 27 |
| प्र. | 4 | प्रीतीची आज्ञा | 36 |
| प्र. | 5 | विजयी ख्रिस्त - आपला महान तारक | 47 |
| प्र. | 6 | पावित्र्य - ख्रिस्त अंतरंगात राज्य करतो | 43 |
| प्र. | 7 | दैवी - रूपांतरित प्रतिमा | 68 |
| प्र. | 8 | पूर्ण पवित्रिकरणाकरिता प्रार्थना | 78 |
| प्र. | 9 | परिपूर्ण प्रीती | 93 |
| प्र. | 10 | खरे पवित्रिकरण | 104 |
| प्र. | 11 | पवित्र जीवन जगण्याचे रहस्य | 117 |
| प्र. | 12 | परिपूर्ण प्रीती - गौरवाची चुणूक | 126 |
| | | Notes | 137 |

# प्रारंभिक निवेदन (Foreword)

*डॉ. विल्यम ग्रेटहाऊस यांनी या पुस्तकाचे शेवटचे प्रकरण मला पाठविले त्यावेळी लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात, "हे लिहितांना मला जाणीव झाली की मी विशेष रीतीने देवाच्या जवळ आहे, तरी हे लिखाण / लेखन मानवी प्रयत्नच राहिलेला आहे असे वाटते."*

डॉ. ग्रेटहाऊस यांच्या या विचारामध्येच या पुस्तकाचे सामर्थ्य आहे. देवावरील निष्ठेसोबत असलेली सखोल विद्‌वत्ता व मानवी स्पर्श हे या पुस्तकाचे सामर्थ्य आहे. या पुस्तकामध्ये डॉ. ग्रेटहाऊस पवित्रतेबद्दल शिकवीत नाहीत, तर 'पवित्रता' शिकवितात. एखाद्या शास्त्रज्ञाने बाहेरून निरीक्षण करून लिहिणे व दुसऱ्याने आतमध्ये जाऊन-स्वतः भाग घेऊन ज्ञानाची देवाण-घेवाण, सूक्ष्म दृष्टी व चातुर्य यांचा उपयोग करून लिहिणे यांमध्ये जो फरक आहे, तोच फरक "पवित्रतेबद्दल शिकविणे" व "पवित्रता शिकविणे" यामध्ये आहे.

चर्च ऑफ द नॅझरीनच्या प्रमुखाध्यक्षाच्या पदावरून निवृत्त होतांना डॉ. ग्रेटहाऊस यांनी 'हेरल्ड ऑफ होलिनेस" (Herald of Holiness) या मासिकात जो लेख लिहिला त्यामध्ये ते म्हणतात, "माझ्यासाठी शुभवर्तमानाचा गाभा म्हणजे पवित्रतेचा संदेश होय. पापाला दूर ठेवून देवाच्या शुद्ध प्रीतीचे हृदयात असणारे राज्य हाच तो संदेश आहे. हा अनुभव म्हणजे नियमशास्त्राची आज्ञा व शुभवर्तमानाचे अभिवचन होय. पवित्रतेचा हा संदेश इतरांना सांगणे व त्याचे स्पष्टीकरण करणे यासाठी मी स्वतःला वाहून घेतले आहे.

हे पुस्तक आपणांस हेच दाखविते की, डॉ. ग्रेटहाऊस जरी प्रमुखाध्यक्षाच्या पदावरून निवृत्त झाले असले, तरी पवित्रतेचा संदेश इतरांना सांगणे व त्याचे स्पष्टीकरण करणे यापासून ते निवृत्त झालेले नाहीत. पूर्ण पवित्रिकरणाचा सिद्धांत डॉ. ग्रेटहाऊस यांनी जितक्या स्पष्टपणे, समंजस रीतीने व हवासा वाटणारा असा पुढे मांडलेला आहे, तितक्या प्रमाणात, माझ्या संस्थेमध्ये कोणत्याही पाळकाने किंवा शिक्षकाने हा सिद्धांत स्पष्ट केलेला नाही.

नॅझरीन थिऑलॉजिकल सेमिनरीमध्ये (Nazarene Theological Seminary) मी "पवित्रतेवरील उपदेश" हा विषय शिकवीत असे. प्रत्येकवेळी मी विद्यार्थ्यांना सांगत

असे की, "माझ्या आयुष्यामध्ये तीन उपदेशकांना मी ओळखतो, की ज्यांनी अगदी यशस्वी रीतीने "पवित्रतेवर उपदेश केले आहेत आणि ते म्हणजे डी एल्टन ट्रुब्लड (D. Elton Trueblood), ई. स्टॅन्ली जोन्स (E. Stanley Jones) आणि पौल. एस. रीज (Paul S. Rees). सुधारणावादी किंवा मूलतत्त्वादी, कॅथॉलिक किंवा प्रोटेस्टंट असलेल्या सर्व श्रोत्यांना त्यांनी पवित्रतेवर उपदेश केलेले आहेत. विशिष्ट पंथ व अलंकारिक वक्तृत्त्व ह्यांना टाळून त्यांनी पवित्रशास्त्राला धरून उपदेश केले म्हणूनच हे शक्य झाले. पवित्र शास्त्रालाच बोलू दिल्यामुळे त्यांनी पंथांमधील तत्त्वप्रणालींचे युद्ध जिंकले नाही, तर त्यांच्या उपदेशामुळे देवाच्या आत्म्याचा स्वीकार करण्यासाठी अंतःकरण उघडणारे लोक त्यांना मिळाले. माझ्या विद्यार्थ्यांना मी विचारीत असे, "तुम्हाला पवित्रतेवर उपदेश करणारे कोणत्या प्रकारचे उपदेशक व्हायला पाहिजे ? वादविवादामध्ये अगदी कीस पाडून जिंकणारे उपदेशक तुम्ही व्हावे असे वाटते का किंवा ज्यामुळे विश्वासणारे देवासाठी आपली अंतःकरणे उघडून ख्रिस्तासारखे होण्यासाठी आपले समर्पण करतील असा उपदेश करणारे उपदेशक व्हावे असे वाटते ?"

जर मी पुन्हा वरील प्रकारचा विषय शिकविणार असेल, तर जगातील पवित्रतेवर उपदेश करणाऱ्या शिक्षकांच्या व उपदेशकांच्या यादीत मी डॉ. ग्रेटहाऊस यांचे नांव लिहीन. डॉ. ग्रेटहाऊस हे खऱ्या अर्थाने चर्च ऑफ दी नॅझरीनचे अपत्य आहे. वर उल्लेख केलेल्या हेरल्ड ऑफ होलिनेस (Herald of Holiness) मधील लेखामध्ये सर्व नॅझरीन लोकांसाठी "ख्रिस्ती परिपूर्णता" शिकविण्याबद्दल व त्यावर उपदेश करण्यासाठी खालील चार गोष्टी सांगितलेल्या आहेत -

1) ख्रिस्ती परिपूर्णता हा असा सिद्धांत आहे की, ज्यावर आम्ही विश्वास ठेवला पाहिजे.

2) ख्रिस्ती परिपूर्णता हा असा अनुभव आहे की, ज्याचा आम्ही स्वीकार केला पाहिजे, तो अनुभव आम्ही घेतला पाहिजे.

3) ख्रिस्ती परिपूर्णता असे जीवन आहे की, जे आम्ही जगले पाहिजे.

4) ख्रिस्ती परिपूर्णता अशी शिस्त आहे की, ज्याची आम्ही अंमलबजावणी केली पाहिजे.

तुम्ही पहालच की, या पुस्तकात डॉ. ग्रेटहाऊस यांची शिकवण निश्चितपणे जॉन वेस्ले यांच्या शिकवणीप्रमाणे आहे; परंतु त्याही पुढे जाऊन असे म्हणता येईल की, या पुस्तकातील त्यांची शिकवण ही पूर्णपणे पवित्रशास्त्राला धरून आहे. डॉ. ग्रेटहाऊस पवित्र शास्त्रालाच बोलू देतात.

पवित्रशास्त्र म्हणजे आपला विश्वास व व्यावहारिक जीवन यासाठी असणारे नियमांचे पुस्तक आहे, असे समजून जे ख्रिस्ती पंथ पवित्रशास्त्राचा सन्मान करतात, त्यांच्यासाठी डॉ. ग्रेटहाऊस हे आमंत्रित पाहुणे ठरू शकतात. ख्रिस्ती पवित्रतेचा संदेश हा कोणत्याही पंथापेक्षा किंवा मिशन संस्थेच्या मर्यादेपेक्षा व वैचारिक वादविवादापेक्षा मोठा आहे, म्हणून तुम्ही कोणत्याही पंथाचे किंवा मिशन संस्थेचे असलात तरी हे पुस्तक तुमच्यासाठी आहे. खाली दिलेल्या बाबी जर तुम्हाला लागू असतील, तर हे पुस्तक तुमच्यासाठी आहे :

1) देवाबद्दल व शुद्धिकरणासाठी लागणारी कृपा याबद्दल अधिक जाणण्याची इच्छा.

2) पवित्र शास्त्रावर आधारित ''पवित्रता'' या संबंधीच्या ज्ञानाची आवड.

3) ''ख्रिस्ती पवित्रता'' हा सिद्धांत खरोखर पवित्र शास्त्रातील आहे किंवा नाही हे समजून घेण्याची इच्छा.

4) ''पवित्र आत्म्याची परिपूर्णता'' या संबंधीचा शोध घेण्याची इच्छा.

5) ''आपल्या आंतरिक पापापासून आपली कधीच सुटका होऊ शकत नाही.'' या विचारामुळे. खरे शिष्य होण्याबद्दल निर्माण होणारा घोटाळा.

6) तुमच्याजवळ असलेल्या उत्कृष्ट क्षणाच्या वेळी ख्रिस्तासारखे अधिक होण्याची तहान.

डॉ. ग्रेटहाऊस यांच्या विनंतीनुसार प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी स्वाध्याय दिलेला आहे.

आध्यात्मिक जीवनासाठी प्रकाशशलाका / मार्गदर्शन या मथळ्याखाली तीन मुद्दे मांडलेले आहेत - 1) मुख्य आधारस्तंभ, 2) आध्यात्मिक पायऱ्या व 3) उपयोगात आणावयाची साधने. यामुळे वाचकाला वाचलेले प्रकरण पुन्हा चांगल्या रीतीने समजून घेण्यासाठी मदत होईल.

**- वेस्ली डी. ट्रेसी**

संपादक, 'पवित्रतेचा संदेश'

# आभारप्रदर्शन (Acknowledgements)

हे पुस्तक माझे मित्र वेस्ले ट्रेसी यांच्याशिवाय निर्माण झाले नसते, म्हणून या पुस्तकाच्या निर्मितीचे श्रेय प्रामुख्याने त्यांच्याकडे जाते.

हेरल्ड ऑफ होलिनेस (Herald of Holiness) या मासिकाचे संपादक असतांना डॉ. ट्रेसी यांनी मला "ख्रिस्ती पवित्रता" या विषयावर अनेक लेख लिहिण्यास सांगितले आणि हेच लेख या पुस्तकाचे केंद्र आहेत. डॉ. ट्रेसी यांनी या पुस्तकातील प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी 'आध्यात्मिक जीवनासाठी प्रकाश शलाका / मार्गदर्शन' हा अभ्यासात्मक पाठ दिलेला आहे. हे पाठ बौद्धिक पातळीवरील समज आणखी वाढावी यासाठीच फक्त नाहीत, तर त्याद्वारे दर्शविलेले आध्यात्मिक सत्य हे जीवनातील अनुभवासाठी मार्गदर्शक आहे हे देखील या पाठांद्वारे दिसून येते.

माझी सून जान ग्रेटहाऊस (Jan Greathouse) हिने विश्वासूपणे संपादकीय काम केलेले आहे, म्हणून या पुस्तकाच्या शेवटच्या रचनेचे श्रेय तिच्याकडे जाते. जान हिने माझी लिहिण्याची असमाधानकारक पद्धत दूर केली असे नाही, तर मला जे सांगावयाचे होते ते अधिक स्पष्ट करण्यासाठीही मदत केली आहे. माझ्या इतर लेकरांसारखी जान देखील सत्यामध्ये चालत आहे. तसेच शोना फिशर (Shona Fisher) आणि बोनी पेरी (Bonnie Perry) यांनी हस्तलिखितांचे संपादन केल्याबद्दल आणि केली गालाघर (Kelly Gallagher) व पौल मार्टिन (Paul Martin) यांनी हे पुस्तक पूर्णत्वास नेण्यासाठी सर्वतोपरी काळजी घेतल्याबद्दल मी या सर्वांचे आभार मानतो.

सरतेशेवटी मी डेविड फेल्टर (David Felter) व त्यांची समिती यांचे आभार मानतो. कारण त्यांनी या पुस्तकाची "संस्थेचे अभ्यासाचे पुस्तक" या प्रकारामध्ये निवड केली.

**विल्यम एम. ग्रेटहाउस**
ट्रेव्हिका नाजेरिन विश्वविद्यालय
नॅर्शाव्हिले, टेनेसी

*... आणि तू आपल्या जीवनार्थ आपला देव परमेश्वर यावर जिवेभावे प्रेम करशील."*

अनुवाद - 30 : 6.

# 1

# परिपूर्ण प्रीतीचे अभिवचन

"हवी जगाला प्रीती, मधूर ती प्रीती"

आजच्या संस्कृतीला आवश्यक असलेले हे सत्य आहे. वरील ओळी एका लोकप्रिय गीताच्या आहेत आणि पुष्कळ अंशी हे सत्य आहे; परंतु लोकप्रिय गायकांनी गायिलेल्या गीतांतील प्रीतीपेक्षा महत्त्वाची प्रीती पवित्र शास्त्र आम्हांस सांगते.

देवाच्या परिपूर्ण प्रीतीने आपले अंतःकरण भरले जाऊन त्याद्वारे प्रीतीच्या विरोधात असलेल्या सर्व गोष्टी घालवून देऊन आपल्या अंतःकरणात ख्रिस्ताची निर्मिती करणे याची आपणांस भूक लागणे आवश्यक आहे.

अशा प्रकारची 'प्रीती' खरोखर आहे का ? किंवा ही बाब केवळ स्वप्नवत आहे ? शुभवृत्तामध्ये दिलेले अभिवचन हे दर्शविते की, ही 'परिपूर्ण प्रीती' आम्हाला मिळू शकते व ती आम्ही प्रदर्शित करू शकतो.

जॉन वेस्ले (1703 - 91) यांनी 'परिपूर्ण प्रीतीचे' हे सत्य पुन्हा उघडे करून दाखविले की, जे आपणांस अनेक प्रॉटेस्टंट मंडळ्यांच्या पार्श्वभूमीमध्ये आढळून येते.

'ख्रिस्ती परिपूर्णता' हा सिद्धांत अनेक प्रकारांनी समजून सांगण्यात येतो. हा असा समजण्याजोगा अनुभव आहे की, ज्यामुळे 'अंतःकरणाची शुद्धता' व 'परिपूर्ण प्रीती' दिसून येते व ख्रिस्तासारखे जीवन जगण्यास आम्हांस मार्गदर्शन करते. हा सिद्धांत आम्हांस येशूख्रिस्त व प्रेषित यांच्या काळापासून दिसून येतो आणि ईस्टर्न ऑर्थॉडॉक्स (पौर्वात्य मूलतत्त्ववाद) व रोमन कॅथॉलिक या मंडळ्यांमधूनही व्यक्त होतो.

यानंतर धर्मसुधारणेचा काळ आला; ज्यावेळी "विश्वासाद्वारे तारण होते" हे तत्त्व पुन्हा प्रकट झाले. मार्टीन लुथर (1483 - 1546) यांच्या या तत्त्वावर दिलेल्या जोरामुळे मंडळीतील पवित्रतेच्या शिकवणुकीच्या विरुद्ध बरीच मोठी प्रतिक्रिया निर्माण झाली. रोमन कॅथॉलिक मंडळीच्या पवित्रतेच्या शिकवणुकीमध्ये काही त्रुटी आहेत हे जाणून आणि विशेषतः "कर्माद्वारे तारण" या रोमन कॅथॉलिक सिद्धांताला ज्यामुळे थोडी पुष्टी मिळेल असे काहीही टाळण्याच्या उद्देशाने जे काही केले त्यामुळे "मी पवित्र आहे; म्हणून तुम्हीही पवित्र व्हा (1 पेत्र 1:16) याकडे थोडे दुर्लक्ष झाले.

आणि जॉर्ज क्रॉफ्ट सेल (Boston University) म्हणतात, "याच ठिकाणी जॉन वेस्ले पर्वतशिखरावर चढले. वेस्ले यांनी दुर्लक्षिल्या गेलेल्या पवित्रतेच्या सिद्धांताला त्याचे प्रोटेस्टंट मंडळीत उच्चस्थान प्राप्त करून दिले"[1]

## दुर्लक्षिलेला सिद्धांत

दुर्लक्षिला गेलेला पवित्रतेचा सिद्धांत म्हणजे "ख्रिस्ती परिपूर्णतेचा सिद्धांत"- ज्याद्वारे आम्हाला "परिपूर्ण प्रीती" दिसते, त्या सिद्धांताचे मूलतत्त्व स्पष्ट रीतीने समजून घेणे हे अतिशय महत्त्वाचे आहे.

**पवित्रशास्त्रातील शब्द "परिपूर्णता" म्हणजे हेतू किंवा "पूर्वनियोजित उद्देश"**

'परिपूर्णता' हा नवीन करारातील शब्द 'सततचे कार्य' दर्शवितो. इंग्रजी शब्द Perfection म्हणजेच 'परिपूर्णता' हा Perfectio या लॅटिन शब्दापासून आलेला आहे आणि त्या शब्दाचा अर्थ "परिपूर्णता" किंवा 'पापविरहित अवस्था' असा होतो. नव्या करारातील ग्रीक शब्द 'Teleis' हा मूळ शब्द 'Telos' यापासून आलेला आहे. या शब्दाचा अर्थ आहे, "हेतू" किंवा "पूर्वनियोजित उद्देश." जेव्हा एखादी वस्तू तिला बनविलेल्या उद्देशानुसार कार्य शेवटास नेते तेंव्हा त्याला 'परिपूर्ण' म्हणता येते. उदा. माझ्या हातातील पेन परिपूर्ण आहे. कारण ते दोषविरहित आहे म्हणून नाही, तर त्या द्वारे लिहिण्याचे कार्य पूर्ण केले जाते. म्हणजेच ज्या उद्देशाने त्याला तयार केले आहे तो उद्देश त्या पेनद्वारे पूर्ण होतो. इंग्रजी शब्द Perfect (परिपूर्ण) या द्वारे जरी योग्य अर्थ ध्वनित झाला नाही, तरी जॉन वेस्ले यांनी "परिपूर्णतेचा सिद्धांत' नाकारला नाही, कारण जर त्याचा योग्य अर्थ समजला, तर हा शब्द पवित्र शास्त्राला धरून आहे हे समजून येते.

जॉन वेस्ले यांनी जे काही केले ते म्हणजे "परिपूर्णतेचा" अर्थ नवीन करारातील अर्थानुसार पुन्हा प्रतिपादन केला. नवा करार व वेस्ले यांनी सांगितलेली परिपूर्णतेची

कल्पना अॅडम क्लार्क यांनी पुढील शब्दांत स्पष्ट केली आहे.

"प्रत्येक मनुष्याने पूर्ण अंतःकरणाने, आत्म्याने, मनाने व शक्तीने आपणावर प्रीती करावी अशी देवाची इच्छा आहे. तसेच मनुष्याने जशी आपणावर, तशी आपल्या शेजाऱ्यावर प्रीती करावी ही देखील देवाची इच्छा आहे. याप्रमाणे जो मनुष्य करतो तो परिपूर्ण होय. तो ज्यासाठी निर्माण केला त्यासंबंधीची जबाबदारी तो घेतो."[2]

शेवटचे वाक्य तुमच्या स्मरणात असू द्या, की ज्यामध्ये पवित्रतेचे तत्त्व दिसते. देवाच्या आज्ञेच्या स्वरूपात 'परिपूर्ण प्रीती' ही नियमशास्त्राचे सार आहे व देवाचे अभिवचन या स्वरूपात ती शुभावृत्ताचे सार आहे.

### अभिवचन

नवीन करारामध्ये जसे नियमशास्त्र आहे ("यास्तव जसा तुमचा स्वर्गीय पिता पूर्ण आहे, तसे तुम्ही पूर्ण व्हा") (मत्तय 5 : 48) तसे जुन्या करारामध्ये शुभवर्तमान आहे. ("तुझा देव परमेश्वर तुझ्या हृदयाची व तुझ्या वंशजांच्या हृदयाची सुंता करील आणि तू आपल्या जीवनार्थ आपला देव परमेश्वर याजवर जिवेभावे प्रेम करशील") (अनुवाद 30 : 6). नियमशास्त्रामध्ये जे काही आज्ञापिले ते करण्याचे आश्वासन शुभवर्तमानात दिले आहे. जुन्या करारातील काळात सुंता म्हणजे मनुष्य देवाचा आहे हे दर्शविण्याचे बाह्य चिन्ह होते; परंतु त्याबरोबर आंतरिक चिन्ह असावे हे देवाला हवे होते. हे आंतरिक चिन्ह म्हणजे मनुष्यामध्ये झालेला आंतरिक बदल.

"अंतःकरणाची सुंता" हा शब्दप्रयोग जुन्या करारातील असला तरी त्याद्वारे आलेला संदेश म्हणजे असे अंतःकरण, की जे देवावरील प्रीतीने व शेजाऱ्यावरील प्रीतीने भरलेले आहे. देवावर प्रीती करणे तसेच जशी आपणावर तशीच आपल्या शेजाऱ्यावर प्रीती करणे या आज्ञेनुसार वागण्यासाठी कृपेची आवश्यकता आहे. विश्वासणाऱ्याला ही कृपा मिळू शकते, हाच विचार 'तारणाच्या सुवार्तेच्या' केंद्रस्थानी आहे.

जॉन वेस्ले यांनी लंडनचे बिशप एडमंड गिब्सन यांना एकदा म्हटले होते की, 'पूर्णतेचा सिद्धांत' म्हणजेच "पूर्ण प्रीतीचा सिद्धांत" होय. या विचारामध्ये कोणत्याही प्रकारची लपवणूक किंवा हातचे राखून ठेवलेले नाही. हे ऐकल्याबरोबर बिशपने म्हटले, "हे जर सत्य असेल, तर सर्व जगात प्रसिद्ध करा."[3]

ही आम्हासाठी आनंदाची बातमी आहे. देव आमचे असुंती, हेकेखोर व बंडखोर हृदय काढून मऊ व लवचिक हृदय देऊ शकतो. हेच आमच्यासाठी अभिवचन आहे.

**ख्रिस्ती - पूर्णता म्हणजे ''परिपूर्णतावाद नाही''**

'ख्रिस्ती-पूर्णता' व 'परिपूर्णता-वाद' यामधला फरक लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. हा फरक न समजल्यामुळे अनेकजण असे म्हणतात की, ''मी पूर्वीचाच ठिक होतो, परिपूर्ण होण्याचा प्रयत्न केला नसता तर ठिक होते.''

बॉन हॉफर यांनी या अनुभवाला चुकीने म्हटले होते. ''स्वस्त कृपा'' किंवा ''तान्हुल्याला अंघोळीच्या पाण्यासह बाहेर फेकणे'' असे म्हटले होते.

आम्ही लक्षात घेऊ या की, ''ख्रिस्ती-पूर्णतेचा'' अनुभव म्हणजे ''दुसरा प्रयत्न'' नव्हे, तर ''दुसरा विसावा'' होय. विश्वासणाऱ्याला पवित्र आत्म्याने भरण्याचा अनुभव येतो, म्हणजे तो देवाला संतुष्ट करण्यासाठी सर्वच गोष्टी तंतोतंत करतो असे नाही. अशा निवासणाऱ्याला त्याचे आयुष्य म्हणजे ''निरंतरचा शब्बाथ'' आहे, की ज्यामध्ये तो देवाची सदैव स्तुती व भक्ती करतो. म्हणून ''ख्रिस्ती-पूर्णता'' म्हणजे 'परिपूर्णतावाद नाही, तो शाब्बाथाचा विसावा आहे.' ''यास्तव देवाच्या लोकांसाठी शाब्बाथाचा विसावा राहिला आहे. जो कोणी त्याच्या विसाव्यात आला आहे त्याने जसा देवाने आपली कृत्ये संपवून विसावा घेतला तसा आपलीही कृत्ये संपवून विसावा घेतला आहे.'' (इब्री 4: 9, 10)

**धन्य ती शांतता, पवित्र शांतता**
**हृदयी माझ्या खात्री असता,**
**वादळी समुद्र येशू बोलतो,**
**सुसाट वारा शांत होतो.**

**- मेनी पेन फर्ग्युसन**

**प्रीतीचे सतत होणारे प्रकटीकरण / निरंतर - प्रीती**

''निरंतर प्रीती ही आमच्या आत्म्याची एक अवस्था आहे. यालाच पवित्र वचनात ''पवित्रता'' म्हटले आहे.'' ही ''निरंतर-प्रीती'' आहे; परंतु या अवस्थेत मनुष्य आपल्या वागण्यात परिपूर्ण आहे असे नाही. म्हणूनच येशूने शिकविलेल्या प्रार्थनेमध्ये 'क्षमा करणे' हा विचार आलेला आहे.

आदमाचे पुत्र व कन्या या दृष्टीने आमची अवस्था म्हणजे ''स्व-प्रीती'' असणारी आहे. लुथर[4] च्या म्हणण्यानुसार आम्ही स्वतःभोवती गुरफटलेले आहोत. आम्ही मानसिक अवस्थेत जन्मलेले आहोत व आमची वाढ 'स्व-केंद्रित' अशी होते. प्रत्येकजण स्वतःला विश्वाच्या केंद्रस्थानी समजतो. ही अवस्था म्हणजेच स्वतःला देवासमान समजणे.

हे हृदय म्हणजे "पाषाण हृदय" होय; परंतु देवाने आम्हाला अभिवचन दिले आहे की "मी तुम्हांस नवे हृदय देईन, तुमच्याठायी नवा आत्मा घालीन, ........... मी तुमच्या ठायी माझा आत्मा घालीन आणि तुम्ही माझ्या नियमांनी चालाल. माझे निर्णय पाळून त्याप्रमाणे आचरण कराल असे मी करीन." (यहेज्केल - 36 : 26, 27)

**मी म्हणतो, होय प्रभू होय,**

**मार्ग तुझा, इच्छा तुजी,**

**विश्वास माझा, आज्ञा तुझी,**

**पवित्र आत्मा बोलतो मजशी,**

**हृदय पूर्ण देवोनी तुजशी,**

**मी म्हणतो, होय प्रभू होय.**

**परिपूर्ण प्रीती म्हणजे "पापविरहित असणे" असे नाही.**

प्रीतीचा 'परिपूर्ण नियम' (1 करिंथ 13 आणि डोंगरावरील प्रवचन) आणि 'परिपूर्ण प्रीती' (देवावरील व मानवजातीवरील शुद्ध प्रीती) यातील फरक जॉन वेस्लेच्या शिक्षणात दिसून येतो. जे 'परिपूर्ण प्रीती' करतात ते देखील "देवाच्या गौरवाला अंतरलेले आहेत. ते ख्रिस्त येशूने खंडणी भरून प्राप्त केलेल्या मुक्तीच्याद्वारे देवाच्या कृपेने मोबदल्यावाचून नितिमान ठरतात" - .......... "मनुष्य नियमशास्त्रातील कर्मावाचून विश्वासाने नीतिमान ठरतो......." (रोम 3 : 23, 24, 28)

जॉन वेस्ले म्हणतात, "पाप म्हणजे 'प्रीतीच्या नियमाचे उल्लंघन' होय. याशिवाय दुसरे काही नाही."[5]

त्यानंतर 1 करिंथ 13 मध्ये सांगितलेल्या "प्रीतीच्या परिपूर्ण नियमा"बद्दल सांगितल्यावर वेस्ले म्हणतात, "जे तुम्ही सर्व प्रीती अनुभवता ते तुम्ही आपली तुलना "प्रीतीच्या परिपूर्ण नियमा"बरोबर करा (1 करिंथ 13). एका पारड्यात तुम्ही व दुसऱ्या पारड्यात 'प्रीतीचा परिपूर्ण नियम' ठेवा व तुम्ही कोठे उणे आहात का ते पहा"[6]

**वेस्लेचा विश्वास होता की पाप म्हणजे प्रीतीच्या नियमाचे केलेले उल्लंघन होय आणखी काही नाही.**

जे कोणी परिपूर्ण प्रीतीचा आनंद उपभोगतात ते सर्वजण 'प्रीतीचा परिपूर्ण नियम' पाळत नाहीत. वेस्ले म्हणतात, "पापविरहित परिपूर्णता" हा शब्दप्रयोग मी वापरत

नाही.''[7] 'ख्रिस्ती पूर्णता' म्हणजे पापाच्या अधिपत्याखालून झाले. सुटका व त्यानंतर पापाच्या मुळापासून झालेली मुक्ती होय; परंतु ही अवस्था म्हणजे ''पापविरहित अवस्था नाही''[8] हा 'परिपूर्ण मनुष्य' देखील 'प्रीतीचा परिपूर्ण नियम' पूर्ण करू शकत नाही व म्हणून त्याला देखील 'प्रायश्चित्ता'ची आवश्यकता असते. म्हणून चार्ल्स वेस्ले म्हणतात, ''माझ्या जीवनाच्या प्रत्येक क्षणी हे देवा, मला तुझ्या वधस्तंभावरील बलिदानाची मदत हवी आहे.''[9]

एका शब्दप्रयोगात सांगावयाचे झाल्यास असे म्हणता येईल, ''ख्रिस्ती परिपूर्णता'' म्हणजे 'ख्रिस्त केंद्रितपणा' होय.

"A Plain Account of Christian Perfection" या पुस्तकात जॉन वेस्ले लिहितात, ''अगदी परमपवित्र मनुष्याला देखील ख्रिस्ताची आवश्यकता आहे. प्रत्येक क्षणी ख्रिस्त आपल्या लोकांना प्रकाश पुरवीत असतो. ज्या क्षणी तो प्रकाश बंद होईल त्या क्षणी सर्वत्र अंधार होईल........ देव आपल्या लोकांना 'पवित्रतेचा' एकच साठा देत नाही. जर त्यांना प्रत्येक क्षणी 'पवित्रतेचा' पुरवठा होणार नाही, तर त्या ठिकाणी फक्त अपवित्रता / अंधारच राहील. देवाच्या लोकांना अजुनही असा ख्रिस्त हवा आहे, की जो त्यांच्यासाठी अजूनही प्रायश्चित्त करीत आहे.''[10]

म्हणून आमची प्रार्थना अशी असली पाहिजे की, ''हे देवा तूच माझा प्रकाश, माझी पवित्रता व माझे स्वर्गीय स्थान आहेस. तुझ्याशी एकरूप झाल्यानेच माझ्यामध्ये पूर्ण प्रकाश, पावित्र्य व आनंद आहे; परंतु जर मी फक्त 'मी'च आहे, तर पाप, काळोख व नरक या शिवाय माझ्याजवळ काहीच नाही''[11]

ही आमची प्रार्थना असेल, तर लीलीया एन मॉरीस यांच्यासोबत आम्ही म्हणू शकतो.

**पवित्रतेस्तव पाचारण**

**पवित्रतेस्तव पाचारण मज, ज्या प्रभूने केले**
**धन्य प्रिय ते नाव, कृपेने सर्व साध्य झाले !**
**नीतीमत्वाने नव्हे आमुच्या, खिस्ताने केले**
**विश्वासाप्रत नेणारे हे रहस्य उलगडले**
**अंतर्यामी सत्ता त्याची, त्याने घडविले**
**पापापासून मुक्त करोनी जीवनदान दिले**
**ठायी राहातो माझ्या, मी त्या ठायी जगतो**
**पापे पळवून अंतरी माझ्या, तोच राज्य करतो**

**– लेलीया एन मॉरीस**

आणि चला, जे. केनेथ ग्रायडरसोबत आम्ही खालील गीतही म्हणून या.

**प्रेमज्योती**

**पावित्र्य आणि प्रीतीची तू ज्योत तेवती**
**अंतरी माझ्या दिव्य तेज प्रभूची वसती**
**तरी प्रभू हे मागणे विनम्र कर मती**
**तू होता, जैसा आहे तैसा, घडव दे गती**

**पवित्र ते जिणे, आता सहर्ष नांदतो**
**प्रकाश तू हरक्षणी, तू मार्ग दावतो**
**निर्भेळ शांती दाटली, अनाम सौख्यता**
**मार्गावरी प्रकाश तू, तू माझा सोबती**

**जिवात जीव तोवरी तुलाच स्तवणार**
**तुझा म्हणून सर्वदा देवेत राहणार**
**तुझ्यासवे अनंतकाळ, अपार हर्षणार**
**ठायी तुझ्या मी सर्वदा, राहीन तव हाती**

**— जे. केनेथ ग्रिडर**

**आध्यात्मिक जीवनासाठी प्रकाशशलाका / मार्गदर्शन**

**मुख्य आधारस्तंभ :**

1. अनुवाद 30 : 6 मध्ये दिलेले अभिवचन आणि मत्तय 5 : 48 मधील आज्ञा.
2. 'स्वप्रीती' ही आमची दुर्बलता आहे. ही दुर्बलता घालवून टाकणे ही देवाची इच्छा आहे.
3. सर्वोत्तम, पवित्र ख्रिस्ती व्यक्तीलाही प्रत्येक क्षणी ख्रिस्ताच्या प्रायश्चित्ताची आवश्यकता आहे.

हा अध्याय / प्रकरण 1 पुन्हा वाचा व वरील आधारस्तंभाचा अभ्यास करा. तुमच्या शब्दांमध्ये वरील आधारस्तंभाचा अर्थ लिहा. असे समजा की, त्यांचा अर्थ तुम्हाला 12 वर्षांच्या एका मुलाला सांगावयाचा आहे. तुम्ही त्याला अर्थ सांगितल्यानंतर त्याच्या शब्दांत त्यांचा अर्थ सांगायला लावा.

**आध्यात्मिक पायऱ्या -**

1. प्रकरण 1 वाचल्यानंतर तुम्हाला कसे वाटले ?
   a) आश्चर्य
   b) मोकळे
   c) फसवणूक झालेले
   d) दोषी
   e) उत्तेजन मिळालेले
   f) अन्य
2. या प्रकरणात एक जीवन बदलवून टाकणारा विचार आहे तो म्हणजे ..........................................................................................
3. पवित्रतेचे तत्त्व म्हणजे 'देवाने आम्हाला ज्यासाठी निर्माण केले तेथे पोहोचणे......." या तत्त्वानुसार तुम्ही वागत आहात काय ?
   वरील प्रश्न तुम्हाला देवाची स्तुती करायला लावतो काय ?
4. डॉ. ग्रेटहाउस यांनी 'परिपूर्णता' या विचाराचे स्पष्टीकरण करण्यासाठी "पेन"चे उदाहरण दिले आहे.
   तुम्ही आणखी एखादे उदाहरण देऊ शकाल काय ?
5. तुम्ही तुमच्या जीवनाची हकीकत लिहा. ही हकीकत व देवाची तुमच्या जीवनासंबंधीची इच्छा सारखीच / एकच आहे काय ?

**उपयोगात आणावयाची साधने -**

1. ह्या प्रकरणात जी गीते दिलेली आहेत, ती तुमच्या वैयक्तिक प्रार्थनेमध्ये उपयोगात आणा. त्यावर मनन करा.
2. या प्रकरणात कोणत्या बाबी तुमच्या कुटुंबामध्ये किंवा तुमच्या शेजाऱ्यांना किंवा मित्रांना तुम्ही सांगू इच्छिता ?
3. मूळ पापामुळे उद्भवलेला आजार म्हणजे 'स्व-प्रीती' होय. तुमच्या अंतःकरणाचे परीक्षण करा.
4. खालील गीतानुसार तुमची प्रार्थना असू द्या.

## परिपूर्ण प्रेमास्तव प्रार्थना

सर्व समर्था तुला विनवितो
अनुसरू दे मज तुझी पाऊले

आमुची हृदये तू पारखितो
विचार इच्छा सहज जाणतो
तुजपासून रे कांही न दडले
कारण आम्हा तूंच घडविले ! अनुसरू दे मज तुझी पाऊले

विचार जळमट हृदयांतरिचे
भस्म करी त्या तू कायमचे
बल दे त्यास्तव तव आत्म्याचे
सर्व समर्पण तुलाच केले ! अनुसरू दे मज तुझी पाउले

विशुद्ध प्रीती करण्या तुजवर
करण्या गौरव तुझेच प्रभुवर
बुद्धी बल दे, हे सर्वेश्वर
'आमेन', देवा तुज विनविले । अनुसरू दे मज तुझी पाउले [12]

*"... पवित्र ! पवित्र ! पवित्र ! सेनाधीश परमेश्वर ।*
*अखिल पृथ्वीची समृद्धी त्याचे वैभव होय"*
- यशया 6 : 3

# 2

# पवित्रतेवरील शिक्षणाचा जुन्या करारातील मूलभूत पाया

वर्तमान काळातील पुष्कळ ख्रिस्ती लोकांना जुना करार हा प्राचीन व दूरचा वाटतो. म्हणून जुन्या करारासंबंधीच्या आपल्या अज्ञानाकडे पुष्कळजण दुर्लक्ष करतात. नव्या करारामुळे जुना करार कालबाह्य झालेला आहे असे पुष्कळांना वाटते व हा विचार ग्राह्य धरून ते स्वतःला खरे ख्रिस्ती म्हणवितात.

परंतू सत्य हे आहे की, जुन्या कराराच्या ज्ञानाशिवाय नवीन करार खऱ्या अर्थाने आम्हाला समजू शकत नाही. कारण नवीन कराराचे मूळ हे जुन्या करारांत आहे. संत ऑगस्टीन म्हणतात, "नवीन करार हा जुन्या करारात दडलेला आहे आणि जुना करार हा नवीन कराराद्वारे स्पष्ट झालेला आहे." ही बाब पवित्रतेच्या सिद्धांताबाबत सत्य आहे. आपण असे म्हणू शकतो की, नव्या करारातील पवित्रतेचा सिद्धांत जुन्या करारातील शिकवणीचे उमललेले फूल आहे.

### 'पवित्रता' या शब्दाचा अर्थ

'पवित्रता' या शब्दाचा अर्थ शोधण्यासाठी आपण शब्दकोश शोधण्याची गरज नाही; परंतू इब्री भाषेतील "quodes" (कोदेश) या शब्दाचा अर्थ आपण पाहू. नॉर्मन एच स्वेथ (Norman H Swaith) म्हणतात, "दैवी अर्थ असलेला हा फार मोलाचा

शब्द आहे. देव काय आहे हे या शब्दावरून आपणांस प्रामुख्याने कळते. दुसऱ्या कोणत्याही शब्दाचा यापेक्षा जास्त अर्थ कळू शकत नाही.''[1]

या शब्दाचा ('कोदेश') अर्थ शोधल्यास असे दिसते की, तीन अर्थ परस्परांमध्ये गुंतलेले आहेत. 'वेगळे होणे', 'वैभव' व 'शुद्धता' या तीन शब्दांनी 'कोदेश' (quodes) या शब्दांचा अर्थ स्पष्ट होतो.

## देवाचे वेगळेपण

जुन्या करारामध्ये ८३० वेळा quodes (कोदेश) किंवा त्यापासून उत्पन्न झालेल्या शब्दांचा मूळ अर्थ ''वेगळेपण'' हा आहे. फक्त देवामध्येच हे ''वेगळेपण'' (quodes) आहे. मनुष्य किंवा वस्तू यामधील वेगळेपण हे नेहमी देवाशी संबंधित आहे.

'पवित्रता' हा अनेक दैवी गुणधर्मांपैकी एक गुणधर्म आहे असेच नाही किंवा तो सर्वांत महत्त्वाचा व मुख्य गुणधर्म आहे असे नाही, तर पवित्रता हा दैवी स्वभाव आहे.

जेव्हा आमोस म्हणतो, 'प्रभू परमेश्वराने आपल्या पवित्रतेची शपथ वाहून म्हटले,.....'' (आमोस 4 : 2) व प्रभू परमेश्वराने स्वतःची शपथ वाहिली.....'' (अमोस 6 : 8) तेव्हा या दोन्ही वचनांमध्ये तो एकच गोष्ट सांगतो. ''देवाचे पावित्र्य'' म्हणजेच ''स्वतः देव.'' देव पवित्र (quodes) म्हणजे इतर सर्व गोष्टींपासून वेगळा असा देव आहे. ज्या ज्या वेळी देवाने स्वतःला प्रकट केले त्या त्या वेळी हे प्रकटीकरण त्याच्या ''वेगळेपणामधूनच'' आलेले आहे.

म्हणून पहिली महत्त्वाची गोष्ट आम्ही लक्षात घेतली पाहिजे आणि ती म्हणजे देव व मानव यातील अतिमहत्त्वाचा फरक. देव म्हणतो, ''मी देव आहे, मनुष्य नव्हे, तुजमध्ये असणारा पवित्र प्रभू तो मी आहे...'' (होशेय 11 : 9)

देव व मानव यामधले हे वेगळेपण नाहीसे करणे किंवा त्याचे महत्त्व नाहीसे करणे म्हणजेच पाप आहे. सैतानाने मानवी इतिहासाच्या सुरुवातीलाच देव व मानव यातील फरक किंवा देवाचे वेगळेपण नाहीसे करण्याचा प्रयत्न केला व मनुष्य देवासारखा होऊ शकतो हे आदाम व हवा यांच्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न केला. सैतानाने अदाम व हवा यांना सांगितले की, जर ते देवावर अवलंबून राहणार नाहीत, म्हणजेच स्वतःचे स्वातंत्र्य घोषित करतील तर ते देवासारखे होतील व चांगले आणि वाईट समजू शकतील. (उत्पत्ती 3 : 5).

मी सार्वभौम आहे असे म्हणणे हेच मानवजातीचे पाप अजूनही आहे. देव व मनुष्य यामध्ये फरक नाही असे म्हणणे हेच सर्व पापाचे मूळ आहे. खरे पाहिले असता 'देव हाच देव' आहे.

पवित्रतेसंबंधी पहिले वाक्य म्हणजे, "मीच परमेश्वर आहे, माझ्याशिवाय कोणी त्राता नाही (यशय 43 : 11). देव हाच देव आहे. त्याची निर्मिती ही निर्मिती आहे. देवाचे वेगळेपण हाच मानव व देव यातील फरक आहे. स्नेथ (Snaith)म्हणतात, "देव हा वेगळा व वैशिष्ट्यपूर्ण आहे, कारण तो देव आहे. एखादी व्यक्ती किंवा वस्तू वेगळी होऊ शकते ती देवाची झाली असेल तर."[3]

"पवित्रता म्हणजे सर्व पापापासून वेगळे होणे, त्याचप्रमाणे 'पवित्रता' म्हणजे ते देवासाठी वेगळे होणे."[4]

देव जसा पवित्र आहे तसा मी पवित्र व्हावे अशी आपली इच्छा आहे काय ? तसे असेल, तर आमची भक्ती व निष्ठा यावर देवाचाच अधिकार असू द्या.[5]

**हृदयात माझ्या काही नसावे**
**शुद्ध प्रेम तुझे त्यात असावे !**
**प्रेम तुझे माझ्यात खरे,**
**संपत्ती, आनंद प्रेमयुक्त भरे ।**
**हृदयात माझ्या प्रेमाग्नी सवे**
**विचार, शब्द, कृती प्रेमयुक्त असे ।**

**देवाचे वेगळेपण, "पवित्रतेमधील गौरव / वैभव**

'quodesh' या शब्दाचा मूळ अर्थ "वेगळेपण" असला तरी पुष्कळवेळा तो शब्द 'Kabod' म्हणजे गौरव /वैभव या अर्थानेही वापरलेला आहे. देवाचे वेगळेपण हे त्याच्या तेजस्वी वैभवी, शोभेमध्ये दिसते आणि म्हणून मोशेबरोबर आम्ही देखील म्हणू / गाऊ शकतो", हे परमेश्वरा, देवांमध्ये तुझ्यासारखा कोण आहे ? पावित्र्यामुळे वैभवी,...... असा जो तू त्या तुझ्यासारखा कोण आहे ? (निर्गम 15 : 11).

पुष्कळ वचनांमध्ये देवाचे पावित्र्य त्याच्या 'वैभवा'मध्ये दिसून येते. जळत्या झुडपाजवळ मोशेला सांगण्यात आले की, तो 'पवित्र भूमीवर उभा आहे.' (निर्गम 3 : 5). सिनाय पर्वतावर 'अग्नीच्या तेजस्वितेमधे' देवाचे पावित्र्य दिसून येते. (निर्गम 19 : 23 - 24).

निवासमंडपासंबंधी देव म्हणतो की, "या स्थळी मी इस्राएल लोकांस भेट देईन आणि माझ्या तेजाने ते पवित्र होईल" (निर्गम 29 - 43). जेव्हा निवासमंडप बांधून पूर्ण झाला, तेव्हा असे म्हटले आहे की, "मग दर्शनमंडपावर मेघाने छाया केली व निवासमंडप परमेश्वराच्या तेजाने भरून गेला.(निर्गम 40 : 34) तसेच जेव्हा यरुशलेममध्ये देवाचे मंदिर बांधण्यात आले तेव्हा असे लिहिले आहे की, "......... कारण परमेश्वराच्या तेजाने मंदिर भरून गेले." (1 राजे 8 : 11) हे देवाचे तेज, त्याचे वैभव,

पावित्र्य प्रगट करते. वर्तमानकाळातही हे सत्य आहे. म्हणून पी. एफ. ब्रीझी आपल्या नुकत्याच तयार झालेल्या मंडळींकडे पाहून म्हणायचे, "देवाचे गौरव / वैभव भूतलावर आले आहे."

पवित्र देवाचे 'वैभव' देवाचा आंतरिक स्वभाव दर्शवितो असे[7] जॉर्ज अलन टर्नर म्हणतात, "जेव्हा 'पूर्णपणे वेगळा असलेला देव' माझे व्यक्तित्व पूर्ण भरून टाकतो, तेव्हा माझा आत्मा वैभवाने भरून जातो." (जे. एम. हॅरिस). देवाचे ज्वलंत वैभव माझ्या अंतःकरणात व जीवनात येते तेव्हा मी देवाचे मंदिर बनतो, माझे अंतकरणात परमपवित्र स्थान बनते की, ज्या ठिकाणी देवाचे गौरव वास करण्यासाठी उतरते.

## देवाचे वेगळेपण म्हणजे तेजस्वी / झगमगणारी शुद्धता

Quodesh या शब्दामध्ये देवाची "तेजस्वी शुद्धता" याचाही अंतर्भाव आहे. वेगळेपण, वैभव व शुद्धता या द्वारे दैवीस्वभाव दिसून येतो.

यशयाच्या पुस्तकाच्या 6व्या अध्यायामध्ये या सत्याचे पूर्ण प्रगटीकरण होते, ज्यामध्ये यशयाचा दृष्टांत लिहिलेला आहे. 'उज्जीया राजा मरण पावला त्यावर्षी प्रभूस उच्चस्थळी असलेल्या उच्च सिंहासनावर बसलेले मी पाहिले; त्याच्या झग्याच्या सोग्यांनी मंदिर व्यापून गेले होते." (यशया 6 : 1). हे असे देवाचे चित्र आहे की, ज्यामध्ये तो अति उच्चस्थानी असलेला, इतरांपेक्षा वेगळा व सर्व निर्मितीपेक्षा उच्च असा दिसतो. या पवित्र, उच्च देवाचे वर्णन यशया पुढे असे करतो, "त्याच्या भोवती सरफीम उभे होते; त्या प्रत्येकाला सहा सहा पंखे होते, दोहोंनी तो आपले तोंड झाकी (कदाचित पवित्र्य, तेजस्वीता पाहू नये म्हणून) दोहोंनी आपले पाय झाकी व दोहोंनी उडे. ते आळीपाळीने उच्चस्वराने म्हणत, पवित्र ! पवित्र ! पवित्र ! सेनाधीश परमेश्वर ! अखिल पृथ्वीची समृद्धी त्याचे वैभव होय.[8] (यशया 6 : 2 - 3)

**स्वतःची ( निचावस्था ) हीनपण व पापी अवस्था पाहून यशया दबून जातो. आमची देखील हीच अवस्था होईल.**

जरी देव "वेगळा" आहे तरी तो एकदमच खूप वेगळा आहे असे नाही. अतिउच्च देव त्याच्या निर्मितीला वैभवाने मंडित करतो. तो आपल्यापासून दूर, वेगळा असला तरी तो आमच्याजवळ देखील आहे, म्हणून विलियम ब्लेक (William Blake) म्हणतात, "रानटी फुलामध्ये देखील स्वर्ग दिसतो." सर्वप्रकारचे लहान-मोठे प्राणी, प्रत्येक दरी व डोंगर, प्रत्येक मनुष्य-तो कोणत्याही जातीचा, संस्कृतीचा किंवा वर्णाचा असो, हे सर्व

देवाचे वैभव प्रदर्शित करतात आणि विशेष म्हणजे पवित्र आत्म्याने भरलेले प्रत्येक अंतःकरण, की जे देवाची स्तुती करते. ते देवाच्या वैभवाने भरले जाते.

घोषणा करण्याच्या वाणीने उंबरठे हालले व मंदिर धुराने भरले, तेव्हा यशया म्हणतो, "हाय हाय ! माझे आता वाईट झाले, का ? तर मी अशुद्ध ओठांचा मनुष्य आहे आणि मी अशुद्ध ओठांच्या मनुष्यांत राहतो आणि सेवाधीश परमेश्वर, राजाधिराज ह्यास मी आपल्या डोळ्यांनी पाहिले" (यशया 6 : 4 - 5). स्वतःची निचावस्था व पापी अवस्था पाहून यशया दबून जातो. आमची देखील हीच अवस्था होईल.

अशा प्रकारचा दृष्टांत आम्हालाही आजच्या युगात हवा आहे. आपल्याच शेजारी राहणाऱ्या मनुष्याबरोबर आम्ही इतर बाबतीत बरेच बोलत असतो, तेही तात्पुरते. आमच्या या परिस्थितीमुळे देवाच्या वरील प्रकारच्या अचंबित करणाऱ्या दृष्टांतापासून आम्ही वंचित असतो. आमच्या मंडळ्यांमध्ये आम्ही परस्परांच्या संगतीत खूप आनंद व्यक्त करतो; परंतु पुष्कळदा पवित्र आत्म्याने प्रेरित होऊन भक्ती करीत नाही व त्यामुळेच यशयासारखा "पवित्र ! पवित्र ! पवित्र ! सेनाधीश परमेश्वर" याचा दृष्टांत आम्हांस होत नाही.

पुढे यशया म्हणतो, "एक सराफदूत वेदीवरील इंगळ चिमट्याने हाती घेऊन मजकडे उडत आला. तो माझ्या ओठास लावून त्याने म्हटले, "पाहा, याचा स्पर्श तुझ्या ओठास झाला म्हणून तुझा दोष दूर झाला आहे, तुझ्या पापाचे प्रायश्चित झाले आहे." (6 : 6 - 7)

देवाचे 'पावित्र्य' एकाच जागी राहणारी वस्तू नाही. पवित्र देव हा जिवंत, कृती करणारा, सार्वभौम राजा असून तो आम्हाला पवित्र करण्यासाठी सदैव आमच्याबरोबर असतो; परंतू ही बाब त्याच वेळेस शक्य आहे, ज्यावेळी आम्ही पापे कबूल करून, समर्पित अंतःकरणाने त्यावर विश्वास ठेऊन भक्ती करतो." योहान म्हणतो, "जर आपण स्वतःची पापे पदरी घेतो, तर तो विश्वासू व न्यायी आहे, म्हणून आपल्या पापांची क्षमा करील व आपल्याला सर्व अधर्मापासून शुद्ध करील." (1 योहान 1 : 9)

शेवटी यशया म्हणतो, "तेव्हा मी प्रभूची वाणी ऐकली ती अशी, "मी कोणाला पाठवू ? आमच्यासाठी कोण जाईल ?" तेव्हा मी म्हणालो, "हा मी आहे, मला पाठीव." (यशया 6 : 8)

यशयाच्या या मंदिरातील अनुभवामध्ये आम्हाला पन्नासाव्या दिवसाचा पवित्र आत्म्याचा वर्षाव दिसतो. जुन्या करारात मोशे, यशया आणि इतर काही निवडक लोकांचा देवाच्या सान्निध्यातील अनुभव हा आमच्यासाठी देखील आहे हे नवीन करारात आम्हास दिसते. "परंतु आपल्या मुखावर आच्छादन नसून आपण सर्वजण आरशाप्रमाणे प्रभूच्या वैभवाचे

प्रतिबिंब पाडीत आहोत आणि प्रभू जो आत्मा त्याच्याद्वारे, तेजस्वितेच्या परंपरेने, आपले रूपांतर होत असता आपण त्याच्याशी समरूप होत आहोत.'' (2 करिंथ 3 : 18)

हे सर्व आज आपणासाठी सत्य आहे.

**परिपूर्ण प्रीती**

**पेटणार अंतरी माझ्या, तो पवित्र अग्नि आता**
**अन् करील 'स्वेच्छा' होळी, डोळ्याचे पाते लवता**
**प्रज्वलित ज्वाला तेजस, फुलतील बघता बघता**
**महापर्वत डोंगर पळतील, ती आच तयाची भिडता**

**त्या पवित्र अग्निज्वाला, स्वर्गातून कोसळणार**
**अन् क्षणात माझी पापे, ती राख राख करणार**
**ये पवित्र आत्म्या ये तू, घालतो तुला मी साद**
**कर भस्मसात अघ हे, कर दुष्टाई बरबाद**

**शुद्धती - शुद्ध करणाऱ्या, ज्वालांनो अंतर भेदा**
**अन आत्मन माझे उजळून, अणुरेणूतून जीवन वरदा**
**सर्वांग शुद्धता व्हावी, माझा न मी उरावा**
**मज ठायी संतत आता, येशूच तो दिसावा**

**– चार्ल्स वेस्ले**

**स्वाध्याय**

**( आत्मिक जीवनासाठी मार्गदर्शन / प्रकाशशलाका )**

**मुख्य आधारस्तंभ**

**खालील प्रश्नांची उत्तरे द्या.**

1. जे लागू / योग्य आहे त्या सर्वांवर खुणा (Ö) करा.

   या प्रकरणानुसार देव

   - शिक्षा करणारा आहे.

- मर्त्य मानवापासून खूपच वेगळा व खूपच उच्च आहे.
- कधीही न ढळणारा पण दुसऱ्यांना हलविणारा आहे.
- ज्वलंत वैभव व तेजस्वी आहे.
- आपल्यामध्ये आहे आणि आपण देव होत आहोत.
- शेजारी राहणारा मनुष्य
- ज्वलंत शुद्धता असणारा आहे.

1. जे योग्य आहे त्या सर्वांवर खुणा (Ö) करा.

यशाया आश्चर्याने मुक-बधिर झाला. जेव्हा त्याची देवाशी भेट झाली, कारण ...

- त्याला देवाबद्दल जे शिकविले होते त्यापेक्षा त्याने जे पाहिले ते वेगळे होते.
- त्याला स्वतः हीनपणा / नीचपणा समजला.
- स्वतःचे व लोकांचे पाप यामुळे तो पिडल्यासारखा (Stricker) झाला.
- आपल्याला न आवडणारे काम देव सांगेल म्हणून तो भयभित झाला.

3. लेखकाच्या म्हणण्यानुसार देव आपले वैभव खालील गोष्टींवर ओततो.

1. सर्व निर्मिती
2. विश्वासणारे
3. जे पवित्र आत्म्याने भरलेले आहेत असे लोक.
4. वरील सर्व
5. वरील एकही नाही.

4. यशया 6व्या अध्यायानुसार आपली पापिष्ट अवस्था

a. काही काळापुरती व आशाहीन अशी आहे.

b. दैवी शुद्धतेची आवश्यकता असलेली अशी आहे.

c. अशी आहे की, ज्यामुळे आम्ही देवाजवळ जातो

d. अशी आहे, जिला शुद्धतेची / धुण्याची आवश्यकता आहे व त्यामुळे आम्ही देवाची आमच्यापरीने उत्तम सेवा करू शकतो.

तुमच्या शब्दांत मुख्य चार मुद्दे लिहा.

1.

2.

3.

4.

**आध्यात्मिक जीवनातील पायऱ्या**

1. जळत्या झुडपाद्वारे मोशेची देवाबरोबर भेट झाली, त्यावेळी मोशे "पवित्र भूमीवर" उभा होता. तुमच्या जीवनातील "पवित्र भूमिबद्दल" च्या अनुभवाचा विचार करा. या पवित्र भूमीवरील अनुभवाचे तुम्ही कसे वर्णन कराल ? वैभव, प्रकाश, ज्वलंत शुद्धता, उच्चप्रतीचा अनुभव, ज्वाला - यासारखे शब्द वापरून वर्णन करू शकाल काय ?

2. यशयाचा अनुभव खालील शब्दांत व्यक्त करता येतो -

   नम्रता, कबुली, पश्चात्ताप, समर्पण, शुद्धतेसाठी प्रबळ इच्छा, देवाची सेवा करण्याची उत्कंठा इत्यादी.

   तुमच्या जीवनातील "पवित्र भूमीबद्दल" (पवित्रतेचा) अनुभव फक्त वरीलपैकी कोणत्या शब्दांत चांगल्या रीतीने व्यक्त करू शकाल ?

3. आम्ही देवाला त्याने आम्हाला प्रकट व्हावे अशी आज्ञा येऊ शकत नाही. तो आमचा शोध करणारा व आम्हाला भेटणारा देव आहे; परंतु आम्ही सदैव आमची अंतःकरणे त्याच्यासाठी उघडी ठेवावी. अन्यथा आम्ही त्याची भेट गमावू शकतो, तुमच्या 'पवित्र भूमी'चे (देवाच्या भेटीचे) अनुभव थोडे आहेत का ? टी.व्ही.वरील कार्यक्रम, रंगभूमीवरील कार्यक्रम, नैतिक दोष किंवा तुम्ही करत असलेली अनेक कामे देवाची व तुमची भेट कमी करतात काय ? देवाच्या भेटीसाठी या आठवड्यात तुम्ही काय कराल ?

4. पूर्वीच्याकाळी निवासमंडपातील परमपवित्र स्थानात देवाचे गौरव अनुभवावयास मिळत होते. प्रायश्चित्ताच्या दिवशी फक्त मुख्य याजकच त्या ठिकाणी जाऊ शकत होता; परंतू त्याच्या पायात एक दोर बांधलेला असे. देवाचे तेजस्वी गौरव पाहून याजक जर मृत्यू पावला तर त्याला ओढून काढता यावे त्यासाठी हा दोर बांधलेला असे.

   परंतु ही बाब आम्हाला करावी लागत नाही.

**उपयोगात आणावयाची साधने -**

1. देवाचे गौरव एका व्यक्तीला एकांतामध्येच प्राप्त होते असे नाही. निर्गम 40 : 34 ; 1 राजे 8 : 11. प्रेषीत 2 यामध्ये देवाचे गौरव समूहाला / मंडळीला प्रकट झाले हे दिसून येते.

2. देवाचे गौरव तुमच्याद्वारे इतरांना कसे दिसेल ? तुमच्यामध्ये त्याचे गौरव कोणत्या स्वरूपात आहे ?

   लोक कदाचित तुम्हाला अशक्त, बेईमान, चोर, पापी, अयशस्वी, मागे घसरलेला असे म्हणतील; परंतु लक्षात घ्या, तुमच्यामध्ये देवाची प्रतिमा व त्याचे गौरव आहे. जॉन वेस्लेच्या म्हणण्यानुसार देवाच्या प्रतिमेचा अंश अजूनही प्रत्येक व्यक्तीत आहे.

   ही देवाची प्रतिमा तुम्हामध्ये आहे म्हणून त्याचे आभार मानाल काय ?

3. पहिल्या प्रकरणाच्या शेवटी दिलेली प्रार्थना आजच्या तुमच्या वैयक्तिक प्रार्थनेचा एक भाग असू द्या.

*"तू माझ्यासमोर आहेस हे मनात वागवून चाल व सात्विक राहा."*
- उत्पत्ति 17 : 1

# 3

**"तू माझ्यासमोर चाल व पूर्ण हो" ( पंडिता रमाबाई )**

**"तू माझ्यासमोर आहेस हे मनात वागवून चाल व सात्विक राहा." (Bible Society)**

# पूर्णतेकडे

## ( ख्रिस्ती पूर्णतेचा जुन्या करारातील पाया )

### कोणीही पूर्ण नाही

वरील वाक्य मोठ्याने म्हणा आणि ऐकणारे सर्वजण 'होय' अर्थाने माना डोलावतील. "आपले नैतिक अधःपतन झालेले आहे" हा विचार झुगारून देऊन वरील वाक्य ते मान्य करतात. म्हणजेच आपल्या नैतिक अधःपतनाला आपणच जबाबदार आहोत हा विचार ते स्वीकारत नाहीत.

परंतु हा विचार पवित्र शास्त्राला धरून नाही. देव आपल्या लोकांना पूर्ण होण्यासाठी पाचारण करतो असे पवित्र शास्त्र सांगते; परंतु "पूर्ण होणे" म्हणजे काय ? पवित्रशास्त्र यासंबंधी काय सांगते ?

पवित्रतेच्या शिक्षणाबरोबरच 'ख्रिस्ती पूर्णता' या विषयाचा जुन्या करारातील पाया काय आहे हे पाहणे योग्य होईल. नुकत्याच झालेल्या एका चर्च कौन्सिलमध्ये असे म्हटले आहे, "ख्रिस्ती तत्त्वप्रणालीची तत्त्वे ही मुळात यहुदीय जमिनीतून वर आलेली आहेत, ही तत्त्वे या जमिनीतून उखडल्यास त्याचा पूर्ण अर्थ समजायला कठीण जाईल."[1] 'पूर्णतेचा' अर्थ समजण्यासाठी कौन्सिलचा हा विचार बहुमोलाचा आहे.

जून्या करारातील मूळ इब्री भाषेतील एक डझनापेक्षा अधिक शब्दांचे भाषांतर 'पूर्णता' किंवा "सात्विकता" असे केले आहे. नैतिक विचारधारेतूनच या शब्दांकडे त्या काळात पाहण्यात येत होते आणि त्या दृष्टीनेच अनेकजण अब्राहामाच्या पाचारणाकडे पाहतात. "तू माझ्यासमोर चाल व पूर्ण हो !" (उत्पत्ती 17 : 1 - पंडिता रमाबाईंचे भाषांतर). इब्री दृष्टिकोनानुसार "अत्मिक पूर्णता" म्हणजे देवासमोर दोषविरहित किंवा 'सात्विक असणे' 'सरळ असणे' असा आहे.

हाच विचार- सात्विक किंवा सरळ असणे - नव्या करारातील पूर्णतेच्या शिक्षणाचा पाया आहे.

हाच विचार इस्टर्न ऑरथॉडॉक्स (Eastern Orthodox) व रोमन कॅथोलिसिझम् (Roman Catholicism) या मंडळयातील विचारवंतात दिसून येतो. तसेच प्रोटेस्टंट आणि जॉन वेस्लेच्या विचारसरणीतही तोच विचार दिसून येतो,

या विचाराचा पाया जुन्या करारात आपण पाहू या.

## पवित्रता (Holiness) आणि पूर्णता (Perfection)

'पवित्रता' आणि 'पूर्णता' हे दोन्ही शब्द कृपेच्या अनुभवाचे वर्णन करतात. हे दोन्ही शब्द जुन्या करारात कृपेच्या अनुभवाच्या दोन बाजू दाखवितात. George Turner म्हणतात. "पवित्रता" हा विचार दर्शविणारे शब्द देव व मानव यातील तफावत (फरक) दर्शवितात. तसेच ही तफावत किंवा अंतर शुद्धतेच्या कार्याद्वारे जोडले जाते हे देखील सांगतात. तसेच 'पूर्णता' हा विचार दर्शविणारे शब्द मानवाचे देवाशी असणारे नाते व देवाबरोबर शक्य असणारी सहभागिता दर्शवितात"[2]

'पूर्णता' हा विचार दर्शविणारे अनेक शब्द इब्री भाषेत - जुन्या करारात वापरलेले आहेत. त्याचे भाषांतर सात्विक, पूर्ण, प्रामाणिक, सरळ, सरळ मनाचे असे करण्यात आलेले आहे. हे व अशाप्रकारचे शब्द "पवित्र शास्त्रातील पूर्णतेच्या विचारांचे स्पष्टीकरण करतात."

## तूलनात्मक पूर्णता

पवित्र शास्त्रामध्ये "देवाची परिपूर्णता" या अर्थाचे शब्द फक्त पाच ठिकाणी वापरलेले आहेत. (अनुवाद 32 : 4 ; 2 शयूवेल 22 : 31 ; इयोब 36 : 16 ; स्तोत्र 18 : 30, 19 : 7) फक्त देवाची पूर्णता ही 'परिपूर्णता' किंवा पूर्ण पूर्णता किंवा 'अबाधित पूर्णता" आहे. मानवाची पूर्णता ही 'तूलनात्मक पूर्णता' आहे. प्रामाणिकपणे व सचोटीने देवाबरोबर चालणे यामध्ये मानवाची पूर्णता दिसून येते. हनोखच्या बाबतीत

म्हटले आहे, "हनोख देवाच्या समागमे राहत असे; देवाने त्याला नेले आणि तो दिसेनासा झाला." (उत्पत्ती 5 : 24) आणि "त्याला देवाने लोकांतरी नेले; लोकांतर होण्यापूर्वी त्याचविषयी साक्ष झाली की, तो देवाला संतोषवीत असे" हब्री 11 : 5) नोहाच्या बाबतीत म्हटले आहे, "नोहा हा आपल्या कालच्या लोकांमध्ये धार्मिक व सात्विक मनुष्य होता; नोहा देवाच्या समागमे राहत असे." (उत्पत्ति 6 : 9)

लक्षात ठेवण्यासारखे दोन मुद्दे या ठिकाणी आहेत.

1) नोहा व इतर देवाचे लोक 'देवासमोर सात्विक (पूर्ण) होते.

2) ही सात्विकता (पूर्णता) त्या काळाच्या नैतिक परिमाणाच्या तुलनेमध्ये सांगितलेली आहे. आपल्या शेजाऱ्यांच्या तुलनेत तो सरळ होता; परंतु देवाच्या सर्वपूर्ण नियमापुढे तो कमी पडत होता. (आपणही तसेच आहोत).

जॉन वेस्लेने प्रतिपादन केलेल्या पूर्णतेच्या सिद्धांताबद्दल कॉलीन विल्यम्स् म्हणतात, "देवाच्या सर्वपूर्ण नियमाशी पापाची तुलना केल्यास विश्वासणाच्या जीवनात पूर्णता असू शकत नाही; परंतु समजून उमजून 'देवापासून दूर जाणे' या पापाशी तुलना केल्यास पूर्णतेचा अर्थ समजू शकतो. ही मानवी पूर्णता म्हणजे - देवावर जाणीवपूर्वक सतत अवलंबून राहणे."[3]

## भक्तियुक्त प्रामाणिकपणा/ सात्विकपणा

"भक्तियुक्त प्रामाणिकपणा" किंवा "खरा प्रामाणिकपणा" हे शब्द मनुष्याच्या पूर्णतेचे वर्णन करण्यास योग्य ठरतील. (यहोशवा 24 : 14; 2 करिंथ 1 : 12) अर्थात एखादी व्यक्ती जाणीवपूर्वक चूक असू शकेल आणि त्यामुळे ती नरकातच जाईल; परंतु तुम्ही जाणीवपूर्वक अप्रामाणिक असल्यास देवाबरोबरची सहभागिता व ख्रिस्ताच्या रक्ताच्याद्वारे शुद्ध होण्याचा अनुभव उपभोगू शकणार नाही. देवाचे अभिवचन आम्हाला आठवण देते, "पण जसा तो प्रकाशात आहे तसे आपण जर प्रकाशात चालतो, तर आपली एकमेकांबरोबर भागी आहे; आणि त्याचा पुत्र येशू याचे रक्त आपल्याला सर्व पापापासून शुद्ध करिते." (1 यो 1 : 7)

जॉन वेस्लेच्या[4] दृष्टिकोनातून 'प्रामाणिकपणा' किंवा 'सचोटी' ही पहिली महत्त्वाची बाब होय.

1746 च्या मेथॉडिस्ट कॉन्फरन्समध्ये स्पष्टपणे विचारलेले आहे :

**प्रश्न 1 :** तुम्ही कोणाला "प्रामाणिक" म्हणाल ?

**उत्तर :** देव जसा प्रकाशात आहे तसा जो प्रकाशात चालतो तो.

**प्रश्न 2 :** 'प्रामाणिकपणा' हा सर्वात सर्व आहे ना ?

**उत्तर :** देव त्याच्यामध्ये सर्वकाही आपणास देतो.

**प्रश्न 3 :** तर मग विश्वासाच्या पातळीवर आपण 'प्रामाणिकपणाला' ठेवावे काय ?

**उत्तर :** नाही. विश्वासाच्या ठिकाणी आपण प्रामाणिकपणाला ठेऊ शकत नाही. केवळ विश्वासामुळेच ख्रिस्ताचे सर्व चांगलेपण आपणाला लागू होते; परंतु जर आपण 'प्रामाणिक' नसलो तर ते सर्व चांगलेपण आपणांस लागू होत नाही.

**"भक्तीयुक्त किंवा खरा प्रामाणिकपणा" या शब्दांद्वारेच ख्रिस्ती पूर्णता दर्शविल्या जाते.**

पौल करिंथ येथील मंडळीला म्हणतो, "आम्हाला अभिमान बाळगण्याचे कारण म्हणजे आमच्या मनाची साक्ष ही आहे, की दैहिक ज्ञानाने नव्हे, तर देवाच्या कृपेने, देवाने दिलेल्या पवित्रतेने व सात्त्विकपणाने आम्ही जगात व विशेषकरून तुम्हाबरोबर वागलो. (2 करिंथ - 1 :12)

## एक ध्येय / एक दृष्टिकोन

डोंगरावरील प्रवचनामध्ये येशू ख्रिस्ताने सूचना दिलेली आहे की, तुमची धार्मिकता ही लोकांपुढे दिसणारी नसावी, तर आपले दान, प्रार्थना व उपास देवासमोर योग्य असावा (मतय 6 : 1-18). मतय 6 : 22-23 मध्ये म्हटले आहे, ".... यास्तव तुझा डोळा निर्दोष असला, तर तुझे संपूर्ण शरीर प्रकाशमय होईल; पण तुझा डोळा सदोष असला तर तुझे संपूर्ण शरीर अंधकारमय होईल."

"निर्दोष डोळा"[5] यासाठी जो मुळात शब्द वापरलेला आहे त्याचा अर्थ म्हणजे- "जीवनातील एक ध्येय व निस्वार्थी आत्मा" असा होतो. म्हणजेच आमच्या जीवनात एकच ध्येय व निस्वार्थीपणा असेल, तर आम्ही प्रकाशमय होऊ. नव्या करारातील लोकांना हाच अर्थ समजला असेल.

जॉन वेस्ले म्हणतात, "शरीराला जसे डोळ्याचे महत्त्व आहे, तसेच आमच्या आत्म्याला एक उद्देशाचे, एक ध्येयाचे महत्त्व आहे. 'जर तुमचा डोळा (निर्दोष) म्हणजे एकाच ध्येयाने देवावर केंद्रित झाला असेल, तर तुमचे संपूर्ण शरीर पवित्रतेने व आनंदाने भरून जाईल."[6] पूर्ण ख्रिस्ती म्हणजे तोच, की जो सर्व काही देवाच्या गौरवासाठी

करतो. (1 करिंथ 10 : 31) आम्ही एका ध्येयाने प्रेरित असावे हेच आमच्या पूर्णतेचे दर्शक आहे. सोरेन किर्कगार्डने म्हटले आहे, "अंतःकरणाची शुद्धता म्हणते एकच चांगली गोष्ट करणे."[7]

### निर्दोषता आणि पूर्णता ( उत्पत्ति 17 : 1 )

"तू माझ्यासमोर आहेस हे वागवून चाल व सात्विक राहा." (बायबल सोसा.)

"तू माझ्यासमोर चाल व पूर्ण हो" (पंडिता रमाबाईंचे भाषांतर)

मूळ इब्री मधील 'tamim'[8] या शब्दाचे भाषांतर वरील भाषांतरात "सात्विक राहा" व "पूर्ण हो" असे केलेले आहे आणि ते बरोबर आहे. कारण 'tamim' या मूळ इब्री शब्दामध्ये निर्दोषता, पूर्णता व सात्विकता, हा अर्थ अभिप्रेत आहे. म्हणून या वचनामध्ये सांगितल्यानुसार देवाची इच्छा हीच होती की, अब्राहामाने देवाच्या सान्निध्यात राहून पूर्ण व्हावे. पूर्ण होणे म्हणजेच देवासमोर पूर्ण उघडे होणे.

नव्या करारात 'निर्दोषता'' हा विचारही अनेकवेळा आढळतो. 'पूर्णता' म्हणजे इतरांच्यासमोर निर्दोष असणे असे नाही तर देवासमोर सरळ, सात्विक असणे. देवाने आपल्याला ख्रिस्तामध्ये यासाठी निवडले की, "आपण प्रेमामध्ये त्याच्या दृष्टीने पवित्र व निर्दोष व्हावे." (इफिस 1 : 4). "Amomos" हा ग्रीक शब्द 'निर्दोषता' दर्शवितो. निर्दोषता,[9] अकलंकितपणा, निर्मळता, पूर्णता या अर्थाने भरलेला आहे. हाच शब्द इफीस 1 : 4 मध्ये वापरलेला आहे. देवाला यज्ञ करावयाचे कोकरू amomos [10] असावे लागत होते. म्हणतेच ते निर्दोष, कोणत्याही प्रकारचा डाग नसलेले, म्हणजेच 'पूर्ण' असे असावे लागत होते. ख्रिस्ती या नात्याने आम्ही amomos असावे म्हणजेच आमचा 'पूर्ण यज्ञ' आम्ही देवाला करावा. त्यामध्ये कोणतीही कमतरता नसावी. बार्कले (Barclay) म्हणतात,[11] "amomos म्हणजे आमचे पूर्वजीवन, काम, करमणूक, खेळ, घरातील जीवन, वैयक्तिक संबंध हे सर्व ख्रिस्ताला वाहून देणे. या शब्दाचा अर्थ असा नाही की, ख्रिस्ती व्यक्ती ही सन्यासास पात्र असावी, तर ख्रिस्ती व्यक्ती ही पूर्ण असावी. म्हणून पौल मंडळीबाबत म्हणतो, "ती पवित्र व निर्दोष असावी." (इक्की 5:28)

'पूर्णता' या विचारासाठी वापरलेला आणखी एक महत्त्वाचा शब्द म्हणजे, "सरळ मनाचे असणे"[12] (स्तोत्र 7:10; 11:2; 32:11; 36:10; 64:10; 94:15) । देव 'सखा' आहे आम्हीही सरळ असावे. आम्ही देवाला संतोषविणारे, त्याच्यासमोर सरळ असावे.[13]

## पूर्णता व विरोधाभास

इयोबाच्या पुस्तकात फक्त दुःखसहनाबद्दल सांगितलेले नाही, तर त्यात मनुष्याच्या (ईयोब) पूर्णतेबद्दलही सांगितलेले आहे. "..... तो सात्विक व सरळ होता. तो देवाला भिऊन वागे व पापापासून दूर राही." (ईयोब 1 : 1) ईयोबासाठी सात्विक व सरळ हे दोन शब्द वापरलेले आहेत.

इयोबाची 'सात्विकता' व 'सरळपणा' सैतानाला मान्य होता, तरी तो ईयोबाच्या सात्विकतेबद्दल संशय व्यक्त करतो. सैतान म्हणतो, "ईयोब ! काय देवाचे भय फुकट बाळगतो ? तो, त्याचे घर व त्याचे सर्वस्व यांभोवती तू कुंपण घातले आहे ना ? ......... तू आपला हात पुढे करून त्याच्या सर्वस्वास लावून तर पहा, म्हणजे तो तुझ्या तोंडावर तुझा अव्हेर करील." (ईयोब 1 : 9-12). यानंतर ईयोबाची अवस्था किती बिकट झाली ते आपणांस माहित आहे. त्याचे मित्र याच्या दृष्कृत्याबद्दल त्यालाच दोष देतात; परंतु ईयोब आपल्या प्रामाणिकपणाबद्दल एकसारखे सांगतच असतो. त्याच्या संकटकाळात व दुःखात त्याला असे वाटते की, देवाने त्याला सोडले तरी तो म्हणतो, "त्याच्या तोंडची आज्ञा पाळण्यास मी माघार घेतली नाही, माझ्या स्वतःच्या मनोरथापलीकडे मी त्याच्या तोंडची वचने जतन करून ठेविली आहेत." (ईयोब 23 : 12). ईयोब असेही म्हणतो, "तो मला ठार मारणार तरीही मी त्याची आस धरीन." (ईयोब 13: 15). ईयोब निश्चितच पूर्ण होता. सैतानाचा अंदाज चुकलेला होता.

परंतु जेव्हा ईयोब देवाची अत्युच्च पवित्रता पाहतो तेव्हा त्याचे ओठ बोलावयाचे थांबले व तो म्हणतो, "आत तर प्रत्यक्ष डोळ्यांनी मी तुला पाहत आहे, म्हणून मी माघार घेऊन धुळराखेत बसून पश्चात्ताप करीत आहे." (ईयोब 42 : 5).

(पंडिता रमाबाई - इयोब 42 : 5) "मी स्वतःला तुच्छ लेखतो आणि धूळ व राख यांवर बसून पश्चात्ताप करतो.)

इयोब हा मनुष्य या नात्याने पूर्ण होता, याचा शेवटचा पुरावा म्हणजे तो स्वतःच्या चुका व स्वत;तील कमीपणा स्वीकारतो.

चार्ल्स वेस्ले म्हणतात, "प्रत्येक क्षणाला, मला तुझ्याबरोबर मरणाद्वारे मिळणारा चांगुलपणा पाहिजे."

## आध्यात्मिक जीवनासाठी प्रकाशशलाका / मार्गदर्शन

मूलभूत आधारस्तंभ

### 1 ) भक्तीयुक्त ( खरा ) प्रामाणिकपणा / सात्विकपणा

अमेरिकेतील मेरीडीथ कॉलेजमध्ये आपल्या प्रारंभीच्या भाषाणात एरमा बॉम्बेक (Erma Bombeck) म्हणाल्या, "कीर्ती / प्रसिद्धी व यश यामध्ये गोंधळून जाऊ नका. मॅडोना (Madona) ह्यांना कीर्ती / प्रसिद्धी मिळाली. मदर टेरेसा यांना 'यश' मिळाले.

पौल म्हणतो, "आम्हाला अभिमान बाळगण्याचे कारण म्हणजे, आमच्या मनाची साक्ष ही आहे की, दैहिक ज्ञानाने नव्हे, तर देवाच्या कृपेने, देवाने दिलेल्या पवित्रतेने व सात्विकपणाने आम्ही जगात व विशेषकरून तुम्हाबरोबर वागलो." (2 करिंथ 1:12)

सॅम्युएल गोल्डवीन म्हणाले, "यशाचे गुपित म्हणजे प्रामाणिकपणा व सचोटी होय. एखादी बनावट गोष्ट तयार करा आणि तुम्ही जिंकलात."[14]

मॅडोना आणि मदर टेरेसा

पौल आणि सॅम्युअल गोल्डवीन

यांच्यातील फरक लक्षात घ्या. खरा प्रामाणिकपणा / सात्विकपणा व त्याच्याविरुद्ध असलेली बाब लक्षात येईल.

### 2. सचोटी व निर्दोषता -

या दोन बाबी पूर्णतेचा दुसरा पाया आहे.

जीन-जॅक्स् , रोडसो (Jean, Jackques, Rousseau) हा स्विस फ्रेंच तत्त्वज्ञ होऊन गेला. Emile या आपल्या एका प्रसिद्ध पुस्तकात त्याने लिहिले की, "मुलाला संपूर्ण समृद्ध वातावरणात-की जे भ्रष्टाचारापासून अलिप्त आहे - वाढू द्या. पालकांचे महत्त्वाचे कर्तव्य हेच आहे. Emile प्रकाशित होण्याच्या 17 वर्षांअगोदर 1761 मध्ये Rousscau याने हॉटेलमधील Theresa le vasseur नावाच्या तरुणीला आपल्या घरी ठेऊन घेतले. त्यांना एकंदर पाच लेकरे झाली व प्रत्येक लेकराला जन्म झाल्याबरोबर त्याने लहान लेकरांची व्यवस्था घेणाऱ्या संस्थेत ठेवले. 1768 साली त्याने Theresa बरोबर विवाह केला; परंतु त्या अगोदर सर्व लेकरे घराबाहेर गेलेली होती. त्याने आईवडिलांना जे तत्त्व सांगितले त्याच्या अगदी विरुद्ध त्याचे वागणे होते. सचोटी व निर्दोषता हा ख्रिस्ती पूर्णतेचा दुसरा पाया आहे.

### 3. एक ध्येय -

ख्रिस्तासाठी एक ध्येय असणे हा ख्रिस्ती पूर्णतेचा तिसरा पाया आहे. हे प्रकरण पुन्हा वाचा व एक ध्येय म्हणजे काय ते पहा. आपले निरीक्षण, वाचन व आठवणी या आधारे एक ध्येय असणे व त्याच्याविरुद्ध असलेली विचारसरणी (अनेक गोष्टींच्या मागे लागणे) यांची काही उदाहरणे दिसतात का ते शोधा.

## आध्यात्मिक जीवनाच्या पायऱ्या

अमेरिकेतील कॅलिफोर्निया राज्यांत एक निरीक्षणाद्वारे 200 अपराध्यांचा अभ्यास करण्यास आला. सर्व अपराध्यांचे म्हणणे होते की ते चांगले आहेत. आम्ही वाईट गोष्ट केली असे कोणीही मान्य केले नाही. "आम्ही विद्वानांची फसवणूक करू शकतो. क्वचितच आम्हा स्वतःला फसवू शकतो; परंतु देवाला कधीही फसवू शकत नाही."

स्तोत्र 139 : 23 - 24 वाचा आणि देवाला प्रार्थना करा की, आम्हाला सात्विकपणा, सचोटी व एक शुद्ध ध्येय यांचा अनुभव येऊ दे"

## उपयोगात आणावयाची साधने

1. पूर्ण प्रीतीसाठी प्रार्थना करा आणि आपले भोजन करीत असतांना ही प्रार्थना करण्याची आठवण ठेवा. मग तुम्ही एकटे असा किंवा इतरांबरोबर असा.
2. या आठवड्यातील प्रत्येक दिवशी खालील गीत वाचा अगर गा.

### दिव्य गौरवी आशा

**पाचारणात तुझिया ती दिव्य गौरवी आशा**
**पावित्र्यपूर्ण मी व्हावे, तू अपेक्षितो जगदीशा**

**त्यासाठीच येशू देवा, मी दृष्टि वरी लावतो**
**स्पर्शास्तव तुझिया आता, मी तीव्र प्रतीक्षा करतो**

**तुजद्वारे जीवन, शक्ती, तुजद्वारे आहे शुद्धी**
**मी दुर्बल नश्वर देवा, ये बहाल कर मज बुद्धी**

बल विश्वासाचे दे रे, हे घालविण्याला पाप
शुद्धती - शुद्ध मन दे, तू मित्र सखा तू बाप

अपार कृपेचा देवा, तू अथांग करुणासागर
विनामूल्य कृपा तू दिधली, तू प्रेमाचे आगार

महापापी जरी मी आहे, तू क्षमा मला करणार
तरतुद कृपेची तुझिया, भवपार मला नेणार

वचनानुसार तुझिया, हे सर्व घडोनी यावे
पातकांपासुनी साऱ्या, मी बंधमुक्त रे व्हावे

तू ये रे अंतरी देवा, हे दार खुले मी केले
वसतीस त्वरेने ये तू, हे डोळे माझे ओले !

— चार्ल्स वेस्ले

*"तू आपला देव परमेश्वर याजवर*
*पूर्ण अंतःकरणाने, पूर्ण जिवाने व पूर्ण मनाने प्रीती कर*
*हीच मोठी व पहिली आज्ञा आहे."*

(मत्तय 22 : 37, 38)

# 4

# प्रीतीची आज्ञा

**जर तुम्हाला नामधारी नाही तर खरे ख्रिस्ती व्हावयाचे असेल, तर "प्रीतीची आज्ञा" समजून घेणे अतिशय महत्त्वाचे ठरते.**

"तू आपला देव परमेश्वर याजवर पूर्ण अंतःकरणाने, पूर्ण जिवाने व पूर्ण मनाने प्रीती कर; हीच मोठी व पहिली आज्ञा आहे. हिच्यासारखी दुसरी एक ही आहे की, 'तू आपल्या शेजाऱ्यांवर आपणासारखी प्रीती कर.' या दोन आज्ञांवर सर्व नियमशास्त्र व संदेशशास्त्रही अवलंबून आहे." (मतय 22 : 37 - 40)

ही आज्ञा येशूख्रिस्ताच्या शिष्यांसाठी आहे. एवढेच केवळ नाही, तर यहूदी व ख्रिस्ती यांच्या नैतिकतेचा महत्त्वाचा गाभा हीच आज्ञा आहे आणि जॉन वेस्ले यांनी ज्याला "ख्रिस्ती पूर्णता" म्हटलेले आहे ते हेच होय.

**मोशे - प्रीतीची आज्ञा - भाग 1**

"हे इस्राएला, श्रवण कर, आपला देव परमेश्वर हा अनन्य परमेश्वर आहे; तू आपला देव परमेश्वर याजवर पूर्ण मनाने, पूर्ण जिवाने व पूर्ण शक्तीने प्रीती कर"
(अनुवाद 6 : 4 - 5)

ही आज्ञा सर्व मानवजातीसाठी नाही, तर देवाच्या निवडलेल्या लोकांसाठी आहे. ही आज्ञा दहा आज्ञांची प्रस्तावना आहे. देव म्हणतो, "ज्याने तुला मिसर देशातून, दास्यगृहातून काढिले, तो मी परमेश्वर तुझा देव आहे. माझ्यासमोर तुला अन्य देव नसावे." (निर्गम 20 : 2 - 3)

मोशेच्याद्वारे आलेला 'करार' देवाच्या प्रीतीचा करार आहे आणि दहा आज्ञा म्हणजे इस्राएल लोकांचा त्या कराराला देण्यात येणारा प्रतिसाद आहे.

या देवाच्या प्रीतीचे व कृपेचे महत्त्व मोशेद्वारे शेवटी पुन्हा एकदा आपणांस दिसते. "परमेश्वराने तुम्हास समर्थ हाताने दास्यगृहातून, मिसराचा राजा फारो याच्या हातातून सोडवून बाहेर आणिले याचे कारण हेच की, त्याचे तुमच्यावर प्रेम आहे." (अनुवाद 7 : 8) आणि याला आमचा प्रतिसाद म्हणजे "तू आपला देव परमेश्वर याजवर पूर्ण अंतःकरणाने, पूर्ण जिवाने व पूर्ण मनाने प्रीती कर." (मत्तय 22 : 37)

देवाच्या कराराद्वारे त्याची प्रीती दिसून येते. हीच प्रीती पवित्रतेचे सार आहे. आज्ञापालनाद्वारे मनुष्य देवाच्या प्रीतीला प्रतिसाद देतो. ही प्रीती जर आम्ही विसरलो तर प्रीतीहीन रूढी, परंपरा निर्माण होतात.

**स्व-मूर्तिपूजा व्हावी यासाठी अपवित्र मनुष्य उत्सुक असतो व अनेक मूर्ती आपणासाठी तयार करतो व त्यांच्यासमोर मूर्खासारखे नतमस्तक होतो.**

आमचे अंतःकरण व आमचे जीवन यांवर देवाचा पूर्ण अधिकार जाणीवपूर्वक मान्य करणे म्हणजेच त्याचे आज्ञापालन करणे होय. देव म्हणतो, "आपल्यासाठी कोरीव मूर्ती करू नको, ......... कारण मी परमेश्वर तुझा देव ईर्षावान देव आहे........." (निर्गम 20 : 4-5) परमेश्वर हाच देव आहे; म्हणून त्याचीच भक्ती करणे योग्य आहे.

वॉलेस हॅमिल्टन (Wallace Hamilton) म्हणतात, "आपण अद्याप एक देव मानणारे झालो नाही, कारण आपण एका देवावर विश्वास ठेवतो आणि आपली निष्ठा इतर देवांसाठीही असते....... सर्वांत मोठा प्रश्न सार्वभौमतेचा आहे. आपली निष्ठा कोणावर आहे ? आपण पटकन बोलून जातो 'देवावर !'; परंतु व्यवहारात आपली निष्ठा इतर देवांवरही असते."[1]

मार्टिन लूथर म्हणतात, "ज्या अंतःकरणात फक्त देवाची सत्ता नाही त्या ठिकाणी पाप आहे." स्वतःची पूजा व्हावी यासाठी अपवित्र मनुष्य उत्सुक असतो व अनेक मूर्ती आपण तयार करतो व त्याच्यासमोर मूर्खासारखे नतमस्तक होतो." "हे देवा, माझी झडती घेऊन माझे हृदय जाण; मला कसोटीस लावून माझे मनोभाव तपास." (स्तोत्र 139 : 23)

**मला अत्यंत प्रिय मूर्ती**
**असो कोणतीही ती**
**तोडण्यास सिंहासनापुढे ती**
**हवी मला मदत तुझी**

**- विलियम कॉऊपर**

**प्रीतीच्या आज्ञा - भाग 2**

प्रीतीच्या आज्ञेचा दुसरा भाग म्हणजे, "तू आपल्या शेजाऱ्यावर स्वतःसारखी प्रीती कर." (लेवीय 19 : 18)

प्रीतीची ही दुसरी आज्ञा दुसऱ्या दर्जाची आहे असे नाही. सत्य हे आहे की, शेजाऱ्यावर जर आम्ही प्रीति करीत नसलो, तर देवावर प्रीती करू शकणार नाही." जो देवावर प्रीती करतो त्याने आपल्या बंधूवरही प्रीति करावी, ही आज्ञा त्याजपासून आपल्याला आहे." (1योहान 4 : 21) प्रीतीची आज्ञा ही दोन बाजू असलेली एकच आज्ञा आहे.

अतिशय स्वप्रीति ही दुसऱ्यावर प्रीती करण्याबाबत आम्हाला आंधळे करते. ए. के. ब्रेकन (A. K. Braken) माझे पहिले कॉलेज प्रेसिडेन्ट म्हणायचे, "काही लोकांच्या हे कधीच लक्षात येत नाही, की जग इतर लोकांनी भरगच्च भरलेले आहे."

स्वकेंद्रित वृत्तीभोवती असलेले कठीण कवच फोडून (देव ते फोडू शकतो) जोपर्यंत मी बाहेर पडत नाही, तोपर्यंत नव्या करारातील दर्जाचे ख्रिस्ती जीवन मी जगूच शकत नाही.

डोंगरावरील प्रवचनामध्ये आम्हाला दिसते "मी तर तुम्हास सांगतो, तुम्ही आपल्या वैऱ्यावर प्रीती करा आणि जे तुमचा छळ करितात त्यांच्यासाठी प्रार्थना करा; म्हणजे तुम्ही आपल्या स्वर्गातील पित्याचे पुत्र व्हाल. कारण तो चांगल्यावर व वाईटावर आपला सूर्य उगवितो आणि धार्मिकांवर व अधार्मिकांवरही पाऊस पाडितो." (मत्तय 5:44-45)

येशूने आज्ञापिलेली पूर्ण प्रीती म्हणजे भावनात्मक नाही, तर त्यामध्ये क्षमा व दुसऱ्याबद्दलची सदिच्छा आहे, की ज्यामुळे आंतरिक दुःख व वेदना जोपासण्याचे नाकारले जाते आणि कोणत्याही प्रकारचा राग / संताप त्या ठिकाणी रहात नाही आणि येशूसारखे आम्ही म्हणू शकतो, "हे पित्या ! ह्यांना क्षमा कर ! कारण हे काय करतात ते त्यांना समजत नाही." (लूक 23 : 24)

ख्रिस्तासारख्या या प्रीतीलाच जॉन वेस्लेने अंतःकरणातील पवित्रता म्हटले आहे.

"वचनामध्ये वर्णिलेले तारण" या आपल्या एका संदेशात जॉन वेस्ले पूर्ण पवित्रीकरणाचे *वर्णन करतात "पूर्ण पवित्रीकरण म्हणजे, आत्म्याची सर्व कार्यक्षमतेसह पापविरहित प्रीती, प्रीतीने भरलेले अंतःकरण..... या बाबी प्रीतीमध्ये परिपूर्ण असणे हे दर्शवितात - तसेच सर्व पापापासून तारले जाणे हे देखील यामध्ये दिसते. जेव्हा प्रीती अंतःकरण* व्यापून टाकते तेव्हा पापाला जागा कोठे असेल ?"[2]

म्हणून प्रीतीची आज्ञा हीच आहे की, पूर्ण अंतःकरणासह देवाची भक्ती करणे व देवावर आमची निष्ठा असणे; आम्ही आमच्या सर्व मानवी व्यवहारामध्ये इतरांची काळजी घेणारी, क्षमायुक्त आणि कृपायुक्त प्रीती दर्शविणे.

### येशू : प्रीतीची परिपूर्ती

येशू हीच एक अशी व्यक्ती आहे की, ज्याने प्रीतीची आज्ञा पूर्ण पाळली व देवाच्या नियमशास्त्राची पूर्णता केली. देवाचे पूर्ण नियमशास्त्र आम्हांस ख्रिस्तामध्ये दिसते. तो स्वतः फक्त पापविरहित होता असे नाही, तर त्यामध्ये देवावरची प्रीती, शेजाऱ्यावरची प्रीती आम्हांस पूर्ण रूपात दिसते. ख्रिस्त म्हणजेच देवाचे नियमशास्त्र. काही ईश्वरशास्त्र - विद्वान यालाच येशूख्रिस्ताचे ''सक्रीय नीतिमत्त्व'' म्हणतात.

परंतू देवाचा कोकरू या दृष्टीने त्याने देवाचे नियमशास्त्र आणखी एका मार्गाने पूर्ण केले. जगाच्या पापासाठी त्याने स्वतःला प्रायश्चित्ताचा यज्ञ म्हणून दिले. ''पवित्र होण्यास त्याने एका अर्पणाने सर्वकाळचे पूर्ण केले आहे.'' (इब्री 10 : 14) ईश्वरशास्त्र-विद्वान याला येशूचे ''सहनशील नीतिमत्त्व'' म्हणतात.

आपल्या पापविरहित जीवनाद्वारे व प्रायश्चित्ताच्या यज्ञाद्वारे येशूने नवीन-करार प्रस्थापित केला. या कराराच्याद्वारे आम्हांस पवित्र आत्मा मिळतो, ''यासाठी, की जे आपण देहस्वभावाप्रमाणे नव्हे, तर आत्म्याप्रमाणे चालतो, त्या आपणामध्ये नियमशास्त्रविरहित आचरण पूर्ण व्हावे.'' (रोम 8 : 4)

प्रीतीची आज्ञा समजून घेण्यासाठी नियमशास्त्र व शुभवृत्त / शुभवर्तमान यातील फरक लक्षात घेणे आवश्यक आहे. मार्टिन लुथर म्हणत असत की, ज्यांना या दोहोंमधील फरक कळतो ते ईश्वरशास्त्र विद्वान आहेत.

या दोहोंतील फरक काय आहे ? तो फरक म्हणजे जुना करार व नवा करार यांतील फरक आहे काय ? तसे नाही. कारण जुना करार हा नव्या करारातही आहे. येशूने म्हटले, ''नियमशास्त्र व संदेशांचे शास्त्र रद्द करावयास मी आलो असे समजू नका; रद्द करावयास नाही, तर पूर्ण करावयास आलो आहे.'' (मत्तय 5 : 17) आणि त्या दृष्टीने नवा करार म्हणजेच शुभवर्तमान हे जुन्या करारात आहे.

**देवाला आमच्याकडून जे अपेक्षित आहे ते म्हणजे नियमशास्त्र**
**आणि देव आम्हाला जे देतो ते म्हणजे शुभवर्तमान**

मग, नियमशास्त्र व शुभवर्तमान (ख्रिस्ताची शिकवण) यातील फरक काय ? मार्टिन ल्युथर म्हणतात, 'देवाला आमच्याकडून जे अपेक्षित आहे ते म्हणजे नियमशास्त्र आणि देव आम्हाला जे देतो (अभिवचन देतो) ते म्हणजे शुभवर्तमान.[3]

शुभवर्तमानाची व्याख्या आपणांस यिर्मया 31:31-34 मध्ये दिसते. ती आपणांस इब्री 10:14 मध्येही आढळून येते.

परमेश्वर म्हणतो, "पाहा असे दिवस येत आहेत की त्यांत इस्त्राएलाचे घराणे व यहुदाचे घराणे यांच्याबरोबर मी नवा करार करीन; ........ त्या दिवसानंतर इस्त्राएलाच्या घराण्याबरोबर जो करार मी करीन तो हा : मी आपले धर्मशास्त्र त्यांच्या अंतर्यामी ठेवीन; मी ते त्यांच्या हृदयपटावर लिहीन; मी त्यांचा देव होईन व ते माझे लोक होतील. परमेश्वर म्हणतो, या पुढे कोणी आपल्या शेजाऱ्यास, कोणी आपल्या बंधूस, परमेश्वराला ओळखा असा बोध करणार नाहीत; कारण लहानापासून थोरांपर्यंत ते सर्व मला ओळखतील मी त्यांच्या अधर्माची क्षमा करीन. त्यांचे पाप मी यापुढे स्मरणार नाही." (यिर्मया 31 : 31-34) हेच आमच्यासाठी असणारे शुभवर्तमान होय.

वधस्तंभावर जाण्याअगोदर आदल्या रात्री येशूने प्याला घेऊन म्हटले, "हे माझे (नव्या) कराराचे रक्त आहे; हे पापांची क्षमा होण्यासाठी बहुतांकरिता ओतले जात आहे." (मत्तय 26 : 28)

**नव्या कराराच्या अभिवचनामध्ये तीन बाबी दिसून येतात**

1. येशूच्या रक्ताद्वारे आम्हाला पापक्षमा मिळते ही एक मौल्यावान तरतूद नव्या करारात आहे. "ख्रिस्ताचे रक्त तुमचा विवेकभाव जिवंत देवाच्या सेवेसाठी निर्जीव कर्मापासून किती विशेष करून शुद्ध करील. (इबी 9 : 14)
2. ज्या क्षणी आमच्या पापांची क्षमा होते, त्याच क्षणी पवित्र आत्म्याच्याद्वारे आम्ही देवाला ओळखतो. (गलती 4 : 6; रोम 8 : 15 - 16)
3. तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्याच क्षणी देव आमच्या मनावर व अंतःकरणावर त्याचा नियम लिहिण्यास सुरुवात करतो. लुथर म्हणतात, "विश्वास आम्हाला नीतिमान बनवितो आणि नियमशास्त्र पूर्ण करतो, कारण ख्रिस्ताच्या चांगलेपणामुळेच पवित्र आत्मा आम्हाला मिळतो, की जो आमची अंतःकरणे आनंदी, नियमशास्त्रानुसार मुक्त करतो"[4] हीच पवित्रीकरणाची सुरुवात आहे. (1 करिंथ 6 : 11)

यिर्मया यरूशलेममध्ये नव्या करारासंबंधी घोषणा देत असताना, यहेज्केल हाच विषय अगदी मूलभूत रीतीने सांगत होता, "मी तुम्हांवर शुद्ध पाणी शिंपडीन, म्हणजे तुम्ही शुद्ध व्हाल; तुमची सर्व मलिनता व तुमच्या सर्व मूर्ती यापासून मी तुमची शुद्धी

करीन; मी तुम्हास नवे हृदय देईन; तुमच्या ठायी नवा आत्मा घालीन; तुमच्या देहातून पाषाणमय हृदय काढून टाकीन व तुम्हांस मांसमय हृदय देईन. मी तुमच्याठायी माझा आत्मा घालीन आणि तुम्ही माझ्या नियमांनी चालाल; माझे निर्णय पाळून त्याप्रमाणे आचरण कराल असे मी करीन." (यहेज्केल 36 : 25 - 27)

या ठिकाणी हृदय-रोपणाची क्रिया आम्हांस दिसते. सर्वोत्कृष्ट डॉक्टर (येशू) आमचे स्वतःवरच्याच प्रेमाने भरलेले कठीण, पाषाण हृदय काढून मृदू व आज्ञाधारक हृदय आम्हांस देत आहे.

## ईश्वरी हृदयाचे सेवन हे आमच्यासाठी अभिवचन आहे

यहेज्केल असे सांगत आहे की, अतिशयित स्वप्रीती ही आदामाच्या पतित वंशाची स्थिती आहे व ही स्थिती आत्म्याच्या पवित्र स्थितीत रूपांतरित होईल. यालाच पवित्र लिखाणामध्ये "पवित्रता" म्हटले आहे.[5]

ही स्थिती रोम 8 : 1-11 मध्ये वर्णिलेल्या ख्रिस्ताच्या चित्तवृतीची स्थिती आहे. म्हणून या स्थितीत आम्ही म्हणू शकतो

*हे परमेश्वरा तुझ्या प्रत्येक इच्छेला*

*व मार्गाला मी होयच म्हणेन !*

ही पूर्तता म्हणजे परिपूर्णतेचा सिद्धांत नाही. ही अशी स्थिती आहे, की ज्यामध्ये आम्ही म्हणतो, "हे माझ्या देवा, तुझ्या इच्छेप्रमाणे करण्यात मला संतोष आहे." (स्तोत्र 40:8). परंतु याचा अर्थ असा नाही की, "जसे आम्ही आपल्या ऋणास ऋण सोडिले आहे तशी तू आमची ऋणे आम्हांस सोड." (मत्तय 6:12). अशी प्रार्थना आम्ही करू नये. ही प्रार्थना आवश्यक आहे. कारण जोपर्यंत आम्ही या देहात आहोत तोपर्यंत प्रीतीच्या परिपूर्ण नियमाच्या दृष्टीने कमीच पडतो, म्हणून चार्ल्स वेस्ले म्हणतात, "हे परमेश्वरा, प्रत्येकक्षणी मला तुझी आवश्यकता आहे." आमची 'पूर्णता' म्हणजे देवदूतांची पूर्णता किंवा अमर्याद पूर्ण असलेली परिपूर्णता नाही. ही सुवार्ता-प्रेरित पूर्णता आहे, की जी आम्हाला नियमशास्त्र किंवा प्रीतीने आवश्यक असलेल्या बाबी करण्यास शिकविते. (रोम 8 : 4, 13 : 8-10; गलती 5 : 14)

प्रार्थना करू या : ज्याला सर्व अंतःकरणे व सर्व इच्छा माहित आहेत व ज्यापासून काही एक लपत नाही अशा आमच्या सर्वसमर्थ देवा, तुझ्या पवित्र आत्म्याच्याद्वारे आमच्या अंतःकरणातील विचार धुवून स्वच्छ कर, की जेणेकरून आम्ही पूर्णरीतीने तुझ्यावर प्रीती करू शकू व तुझे पवित्र नाम ख्रिस्त येशू आमचा प्रभू याच्याद्वारे आणखी उंच करू शकू, आमेन.[6]

**आत्मिक जीवनासाठी प्रकाशशलाका / मार्गदर्शन**

## प्रमुख आधारस्तंभ

1 स्वतःची पूजा : लक्र्सपूर, कॅलिफोर्निया येथे तीन लोकांनी एक कार चोरण्याचा प्रयत्न केला. मालकाने तसे करीत असतांनाच त्यांना पकडले. तो जोरात ओरडला व ते पळून गेले. मालकाने त्यांचा पाठलाग करण्याचा प्रयत्न केला. पाठलाग करतांना त्याला पोलिस भेटले व त्यांनीही पाठलाग सुरू केला. त्या तीन चोरट्यांनी एकमेकांच्या मदतीने समोरील काटेरी-तारांच्या कुंपणाच्या पलीकडे जाण्याचा प्रयत्न केला. कसेबसे रक्तबंबाळ होऊन वर गेल्यावर त्यांनी दुसऱ्या बाजूला पाहिले. तेथे काही पोलिस उभे होते. त्यातील एकजण म्हणाला 'धन्यवाद, तुम्ही आता सॅन क्वेन्टीमध्ये (San Quentin) आहात.'' जे लोक स्वतःचीच पूजा करतात त्यासाठी ही गोष्ट उत्तम दाखला आहे. देवाच्या कृपेचा अव्हेर करून पैसा, लैंगिक गोष्टी व अधिकार यांच्यामागे ते लागतात. ज्या ठिकाणी जाऊ नये त्या ठिकाणी ते पोहोचतात व रक्तबंबाळ होतात. ज्या ठिकाणी स्वार्थी कृती व पाप आहे अशा तुरुंगात ते जातात.

तुम्ही एखाद्या तुरुंगातून सुटला आहात काय ?

'स्वतःची पूजा' या तुरुंगातून सुटण्यासाठी आम्ही काय करावे ? या प्रकरणात तुम्हांस काय मार्गदर्शन झाले ?

**2. प्रीतीची आज्ञा - भाग 1**

कोणत्याही वस्तूपेक्षा व व्यक्तीपेक्षा देवावर अधिक प्रीती करावी हा पवित्र शास्त्राचा संदेश आहे. खालील वचने या सप्ताहासाठी वाचा.

मत्तय 22 : 37 - 40

अनुवाद 6 : 4-5;

अनुवाद 7 : 8

निर्गम 20 : 1-5

यिर्मया 31 : 33-34

### 3. प्रीतीची आज्ञा भाग 2

आम्ही जशी स्वतःवर प्रीती करतो तशी शेजाऱ्यावरही प्रीती करावी. आम्ही दुसऱ्यावर कसे प्रेम करावे यासाठी खालील वचनांचा अभ्यास करा.

मत्तय 5 : 44 - 48.

मत्तय 22 : 39 - 40.

लेवीय 19 : 18.

1 योहान 4 : 21.

### 4. येशू ख्रिस्त : कित्ता व तारणदाता

खालील वाक्याच्या आधारावर (ही वाक्ये प्रकरणात आहेत) येशू हा कित्ता व तारणदाता आहे हे शोधून पहा.

"येशू हाच एक असा आहे की, ज्याने प्रीतीची आज्ञा परिपूर्णपणे पाळलेली आहे."

"जग हे प्रामुख्याने इतर लोकांनी भरगच्च भरलेले आहे."

"शत्रूवर प्रीती करा व जे तुमचा छळ करतात त्यांच्यासाठी प्रार्थना करा."

"परिपूर्ण प्रीती भावनात्मक नाही' या प्रीतीमध्ये क्षमेचा आत्मा आहे. ज्यामुळे आम्हाला झालेल्या वेदनांची जोपासना केली जात नाही व क्रोधाला / संतापाला थारा नाही."

## आध्यात्मिक पायऱ्या

1. मनुष्याचे परिवर्तन झाल्यानंतर आंतरिक पाप धुवून काढण्यासाठी व अंतःकरण दैवी प्रीतीने भरण्यासाठी पवित्र आत्मा त्याच्या अंतःकरणात कार्य करायला सुरुवात करतो. देव आपल्या कार्यात विश्वासू आहे. तो आपले अंतःकरण पवित्रतेच्या कृपेसाठी तयार करतो. काहींच्या बाबतीत ही कृपा मिळवण्यासाठी वर्षे लागतात. काहींच्या बाबतीत काही आठवडे किंवा काही दिवस लागतात. ही गोष्ट केव्हा घडते, त्या वेळेला फार महत्त्व नाही. परिपूर्णतेकडे जाणे हे महत्त्वाचे आहे.

   तुम्ही केव्हा तयार आहात हे देवाला माहित आहे. ज्या वेळी देवाचे हे कृपेचे कार्य घडून तुम्ही त्या विशिष्ट ठिकाणी याल, की ज्या ठिकाणी / ज्यावेळेला

तुम्ही देवावर पूर्ण अंतःकरणाने, पूर्ण मनाने, पूर्ण आत्म्याने व पूर्ण शक्तीने प्रीती कराल. याच क्षणाला जॉन वेस्ले यांनी "तुम्ही शुद्ध व्हा" (दुसऱ्या वेळेस) असे म्हटले आहे. (जॉन वेस्लेचे उपदेश : "पाप्यांचा पश्चात्ताप" आणि "आत्म्याची पहिली फळे").

2. जशी आम्ही स्वतःवर प्रीती करतो तशी इतरांवरही प्रीती करावी ही एक महत्त्वाची आध्यात्मिक पायरी आहे. या संबंधीचे जॉन वेस्लेच्या विचारांवर मनन करा.

"जशी स्वतःवर तशी आपल्या शेजाऱ्यावर प्रीती करा. तुम्ही प्रीती करा : सर्व-प्रकारच्या कल्याणकारी इच्छेने, सर्वप्रकारच्या वाईटाला अटकाव करणे व त्याचे निर्मूलन करणे या ज्वलंत इच्छेने व दुसऱ्याचे सर्वप्रकारे चांगले होईल या बाबी कवटाळून धरणे."

आपल्या शेजाऱ्यावर : तुमचे मित्र, नातेवाईक....... चांगले गुण असलेले, मित्रत्वाची भावना असलेले, जे तुमच्यावर प्रीती करतात : तुमच्या चांगल्याची फेड करतात त्याच्यावरच प्रीती करा असे नाही, तर प्रत्येक मनुष्यप्राणी, जे वाईट किंवा अपकार करणारे आहेत, जे तुमचा छळ करतात त्यांच्यावर प्रीती करा.

जशी आपणावर / स्वतःवर : त्याच्या शरीराला किंवा आत्म्याला ज्या काही इजा किंवा वेदना होतील त्याची न थकता, न कंटाळता काळजी घेणे व त्याच्या सर्व चांगल्याकरिता झटणे.[7]

असल्याप्रकारचे दुसऱ्यावरील प्रीती सक्रिय असली पाहिजे. गरीबांना देणे, भुकेल्यांना अन्न देणे, उघड्यांना कपडे देणे, अपरिचित मनुष्याचा पाहुणचार करणे, तुरुंगात असणाऱ्यांचे सांत्वन करणे, आजाऱ्यांची सुश्रुषा करणे (चमत्कार करून नाही), तर देवाच्या आशिर्वादाद्वारे वेळोवेळी सहाय्य करणे, या गोष्टी आम्ही करणे आवश्यक आहे. त्यामुळे जे मरणाच्या जवळ आहेत त्यांचा आशीर्वाद तुमच्यावर येईल. जाचलेल्याचा कैवार घ्या, पोरक्यांच्या बाजूने उभे रहा आणि विधवांचे अंतःकरण आनंदाने गीत गाईल असे वागा.[8]

बहुतेकजण हे वेस्लेचे विचार ऐकून प्रार्थना करण्यास उत्सुक होतील; परंतु त्यानुसार करणार नाहीत. तुम्ही काय कराल ?

## विचार करण्याच्या बाबी / उपयोगात आणावयाची साधने

1. प्रश्नसंच

a. कोणत्याही वस्तूपेक्षा किंवा व्यक्तीपेक्षा मी देवावर जास्त प्रीती करतो असे म्हणण्याची (काम करतांना) लोकांची शक्यता आहे काय ?

   1) खूप शक्यता आहे

   2) शक्यता आहे

   3) काही प्रमाणात शक्यता आहे.

   4) शक्यता नाही.

b. जर सरकारी यंत्रणेद्वारा तुमचा छळ होत असेल (कारण तुम्ही देवावर प्रीती करता) तर तुम्ही गुन्हेगार शाबित होण्यासाठी प्रबळ पुरावा आहे काय ?

c. जर तुमच्या कौटुंबिक सभासदांनी तुम्हाला विचारले की, ''या जगात तुम्ही कोणावर सर्वांत जास्त प्रीती करता ?'' तर तुमचे उत्तर काय असेल ?

d. या जीवनात माझ्या देवावरील प्रीतीबरोबर एखादी गोष्ट चुरस (compete) करीत असेल, तर ती गोष्ट म्हणजे..........

(a) ते (d) या प्रश्नांना तुमचे जर सकारात्मक उत्तर असेल, तर देवाच्या कृपेच्या कार्याबद्दल त्याचे आभार माना.

2. हे गीत तुमची प्रार्थना असू द्या.

### परिपूर्ण प्रेमाची गौरवी आशा

**परिपूर्ण प्रेमाची, तू गौरवी आहे आशा**
**ही आशा प्रेरित करते, तुज बघण्याला जगदीशा**

**गरुडाचे लेवून पंख, झेपावतो आकाशी**
**वेचून सदान्ना तेथून, आणतो सुखाच्या राशी**

**ही गौरवी आशा म्हणूनच, प्रभुदर्शन लाभही होतो**
**महा थोर भक्तगणांचा, सहवासही तेथे घडतो**

ही आशा सतेज करते, आत्म्याची भूक तहान
येशुसवे मग वरती, ते भेटती भक्त महान

परिपूर्ण प्रेमाची, आशा प्रभू येशू महान
मी दृष्टी लावतो वरती, तो आत्मिक पुरवी अन्न

सहर्ष विभोर मी, जीवनदायी आशेने
गिरीवरून पाहतो भूमिरूप देखणे
दुग्ध नद्या मधुप्रवाह तेथे वाहतो
नंदनवन फलसंभारा सुखे न्याहळतो

यार्देन आणि त्या पल्याड, मी झेपावतो
अनंत सुख समृद्धी येथून देखतो
तो काळ संपला आणि वर्ष ती पळे
संशय दुःख भय सरून सुख सळसळे

हे यहोशुवा, ठायी तुझ्या, ये मला तू घे
शत्रू तुझे, ती पातके तू घालवून दे
विकत घेतले मला, तू रक्त सांडवून
अंतरात्म शुद्ध करून, दे प्रीती भरून

*सैतानाची कृत्ये नष्ट करावी यासाठीच देवाचा पुत्र प्रकट झाला*

1 योहान 3 : 8.

# 5

# विजयी ख्रिस्त - आपला महान तारक

ख्रिस्ती मंडळीच्या सुरुवातीच्या काळातील एक महत्त्वाची व्यक्ती म्हणजे आयरेनिअस (Irenaeus). त्यांनी एकदा प्रश्न विचारला, "ख्रिस्त कोणत्या उद्देशाने स्वर्गातून या भूतलावर आला ?" त्याचे उत्तर आहे, "[1] पापाचा नाश करण्यासाठी, मरणावर विजय मिळविण्यासाठी व मानवाला जीवन देण्यासाठी ख्रिस्त आला." आयरेनिअस पुढे असेही म्हणतात, "आपल्या प्रभूने बलवान माणसाला बांधले व अशक्त माणसाला मुक्त केले आणि पापाचे निर्मूलन करून माणसाला तारण दिले."[2]

गुस्टाफ ऑलेन (Gustaf Aulen) या वरील विचाराला "विजयी ख्रिस्त असे संबोधितात. पापाला झाकून टाकण्यासाठी नाही, तर पापाचा नाश करण्यासाठी ख्रिस्त मरण पावला व पुन्हा उठला. ज्या वाईटाच्या सामर्थ्याने मनुष्याला बंधनात टाकले त्या सामर्थ्यावर विजय मिळविणे हेच ख्रिस्ताचे पहिले व महत्त्वाचे कार्य आहे. आपल्या मरण व पुनरुत्थान याद्वारे ख्रिस्ताने सैतानाला त्याच्या सामर्थ्यशाली पदावरून दूर केले व पाप व मरण यांचे निर्मूलन केले." या विजयी ख्रिस्ताचे स्वर्गारोहण झाल्यानंतर त्याने पवित्र आत्मा पाठविला, की जो आपल्यामध्ये व आपल्याद्वारे उद्धाराचे कार्य सतत करीत आहे.

**आमच्यासाठी ख्रिस्ताचा विजय -**

नवीन करारात दर्शविल्यानुसार ख्रिस्ताचा विजय हा पाप, मरण व सैतानाची सत्ता यावर आहे. "त्याने सत्ताधीशास व अधिकाऱ्यास नाडून त्याजविरुद्ध वधस्तंभावर जयोत्सव करून त्याचे उघड उघड प्रदर्शन केले. (कलस्सै 2 : 15)

आपल्या वधस्तंभावरील मरणाच्या अगोदर ख्रिस्ताने म्हटले, "आता या जगाचा अधिकारी बाहेर टाकिला जाईल." (योहान 12 : 31) "व पवित्र आत्म्यासंबंधी तो म्हणाला, "तो येवून पापाविषयी, धार्मिकतेविषयी व न्यायनिवाड्याविषयी जगाची खात्री करील." (यो. 18 : 6) तसेच वचन 18 : 11 मध्ये दिसते की, तो जगाच्या अधिकाऱ्याच्या न्यायाविषयीही खात्री करील. आम्ही देवाचे आभार मानू या. कारण पवित्र शास्त्र सांगते, "मुलांनो तुम्ही देवापासून आहा आणि त्याजवर तुम्ही जय मिळविला आहे, कारण जगात तो आहे त्यापेक्षा तुम्हात जो आहे तो मोठा आहे (1 योहान 4:4). पौल रोम 8 : 3 मध्ये म्हणतो, "..... देवाने आपल्या पुत्राला पापी देहासारख्या देहाने व पापाकरिता पाठविले आणि देहांत दंडाज्ञा करून पापाचा मोड केला." देवाचे महान भक्त सी. एच. डॉड (C. H. Dodd) म्हणतात, "ख्रिस्ताचे परिपूर्ण आज्ञापालन, त्याचे विजयी मरण व पुनरुत्थान यामुळे पापाचे मनुष्यस्वभावावरील राज्य मोडले-तोडले गेले आहे."[4] या विचारावरच जॉन वेस्ले म्हणतात, "यामुळे देवाने अशी शिक्षा सुनावली की ज्यामुळे पापाचा नाश होतो व विश्वासणारा पापापासून पूर्णपणे मुक्त होतो."[5]

ख्रिस्त आमच्यासाठी पाप झाला, त्याने आम्हाला मुक्त केले. ख्रिस्ताने आम्हाला मोफत नीतिमान ठरविले. देवाच्या या मोफत कृपेचे वर्णन जेम्स् स्टेवर्ट यांच्या गोष्टीमध्ये दिसून येते.

फॉस्ट व सैतान हे जुगार खेळण्यास बसले. फॉस्टने खेळता खेळता आपला आत्मा डावावर लावला. शेवटी त्याच्याजवळ काही प्यादे, एक घोडा व एक राजा हेच राहिले. त्याला काही करता येईना व तो आता जणू हरणार हे निश्चितच झाले. चित्रामध्ये त्याचा अगदी हताश चेहरा व सैतानाच्या चेहऱ्यावर कावेबाज स्मित दाखविले होते व वर मथळा होता, "पूर्ण पराभव". चित्र पाहिल्याबरोबर येणारे-जाणारे म्हणू लागले, "आता फॉस्ट नक्कीच हरणार." एके दिवशी एक बुद्धिमान बुद्धिबळपटू त्या ठिकाणी आला. त्याने अगदी बारकाईने चित्राचे निरीक्षण केले व अगदी आनंदाने उडी मारून म्हटले, "पूर्ण पराभव" हे वाक्य बरोबर नाही, कारण फॉस्टजवळ अजूनही राजा आहे. किती सुंदर चित्र आहे नाही ! जेम्स् स्टेवर्ट म्हणतात, "माझीही अवस्था अशीच होती. मी

न्यायालयात उभा होतो. मला शिक्षा जवळजवळ निश्चितच झालेली होती आणि तितक्यात एक हळूवार, शांत आवाज माझ्या कानामध्ये शिरला "अजूनही राजा तुझ्या शेजारी आहे." हळूच येशू मला म्हणाला, "मी तुझ्यासाठी पाप झालो आहे." सामर्थ्याच्या दृष्टीने खरोखरच ख्रिस्ताने सैतानाची सर्व कृत्ये नष्ट केली व आमच्या सर्व पापांचा नाश केलेला आहे व त्याच्या शरीरातील सर्व अवयवांचे (विश्वासणाऱ्यांचे) पवित्रीकरण केले आहे.[6] सुरुवातीच्या मंडळीचे फादर आयरेनिअस म्हणतात, "तो (ख्रिस्त) अर्भकांसाठी अर्भक झाला, की जेणेकरून अर्भकावस्था पवित्र व्हावी. तो बालक झाला, की ज्यामुळे बालकावस्था पवित्र व्हावी व माता-पित्यांबद्दलचे प्रेम, नीतिमत्ता व आज्ञाधारकपणाचा कित्ता निर्माण व्हावा. तरुणांसाठी उत्तम उदाहरण व्हावे म्हणून तो तरुण झाला, तो प्रौढ झाला, की जेणेकरून प्रौढांचे पवित्रीकरण व्हावे व त्यांना उत्तम कित्ता व्हावे. मरण पावलेल्यामधून प्रथम फळ व्हावे यासाठी तो मरण पावला. तो जीवनाचा दाता व्हावे यासाठी सर्वांमध्ये अग्रगण्य होऊन तो सर्वांच्या अगोदर पुढे गेला व सर्वांना मार्ग दाखवून दिला [7] आणि सर्वांत शेवटी "त्याने मरण नाहीसे केले व सुवार्तेच्याद्वारा जीवन व अविनाशिता ही प्रकाशित केली आहे." (तिम 1 : 10)

सैतान, पाप आणि मरण यावर विजयी होऊन ख्रिस्त आमच्यासाठी विजयी झाला.

## आम्हामध्ये ख्रिस्ताचा विजय

आमच्या पश्चात्तापात्मक विश्वासाने व पवित्र आत्म्याच्या सही-शिक्क्याने आम्ही त्याच्यामध्ये एकत्र होऊ तेव्हा त्याचा विजय हा आमचा विजय होईल. जेव्हा आम्ही ख्रिस्ताला आमचे जीवन व आमचे पावित्र्य म्हणून स्वीकारू त्यावेळी त्याच्या प्रायश्चित्तातील प्रत्येक भाग आमच्या ख्रिस्ती अनुभवाचे एक अंग होईल. पौल हे सत्य आम्हाला सांगतो. तो म्हणतो, "मी ख्रिस्ताबरोबर वधस्तंभाबरोबर खिळलेला आहे आणि ह्यापुढे मी जगतो असे नाही, तर ख्रिस्त माझ्याठायी जगतो आणि आता देहामध्ये जे माझे जीवित आहे ते देवाच्या पुत्रावरील विश्वासाच्या योगाने आहे; त्याने माझ्यावर प्रीती केली व स्वतःला माझ्याकरिता दिले. (गलती 2 : 20)

1 आमचा पालट होतो तेव्हा आम्ही ख्रिस्ताबरोबर मरतो व त्याच्याबरोबरच जीवनाच्या नाविन्यामध्ये त्याच्याबरोबरच पुन्हा उठतो. त्याच्याबरोबर वधस्तंभावर मरण पावल्यामुळे आम्ही नीतिमान ठरविले जातो; पापाचे सामर्थ्य व दोषापासून आमची सुटका होते, आमचा पुन्हा जन्म होतो व ख्रिस्ताबरोबर पवित्र आत्म्यामध्ये प्रीतीच्या व पवित्र आज्ञापालनाच्या नवीन जीवनामध्ये आमचा प्रवेश होतो. ख्रिस्ताचे मरण म्हणजे आमचे पापाला मरण होय, तसेच त्याचे जीवन म्हणजे

आमचे नीतिमत्व व पवित्रतेचे जीवन होय. हे सत्य आम्हांस रोम 6 : 1-11 मध्ये दिसते.

2 दुसरी बाब म्हणजे पूर्ण पवित्रीकरणामध्ये जो ख्रिस्त आम्हामध्ये राहतो त्याला आमच्या जीवनाचा प्रभू होण्याची आम्ही जणू परवानगी देतो. पौल म्हणतो, "मेलेल्यातून जिवंत झालेले असे स्वतःस देवाला समर्पण करा.... आणि पापांपासून मुक्त होऊन तुम्ही नीतिमत्वाचे गुलाम झाला. ....... आपले अवयव पवित्रीकरणाकरिता नीतिमत्वाला गुलाम असे समर्पण करा. (रोम 6:13, 18,19)

स्वत्वाचा पूर्ण त्याग करून देवाचे सार्वभौमत्व स्वीकारल्यानंतर पवित्र आत्मा पूर्णत्वाने आमच्यात वस्ती करतो व ख्रिस्त आमचा पवित्रिकरण करणारा प्रभू बनतो. आमचा पालट झाल्यानंतर ख्रिस्त आमच्यामध्ये राहण्यास सुरुवात करतो व आता तो आमच्यावर राज्य करतो. या दृष्टीने पवित्रीकरण म्हणजे आमच्या पालट होण्याचा अनुभवाची पूर्णता होय. पवित्रीकरण म्हणजे महान-ख्रिस्ती होणे नाही, तर खरे ख्रिस्ती होणे होय. पौल रोम 8:1-11 मध्ये हेच सांगतो. यासाठी खालील सूचना अतिशय महत्त्वाच्या आहेत

- "तुम्ही देहाच्या अधिन नाही तर आत्म्याच्या अधिन आहात." (रोम 8 : 9)
- तरी तुम्ही या देहामध्ये रहात आहात, म्हणून या देहाच्या आकांक्षा व इच्छा यामुळे होणारी देहाची कर्मे आम्हामध्ये आहेत. ही कर्मे आत्म्याच्यायोगे मारून टाकणे आवश्यक आहे. (रोम 8 : 13)
- पौलाप्रमाणेच आम्ही शरीरास बुकलुन दास करून ठेवणे आवश्यक आहे. (1 करिंथ 9:27)
- नाहीतर आध्यात्मिक मरण पुन्हा एकदा आमच्यावर घाला घालील. आमचे पवित्रीकरण झालेले असले, तरी आम्ही गौरवी झालेलो नाही. (रोम 8 : 12-13)

आम्हाला एक पूर्ण आशा आहे, ती ही की, ज्यावेळी ख्रिस्त गौरवात येईल त्यावेळी आमच्या शरीराची मुक्ती होईल. सर्व सृष्टी व आम्ही एकप्रकारे कण्हत आहोत व ख्रिस्त येईल तेव्हा आम्ही दत्तक असे घेतले जाऊ (रोम 8:23). या मोठ्या आशेची वाट पहात असतांनाच आम्हाला आत्म्याचे प्रथम फळ मिळाले आहे. हा अनुभव म्हणजेच पुढे येणाऱ्या गौरवाची चव आहे, की जे गौरव आम्हाला ख्रिस्तामध्ये मिळेल. (रोम 8:14-31)

हा विचार फक्त ईश्वरविज्ञानच नाही, तर आमची प्रार्थना आहे. त्यामुळे आत्म्यामध्ये आम्ही म्हणतो, "येशू प्रभू आहे" ( 1 करिंथ 12 : 3), देवदूतासारखे आम्ही गातो, "हालेलुया ! सर्व समर्थ प्रभू आमचा देव राज्य करतो" (प्रकटी 19 : 6) आणि सर्व तारलेल्यांबरोबर आम्ही विजयी ख्रिस्ताचे गीत गातो, "राजासनावर बसलेला (देव) याला व कोकऱ्याला स्तुती, सन्मान, गौरव व सत्ता ही युगानुयुगे असोत. (प्रकटी 5 : 13)

## आध्यात्मिक जीवनासाठी प्रकाशशलाका / मार्गदर्शन

### मुख्य आधारस्तंभ

1. या अध्यायाच्या अभ्यासासाठी रोम 6, 7 व 8 यांचा अभ्यास करा.
2. दोन मुख्य आधारस्तंभावर हा अध्याय आधारलेला आहे.
   a. आमच्यासाठी ख्रिस्ताचा विजय
   b. आम्हामध्ये ख्रिस्ताचा विजय
3. तुम्हाला खालील रूपरेषा दिलेली आहे व त्यावर उपदेश करायचा आहे.
   a. आमच्यासाठी ख्रिस्ताचा विजय
   b. आम्हामध्ये ख्रिस्ताचा विजय
   c. या दोन मुद्द्यांतील फरक काय ?

शेवटचा मुद्दा तुम्ही कसा स्पष्ट कराल ? यामध्ये तुम्ही इतरांच्या परिवर्तनाच्या / तारणाबाबतच्या गोष्टी, पवित्रतेसंबंधीच्या साक्षी व तुमचे स्वतःचे अनुभव विदीत कराल काय ? तुमचे तीन विचार यामध्ये मांडा.

### आध्यात्मिक पायऱ्या

1. फॉस्टच्या गोष्टीवर विचार करा. पाप व तुमचे तारण याबाबत ही गोष्ट कशी संबंधीत आहे ?

2. चार्ल्स वेस्ले यांचे हे गीत गा

**येशू तुझे नाम, येशू तुझे नाम**
**भयामध्ये आनंद निर्माण करते**
**दुःखद घटनांना आव्हान देते**
**पाप्याच्या कानात संगीतमय होते**

**जीवन आरोग्य शांती देते**
**येशू तुझे नाम, येशू तुझे नाम**
**दडलेले पाप फोडून टाकितो**
**तुरुंगवासीयांना मुक्त करितो**
**मंगल करितो सर्व रद्द**
**रक्तयोगे त्याच्या होतो मी शुद्ध**

3. तुमचा मित्र, शेजारी किंवा कुटुंबातील सभासद यांच्या तारणासाठी किंवा सर्वशुद्धीसाठी (पवित्रीकरणासाठी) प्रार्थना करा.

## उपयोगात आणावयाची साधने

1. खालील शब्दप्रयोग विचारात घ्या. त्यांचा अर्थ लक्षात घेऊन त्यांचे महत्त्व स्पष्ट करा.

   ♦ "विजयी ख्रिस्त"
   ♦ "राज्यांच्या राजाजवळ आणखी एक चाल आहे"
   ♦ " 'उच्च ख्रिस्ती' नाही तर 'खरा ख्रिस्ती' "
   ♦ "प्रथम जन्मलेला"
   ♦ "पवित्रीकरणाच्या (शुद्धिकरणाच्या) अनुभवात आम्ही ख्रिस्त आमचा सर्व सत्ताधीश व्हावा म्हणून त्याला परवानगी देतो."

2.

   ♦ या अध्यायातील कोणता विचार तुम्हाला अधिक महत्त्वाचा वाटला ?
   ♦ या अध्यायातील कोणता विचार तुमच्यासाठी नवीन आहे ?
   ♦ या अध्यायातील कोणत्या विचाराने तुमच्या अंतःकरणात हालचाल निर्माण झाली ?

*मी ख्रिस्ताबरोबर वधस्तंभावर खिळलेला आहे आणि ह्यापुढे मी जगतो असे नाही, तर ख्रिस्त माझ्याठायी जगतो आणि आता देहामध्ये जे माझे जीवित आहे ते देवाच्या पुत्रावरील विश्वासाच्या योगाने आहे. त्याने माझ्यावर प्रीती केली व स्वतःला माझ्याकरिता दिले.*

गलती 2 : 20.

# 6

# पावित्र्य : ख्रिस्त अंतरंगात राज्य करतो

गलती 2 : 20 हे वचन म्हणजे पौलाचे पवित्रीकरणाचे शुभवर्तमान होय. त्याचे हे शुभवर्तमान आपले झळाळणारे सौंदर्य व दैवी निराळेपण होऊन एखाद्या दुर्मिळ रत्नाप्रमाणे त्याचे नीतिमान ठरवणारे शुभवर्तमान (2 : 15 - 21) आणि आत्म्याची अभिवचनाने देऊ केलेली देणगी (3 : 1 - 14) यामध्ये विराजमान झालेले आहे.

आपण या आधी पाहिले, ख्रिस्ताचे मरण आणि पुनरुत्थान ह्या जशा एकाच प्रसंगाच्या दोन बाजू होत्या, त्याप्रमाणे नितिमान ठरवणे आणि पवित्रीकरण या दोन्ही गोष्टींचा, पौलाच्या दृष्टीने, एकमेकांशी निकट संबंध आहे. ख्रिस्ताबरोबर पापाला मरणे म्हणजेच त्याच्याबरोबर "आत्म्याच्या नाविन्याने" पुन्हा उठणे होय. (रोम 7 : 6; 6 : 1-4)

गलती 2 : 20 हे वचन आमच्या तारणामागील देवाच्या हेतूची आम्हांला आठवण करून देते. तो हेतू असा की, एका दैवी रहस्यमय, गूढ मार्गाने ख्रिस्ताने **आमच्यामध्ये आपले पवित्र जीवन जगावे आणि त्याद्वारे त्याचे आमच्या मानवी देहामध्ये पुन्हा देहधारण व्हावे !** (रोम 8 : 29)

पावित्र्याच्या शुभवर्तमानाची गतिशीलता आणि सुप्त सामर्थ्य हे असेच आहे : ख्रिस्त अंतरंगात राज्य करतो, आमच्या सर्व सामर्थ्यांवर सत्ता चालवतो आणि हळूहळू त्याच्या जीवन देणाऱ्या आत्म्याच्या सामर्थ्यामध्ये आम्हांला त्याच्या स्वतःच्या प्रतिमेप्रमाणे रूपांतरित करतो. (2 करिंथ 3 : 18 ; 1 करिंथ 15 - 45).

आपल्या शास्त्रभागामध्ये आढळणारा हा पावित्र्याच्या शुभवर्तमानाचा हिरा आता आपण उचलू या आणि त्याकडे तीन कोनांमधून पाहू या. गलती 2 : 20 हे वचन स्पष्टपणे प्रकट करते की माझ्याठायी -

- **पापमय** स्वभाव आहे, तो ख्रिस्ताबरोबर वधस्तंभावर खिळला पाहिजे.
- **मानवी** स्वभाव आहे, त्याला ख्रिस्तामध्ये आज्ञापालनाचे वळण लावले पाहिजे आणि
- **खरा** स्वभाव आहे, तो ख्रिस्तामध्ये प्रत्यक्ष आचरणात आणला पाहिजे.

**( पापमय स्वभाव : तो ख्रिस्ताबरोबर वधस्तंभावर खिळला पाहिजे. )**

मूळ ग्रीक भाषेमधील या वचनाचा शब्दशः अनुवाद असा आहे, "मी ख्रिस्ताबरोबर वधस्तंभी दिलेला आहे आणि यापुढे मी (अहंपणा) जगतो असे नाही, तर ख्रिस्त माझ्यामध्ये जगतो."

आदमाच्या पतित वंशाचे सदस्य या नात्याने मार्टिन लूथर म्हणतो त्याप्रमाणे आम्ही जन्मजात "पापी स्वभावाचे" आहोत. आमच्या हृदयाला पापाचा गंभीर आजार झालेला आहे. विश्वासणाऱ्यामधील हाच पापी अहंपणा : स्वार्थी प्रतिमापूजन, अहंकार व बंडखोर वृत्तीने देवाला आद्यस्थान न देणे याद्वारेच आम्ही देवाला वधस्तंभावर खिळतो (रोम 1 : 21 - 25).

**पातक ही वैयक्तिक कृती असली तरी अगोदर ती मानववंशाची वस्तुस्थिती आहे**

आपण सर्वजण मरणाधीन-नाशवंत, आदामाच्या पतित वंशाचे सदस्य आहोत, याला कोणी अपवाद नाही. त्याने आज्ञापालन करण्याच्या कर्तव्यात कसूर केली आणि आत्म्याच्या पवित्र करणाऱ्या कृपेला आपण पारखे झालो. आत्मा गमावून बसल्यामुळे आम्ही नैतिकदृष्ट्या नीतिभ्रष्ट झालो. आदामामध्ये पतन पावल्यामुळे आम्हांला पातकी असे "व्यक्तित्व" मिळणे अटळ आहे. आमच्या स्वतःच्या वैयक्तिक जीवनामध्ये आपल्यापैकी प्रत्येकजण **त्या पतनाची** पुनरावृत्ती करीत असतो. प्रेषित पत्र लिहितो

तेव्हा तो आम्हा सर्वांसाठी सांगतो, "नियमशास्त्रावाचून पाप निर्जीव आहे. मी नियमशास्त्रविरहित होतो तेव्हा जगत होतो; पण आज्ञा आल्यावर पाप संजीवित झाले आणि मी मरण पावलो." (रोम 7 : 8 - 10). आमच्या वैयक्तिक जीवनाच्या वाटचालीत एका वळणावर- टप्प्यावर आम्ही याला नैतिक जबाबदारीचा कालखंड म्हणतो - आमच्यापैकी / प्रत्येकाला अंतरंगात "तू करू नकोस !" अशी देवाची आज्ञा करणारी वाणी ऐकू येते. आमचे अंतरंग नीतिभ्रष्ट झाले असल्याने आम्ही अवज्ञा करणे - न ऐकणे अटळ असते आणि याला कोणीही अपवाद नाही आणि याचप्रकारे पातक हे **अपराध** होते.

"मूळ पातकाचे स्पष्टीकरण तुम्ही तुम्हांला हव्या त्या मार्गाने करा" प्रोफेसर एडवर्ड रेम्सडेल युनिव्हर्सिटीमध्ये व्याख्यान देताना बोलत होते, "तुम्हांला त्यापासून पळून दूर जाता येणार नाही, ती एक अनुभवजन्य वस्तुथिती आहे." शास्त्रलेख सुस्पष्टपणे सांगतो, "सर्वांनी पाप केले आहे आणि ते देवाच्या गौरवाला उणे पडले आहेत." (रोम 3 : 23). ही वाईट-दुःखद बातमी आहे.

परंतू चांगली बातमी देखील आहे याबद्दल देवाचे आभार मानले पाहिजेत. "ख्रिस्त येशू पापी लोकांना तारावयास जगात आला. हे वचन विश्वसनीय व पूर्णपणे स्वीकारावयास योग्य आहे; त्या पापी लोकांपैकी मी मुख्य आहे." (1 तीमथ्य 1 : 15)

परंतु तारण हे कृपेने होते आणि त्याचा नियमशास्त्रातील कृत्यांशी काही संबंध नाही, तसेच नियमशास्त्राने पवित्र जीवन जगता येत नाही, तर त्यामुळे केवळ पापाला चालना मिळून ते अपराध असे होते आणि तरी जेथे पाप वाढले तेथे कृपा त्यापेक्षा विपुल झाली (रोम 5:18-21), "तर आता आपण काय म्हणावे ? कृपा वाढावी म्हणून आपण पापात राहावे काय ?" या बनावट तर्कशास्त्राला उत्तर देताना प्रेषित ठामपणे सांगतो, "कधीच नाही ! जे आपण पापाला मेलो, ते आपण ह्यापुढे त्यात कसे राहणार ?" (रोम 6 : 1-2). "भूत, वर्तमान आणि भविष्यकाळातील" आमच्या सर्व पातकांवर फक्त पांघरूण न घालता देवाचे नीतिमत्त्व **पापाचे सामर्थ्य मोडून काढते !**

जुन्या करारातील दोषार्पणाच्या उदाहरणावरून नीतिमान ठरवणारा विश्वास कसा असतो याची कल्पना येते. एखाद्या इस्राएली व्यक्तीला आपण अपराध केला असल्याची जाणीव होते आणि पापक्षमा मिळवण्याचा त्याचा प्रयत्न असतो; तेव्हा त्याने आपल्या कळपातून एक निर्दोष बकरा घेऊन तो दोषार्पण म्हणून याजकाकडे आणावयाचा असे. अर्पण वाहणारा पापबलीच्या डोक्यावर हात ठेवी, यातून त्याचे अर्पण करण्यात येणाऱ्या बलीबरोबर ऐक्य दिसून येई; हे करीत असतानाच हे अर्पण कोणत्या पातकांबद्दल केले जात आहे त्याची कबुली दिली जात असे. त्या बलीचे रक्त वाहत

असताना त्या अर्पणाबरोबरच पापी "मरण" पावत असे. अशाप्रकारे अर्पणाच्याद्वारे सहभागिता पुनःर्स्थापित होई. विश्वास ठेवणाऱ्या इस्राएलचा त्याच्या रदबदलीच्या अर्पणाद्वारे वेदीशी-म्हणजेच देवाशी-कराराने देऊ केलेल्या नवीकरणाच्या व नवजीवन देणाऱ्या सामर्थ्याशी थेट संपर्क होत असे.

अशाचप्रकारे आम्ही पापक्षमा मिळावी म्हणून ख्रिस्ताकडे येतो. **आमच्या** पातकांनीच त्याला वधस्तंभावर खिळले याची जाणीव आम्हाला होते. पश्चात्तापाने आणि विश्वासाने आम्ही ख्रिस्ताचे मरण **आत्मसात** करतो. याद्वारे आमच्या पातकांकरीता त्याचे मरण हे आमचे पातकासाठीचे मरण होते. तो आमच्या बदली आमच्या पातकासाठी मेला. ख्रिस्ताचे हे बलिदान समेट घडवून आणणारे आहे हे समजल्यामुळेच ख्रिस्ती लोकांनी पापात राहावे ही कल्पना पौल अगदी ठामपणे धुडकावून लावतो. "जे आपण पापाला मेलो ते आपण ह्यापुढे त्यात कसे राहणार ?" (रोम 6 : 2) याचाच अर्थ, **आपण ख्रिस्ती लोक ह्या नात्याने पापाला मेलो असताना ख्रिस्ती लोक म्हणून आपण यापुढे पापात कसे काय जगावे ?**

**आता येशू प्रभू आहे; परंतु आपणच प्रमुख असावे अशी मानवी स्वभावाची इच्छा आहे !**

एक महिला पार्ट्यांना जाण्याबद्दल कुविख्यात होती; परंतु शुभवर्तमान प्रसाराच्या एका सभेमध्ये तिचा पालट झाला. काही दिवसांनी एका रात्री तिच्या एका जुन्या मैत्रिणीचा फोन आला. तिने सांगितले, "आज रात्री एक मस्त पार्टी आहे. त्यात कसलेही बंधन नाही. अगदी मुक्तपणे सर्व गोष्टींची मुभा आहे, तर तू माझ्याबरोबर येशील का ?" यावर त्या महिलेने उत्तर दिले, "मला माफ कर. मी येऊ शकणार नाही. कारण **मी मेले आहे !**" पलीकडच्या बाजूने फोन बंद केल्याचा आवाज आला. अशा प्रकारे पापाला मरणे, त्यावर बाप्तिस्म्याचा शिक्का व मोहोर उठवणे (रोम 6:3-4), म्हणजेच शास्त्रलेखांनुसार परिवर्तन होऊन पालट होणे होय.

तथापी, परिवर्तन होऊन पालट होतो तेव्हा देव आम्हांला आमच्या पातकी अवस्थेतून बाहेर काढतो. तसे पाहिले तर **पातक करण्याच्या** आमच्या इच्छेपेक्षा; आमची पातकी अवस्था अधिक वाईट होती. अगदी स्वाभाविक परिवर्तनही पापाची समस्या सोडवू शकत नाही. (कदाचित् आमची आधी अशी समजूत असेल), आता पातकाचे वर्चस्व नसेल - सत्ता नसेल; पण लवकरच प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीच्या लक्षात येईल की पातक अद्याप शिल्लक आहे आणि ते आमच्या अंतरंगातील ख्रिस्ताच्या राज्याचे प्रतिस्पर्धी

म्हणून अहंकाराच्या रूपाने शिल्लक आहे. आता येशू प्रभू आहे; परंतु आपणच प्रमुख असावे अशी मानवी स्वभावाची इच्छा आहे !

पातकाचे हे शिल्लक राहिलेले "मूळ" खालील बाबींच्याद्वारे स्पष्ट होते.

- पत्रांमध्ये पावित्र्याच्या संबंधात केलेले सर्व आग्रहाचे उपदेश आणि प्रार्थना (2 करिंथ 7 : 1 ; 1 थेस्सल 4 : 48 ; 5 : 23-24)
- मंडळीचे सर्व महत्त्वपूर्ण महान विश्वासांगीकार कबूली आणि
- सरतेशेवटी प्रत्येक नीतिमान ठरलेल्या विश्वासणाऱ्याने नम्रपणे दिलेल्या कबुलीतून "ख्रिस्ताचे मन असावे" आणि "येशू चालला तसे चालावे" असा प्रयत्न. (1 करिंथ 2:16 ; 1 योहान 2 : 6).

शिल्लक राहिलेल्या पातकाच्या निरनिराळ्या व्याख्या केलेल्या आहेत त्या अशा

- "मूर्तिपूजेच्या आहारी गेलेले कठीन मन" (रिचर्ड एस. टेलर)
- "हट्टीपणाचा शेष राहिलेला भाग" (इ. स्टॅन्ली जोन्स)
- "आत्मगौरवाचा मोह" (मिलार्ड रीड)
- "माझ्या स्वतःसाठी माझ्या अधिकाराचा माझा दावा" (ओस्वाल्ड चेम्बर्स)

"आमची शत्रूशी गाठभेट झालेली आहे आणि तो शत्रू म्हणजे आम्ही स्वतःच आहोत !" असे विनोदी चित्रकथेतील पोगो हे पात्र सांगते. इंग्रजी भाषेतील sin ह्या शब्दातील अक्षरे वेगवेगळी लिहिली S-I-N तर मध्यभागी असलेले 'I' हे अक्षर स्वार्थी मन दर्शविते. एक प्राचीन आध्यात्मिक बोध खालीलप्रमाणे आहे.

**हे प्रभू, माझ्या भावाला नाही, माझ्या बहिणीला नाही,**
**तर मलाच स्वतःला प्रार्थनेची गरज आहे.**

शिल्लक उरलेला अहंकार अपवित्र विश्वासणाऱ्याच्या अंगात पसरतो. यासाठी पापाला **संपूर्णपणे** मरणे अगत्याचे आहे - **प्रत्यक्ष पापाला** मरण पावणे आवश्यक आहे. म्हणजेच "माझ्या स्वतःसाठी माझ्या अधिकाराचा माझा दावा" पूर्णपणे सोडून देणे. वेगळ्या शब्दात, **माझे परिवर्तन होऊन पालट होणे प्रत्यक्षात घडण्यासाठी** पवित्र असणे ही सूचना आज्ञावाचक आहे.

पौल रोमवासी ख्रिस्ती लोकांना आग्रहाचा, कळकळीचा उपदेश करतो. त्यांना जणू काही मरणातून जीवनात आणले आहे अशा प्रकारे त्यांनी स्वतःला देवाला एकदाच आणि कायमस्वरूपी "सादर करावे" असे तो आर्जवाने सांगतो. काही आज्ञावाचक

वचनानंतर तो पुन्हा ह्या शुभवर्तमानाकडे वळतो आणि मनुष्यांच्या "नैसर्गिक मर्यादांमुळे" तो याचे स्पष्टीकरण मानवी दृष्टिकोनातून करतो : तुमच्या देहस्वभावाच्या दुर्बलतेमुळे मनुष्यव्यवहाराप्रमाणे मी बोलत आहे; कारण जसे तुम्ही आपले अवयव स्वैराचार करण्याकरिता अमंगळपणा व स्वैराचार ह्यांस गुलाम असे समर्पण केले होते, तसे **आता आपले अवयव पवित्रीकरणाकरिता नीतिमत्त्वाला गुलाम असे समर्पण करा** (रोम 6 : 19). ओस्वाल्ड चेम्बर्स ह्यांना येथे काही गूढ-रहस्य आहे असे वाटते-पूर्वी आकंठ असे पापात बुडालेले पातकी आता लाजरे-बुजरे संत सज्जन होण्याचा मार्ग स्वीकारतात ! देवाची सार्वभौम सत्ता-अधिकार माझे अंतःकरण व जीवन यावर आहे. त्या सत्तेला आपल्या स्वतःचे संपूर्ण समर्पण करण्यास स्वतःचा स्वतःवरील अधिकार सोडून देणे हेच पाचारण आहे. आमच्यासाठी हेच आवाहन केलेले आहे.

शिल्लक रांहिलेले पातक हे स्पष्टपणे आत्मगौरवच आहे. माझ्यातील किती भाग देवाला समर्पित करून शुद्ध-पवित्र करायला परवानगी द्यायची हे मीच निश्चित करणार-ठरवणार. हा सरळ सरळ आत्मगौरवच झाला. "**पवित्रीकरणाकरिता**" सर्व हक्क-अधिकार देवाला समर्पित करण्याचे आवाहन केलेले आहे. यालाच वेस्ली कधी कधी "संपूर्ण पवित्रीकरण" असे म्हणत असत. ह्या पवित्रीकरणामध्ये अंतःकरण शुद्ध करण्याची दैवी कृती आणि त्यातून निर्माण होणारे पवित्र जीवन अशा दोन्ही गोष्टी आहेत. पुढे दिलेल्या परिच्छेदातून हे अधिक स्पष्ट होईल : "परंतु आता तुम्हांला पापापासून मुक्त केल्यावर तुम्ही देवाचे गुलाम झाल्यामुळे ज्याचा परिणाम पवित्रीकरण असे फळ तुम्हांला मिळत आहे, त्याचा शेवट तर सार्वकालिक जीवन आहे." (रोम 6 : 22); किंवा "पण आता तुम्ही पापापासून मुक्त केलेले असता व देवाचे दास झालेले असता, तुम्हांला तुमचे फळ पवित्रीकरणाकरिता मिळत आहे आणि त्याचा शेवट तर सर्वकालचे जीवन आहे" (पं. रमाबाईंचे भाषांतर)

संपूर्ण आत्मत्यागामुळे देवाच्या पवित्रीकरणाच्या सामर्थ्याला पूर्णतः मुक्तपणे कार्य करता येते. याचे सुंदर पूर्वचिन्ह इब्री गुलामाच्या आत्मसमर्पणामध्ये पहायला मिळते. हा गुलाम योबेल वर्षी मुक्त होऊन जाण्यास नकार देतो. तो म्हणतो, "माझ्या धन्यावर व माझ्या बायकोमुलांवर मी प्रेम करितो, मी मुक्त होऊन जाणार नाही" (निर्गम 21 : 5) मग तो आपल्या धन्याला स्वतःचे समर्पण करतो. धनी त्याचा कान अरीने टोचतो आणि त्याला आयुष्यभरासाठी "प्रीतीचा दास" करतो. (पाहा 2 - 6 वचने) हे परिपूर्ण स्वातंत्र्याचे दास्यत्व स्वीकारणे होय.

या अशा स्वतःच्या समर्पणाच्या कृतीतून ख्रिस्त आपले पवित्रीकरणाचे राज्य माझ्या अंतरंगात स्थापन करतो आणि मग मला अत्यंत नम्रपणे आणि देवाची स्तुती करून

म्हणता येते, "मी ख्रिस्ताबरोबर वधस्तंभावर खिळलेला आहे आणि ह्यापुढे मी जगतो असे नाही, तर ख्रिस्त माझ्याठायी जगतो." (गलती 2 : 20).

## मानवी स्वभाव : त्याला ख्रिस्तामध्ये वळण लावले पाहिजे

मी पापाला पूर्णपणे मेलो आहे, याचा मला अनुभव आला आहे आणि आता माझ्या अंतरंगात ख्रिस्त आत्म्याच्या सामर्थ्याने राज्य करीत आहे. असे असले तरी मी हे महत्त्वपूर्ण नाते कसे टिकवून ठेवतो-ठेवते यावरच माझे विजयातील सातत्य अवलंबून आहे. केवळ यामुळेच मला विजयाची हमी मिळते." मी ख्रिस्ताबरोबर वधस्तंभावर खिळलेला आहे." हा ग्रीक भाषेमध्ये पूर्ण काळ असून त्यातून ठामपणे असे सूचित होते की **"मी ख्रिस्ताबरोबर वधस्तंभावर खिळलेला होतो आणि आताही खिळलेला आहे."** पवित्र जीवन म्हणजे क्षणाक्षणाला टिकवून ठेवलेले नाते होय. आत्म्याच्या शिस्तीमध्ये राहण्यास त्याच्या अधीन झाले की हे शक्य होते. "मी तर म्हणतो, आत्म्याच्या प्रेरणेने चाला" पौल पुढे गलतीकरांस लिहितो, "म्हणजे तुम्ही देहवासना पूर्ण करणारच नाही." (गलती 5 : 16).

विजयी जीवन सातत्याने जगण्याला माझ्या स्वाभाविक स्वभावाने आडकाठी येते. हा स्वाभाविक स्वभाव पूर्ण पवित्रीकरणाच्या पलीकडे असतो. पवित्र शास्त्राच्या एका इंग्रजी अनुवादामध्ये पौलाचा हा विचार नेमक्या शब्दांत पकडला आहे, **"मी ख्रिस्ताबरोबर वधस्तंभावर खिळलेला आहे. इतःपर मी स्वतः जगत नाही"** (गलती 2:20,) संपूर्ण शास्त्रपाठामध्ये "मी" आणि "माझे" हे शब्द वारंवार पुन्हा पुन्हा आलेले पहायला मिळतात. या शब्दांवरून उपजत स्वभाव हा वधस्तंभावर खिळलेल्या पापमय स्वभावाच्या पलीकडे जाऊनही अस्तित्वात असतो हे अधोरेखित होते. ख्रिस्ताबरोबर वधस्तंभावर खिळले जाण्यातून स्वार्थी-मी पापाला मरतो; म्हणूनच मानवी स्वभाव मरतो असे म्हणणे हे चुकीचे आहे. "मी मरण पावलो आणि मी कृपेशिवाय मरण पावलो" एका उपदेश करणाऱ्यांनी सांगितले, "परंतु मी केवळ मला मारणाऱ्या गोष्टींनाच मेलो." आमचा मानवी स्वभाव (देह-स्वभाव) तेथेच असतो.

याशिवाय, पवित्र जीवन हे "देहामधील" जीवन आहे : "आता **देहामध्ये जे माझे जीवित आहे** ते देवाच्या पुत्रावरील विश्वासाच्या योगाने आहे; त्याने माझ्यावर प्रीती केली व स्वतःला माझ्याकरिता दिले" (गलती 2:20) असे पौल म्हणतो तेव्हा त्याच्या म्हणण्याचा अर्थ असतो, की मी ह्या रक्त-मांसाच्या देहात, ज्या देहाला सर्वप्रकारच्या भावभावना व इच्छा आहेत अशा देहामध्ये पवित्र जीवन जगतो; जाता जाता, देवाच्या

पुत्रालाही देह धारण करताना अशाच प्रकारचे शरीर मिळाले होते. येशू एखाद्या खऱ्याखुऱ्या मनुष्याप्रमाणे "सर्वप्रकारे आपल्याप्रमाणे पारखलेला होता; तरी निष्पाप राहिला" (इब्री 4 : 15). तो ह्या भौतिक, शारीरिक देहामध्ये ह्या देहाच्या सर्व इच्छा, भावना व तीव्र गरजा या गोष्टींसह राहिला तरीही तो पवित्र जीवन जगला. आपल्यालाही, त्याच्या ठायी वसती करणाऱ्या आत्म्याच्या सामर्थ्याने अशा प्रकारचे जीवन जगता येते ! प्रेषित विचारतो, "तुमचे शरीर, तुम्हांमध्ये वसणारा जो पवित्र आत्मा देवापासून तुम्हांला मिळाला आहे त्याचे मंदिर आहे हे तुम्हांस ठाऊक नाही काय ? आणि तुम्ही स्वतःचे मालक नाही; कारण तुम्ही मोलाने विकत घेतलेले आहा, म्हणून तुम्ही आपल्या शरीराने देवाचे गौरव करा" (1 करिंथ 6 : 19-20) ।

आणखी एका ठिकाणी पौल लिहितो, "म्हणून तुम्ही ख्रिस्ताबरोबर उठविले गेला आहा, तर ...... तेथल्या वरील गोष्टी मिळविण्याचा यत्न करा........ कारण तुम्ही मृत झाला आहा आणि तुमचे जीवन ख्रिस्ताबरोबर देवामध्ये गुप्त ठेवलेले आहे...... तर पृथ्वीवरील तुमचे अवयव म्हणजे जारकर्म, अमंगळपणा, कामवासना, कुवासना व लोभ ह्याला मूर्तिपूजा म्हणावे - हे जिवे मारा." (कलस्सै 3 : 1 3, 5)

"तुम्ही देहाच्या अधीन नाही" (रोम 8 : 9); असे पौल रोमकरांस लिहितो, तेव्हा त्याच्या म्हणण्याचा अर्थ असतो की, ख्रिस्ती लोक "देहस्वभावाप्रमाणे" जीवन जगत नाहीत (वचन 4 - 5, 12-13), त्यांचे "चित्त दैहिक गोष्टींकडे नसते" (पाहा वचन 5 - 7), तसेच विषयलोलुपता किंवा आत्मावलंबन याकडे नसते (पाहा वचन 1-7). बोलताबोलता पौल लिहितो, "आत्म्याच्याद्वारे निष्पन्न होणारे फळ...... इंद्रियदमन...... जे ख्रिस्त येशूचे आहेत त्यांनी विकार व वासना ह्यांच्यासह देहस्वभाव वधस्तंभावर खिळला आहे. आपण जर आत्म्याच्या सामर्थ्याने जगतो, तर आपण आत्म्याच्या प्रेरणेने चालावे." (गलती 5 : 22 - 25).

"या जगामध्ये मला पवित्र जीवन कसे काय जगता येईल ?" एका मनुष्याने ख्रि. जॅक फोर्ड ह्यांना प्रश्न विचारला; तेव्हा ते मँचेस्टर, इंग्लंडमधील ब्रिटिश आईल्स नाझरीन कॉलेजचे रेक्टर होते. यावर "येशू पवित्र जीवन जगला यावर तुमचा विश्वास आहे का ?" असा प्रतिप्रश्न फोर्ड ह्यांनी केला.

"अर्थातच् आहे !" त्या मनुष्याने उत्तर दिले.

"मग आता प्रश्न असा आहे, फोर्ड पुढे बोलू लागले", तुम्ही येशू ख्रिस्ताला त्याचे पवित्र जीवन तुमच्यामध्ये जगू देण्यास परवानगी द्याल का ?"

हाच प्रश्न महत्त्वाचा आहे.

शास्त्रलेखामध्ये 'प्रतिक्रिया' आणि 'दाबून टाकणे' अशा दोन्ही गोष्टींचा समावेश असलेला स्पष्ट सिद्धांत आहे, यात पापाचा समावेश नाही. (ह्या पापाचा पवित्र करणाऱ्या कृपेने नाश केलेला आहे) तर पातक करण्यास प्रवृत्त करणाऱ्या आमच्या दैहिक मनोविकारांचा यात समावेश आहे. रोम 8 मध्ये पौल ताकीद देतो, "कारण जर तुम्ही देहस्वभावाप्रमाणे जगलात तर तुम्ही मरणार आहा; परंतु जर तुम्ही आत्म्याने शरीराची कर्मे ठार मारलीत तर जगाल." (वचन 13) याला शास्त्रलेखनासंबंधीची प्रतिक्रिया म्हणता येईल. पुन्हा पौल लिहितो, "तर मी आपले शरीर कुदलतो व त्याला दास करून ठेवतो, असे न केल्यास मी दुसऱ्यांस घोषणा केल्यावर कदाचित् मी स्वतः पसंतीस न उतरलेला असा ठरेन" (1 करिंथ 9 : 27) ही "दाबून टाकणाऱ्याची" क्रिया झाली.

नव्या कराराचा अभ्यास करणारे एक अभ्यासक लिहितात की "सोमा (शरीर)" हा पौल वापरत असलेला शब्द "आपल्या व्यक्तिमत्त्व" ह्या शब्दाला अगदी जवळचा आहे. आम्हांला "शरीराची कर्मे ठार मारण्याची" आज्ञा केलेली आहे, म्हणजेच आमचे भावनिक तसेच भौतिक प्रेरक शक्ती म्हणजेच आमच्या मनाच्या सर्व यांत्रिक प्रवृत्ती (बुद्धीला पटेल असा तर्क करणे, मूर्त कल्पना, विरोध आणि इतर) यांचा बिमोड करणे. सोबतीला शरीराच्या-देहाच्या उपजत गरजा व प्रेरणा आहेतच. आत्म्याने परिपूर्ण विश्वासणारा हा उपजत नैसर्गिक प्रवृतींसह मानवी अहंकार असा उरतो; अद्याप त्याच्याठायी फ्रॉईड म्हणतात त्याप्रमाणे "अहंता" असते. ह्या अहंतेबरोबर तिचा दबाव आणि सततची टोचणी असते. हे मनोविकार सद्सद्विवेकबुद्धीच्या पातळीखाली असल्याने ते नैतिकदृष्ट्या उदासीन-तटस्थ असतात; परंतु ते सहजपणे पातकाच्या मोहात पाडणारे असतात आणि म्हणूनच त्यांच्यावर वसती करून राहणाऱ्या आत्म्याच्या सामर्थ्याने नियंत्रण ठेवणे व ताबा ठेवणे अगत्याचे आहे. ह्या 'प्रेरकशक्ती' आमच्यात नाहीत असे म्हणून आम्ही त्या दडपून-दाबून टाकतो तेव्हा आपण स्वतःची फसवणूक तर करतोच; पण त्याचबरोबर आपले स्वास्थ्यही बिघडते. ह्या प्रेरक शक्तींना आपल्याला आत्म्याच्या सहाय्याने "मोडून" काढता येते. याबद्दल देवाला सांगून त्यावर विजय मिळवून देण्याची त्याला परवानगी देता येते. (1 योहान 1 : 7-8)

हे समजण्यास सोपे व्हावे याकरिता डब्लू. ई. सँग्स्टर[1] ह्यांनी आपल्या "**द प्युअर इन हार्ट**" ह्या पुस्तकात एक परिच्छेद दिलेला आहे. यात ते आग्रहाने सांगतात, "अर्धजागृत अवस्थेतील जीवनाचा नीती-अनितीशी संबंध नसतो आणि जागृत अवस्था जोपर्यंत इच्छित उद्दिष्ट पूर्ण करीत नाही तोवर ते जीवन म्हणजे फक्त उपजत स्वभाव वा 'प्रतिक्रिया' असेच म्हटले पाहिजे. ते पुढे म्हणतात :

कधी कधी मला अचानक हेवा-मत्सर वाटू लागतो, तो 'मी'पणा असतो का ? अगदी त्याक्षणी मला वाटते-जाणवते ते काय असेल ? अहंकारची एखादी मोठी लाट माझे मन कठीण करते तेव्हा तो 'मी'पणा असतो का ? एखादी ऐहिक भावना माझा देह ढवळून काढते तेव्हा तो 'मी'पणा असतो का ?

अर्थात, काही क्षण तो मीच आहे असे वाटते..... ऐहिकपणा, अहंकार, द्वेष-मत्सर, आत्मदया किंवा यासारखे वाईट विचार हे माझे आहेत ? - ज्याक्षणी मला जाणवतात तेव्हा ते माझेच असतात का ? मी नाकारले किंवा स्वीकारले, तरी ते माझेच असतात का ?

मला काही तसे वाटत नाही. एक जागृत नीतिमत्वाची चाड असणारी व्यक्ती म्हणून माझी इच्छा जोपर्यंत हे विकार आपलेसे करीत नाही तोपर्यंत ते माझे नसतात. नीती-अनीतीशी संबंध नसलेल्या भावना माझ्याजवळ आहेत. काही आठवणी व काही करण्याचा कल माझ्याजवळ आहेत; परंतु एक व्यक्ती या नात्याने आणि पवित्र आत्म्याच्या साहाय्याने पशूवत् स्वभावाला लगाम घालता येतो, त्याला जखडून ठेवता येते, त्याची नांगी मोडून त्यावर नियंत्रण मिळवता येते. यातील कोणत्याही गोष्टींची, देवाच्या सहभागीतेमधून मिळणाऱ्या गोष्टी सोडून, माझ्या नैतिक जीवनात भर घालण्याची आवश्यकता नाही. ज्याक्षणी ह्या भावना मला ढवळून काढतात, माझ्या नैतिक जीवनाशी दोन हात करू पाहतात, माझ्या दृष्टीने हे वाईट असते, तरीही हा केवळ मोहच असतो. समजा, ह्या भावनेच्या आहारी मी गेलो आणि त्यात माझ्या कल्पनेची भर घातली, तर ती माझ्या स्वतःची होते. मग मी कृती प्रत्यक्षात केली नाही तरी त्या भावनेचा स्वीकार केल्याने ती माझी होते.

ही भावना मी माझी म्हणून घेणार नाही. तर पवित्रजन कशा प्रकारे तत्परतेने ही गोष्ट देवाच्या प्रकाशात आणतात ते मी शिकून घेईन आणि ती गोष्ट वाईट आहे असे दिसताच प्रार्थनेने तिचा पुरता बिमोड करीन.

ही भावना, ही मनोप्रेरणा कधीच माझी नव्हती. तर तो एक उपजत नीती-अनीतीशी संबंध नसलेला स्वभाव होता. ही फक्त नैतिक उंची वाढविण्यासाठीची उर्मी आहे. देवाच्या शुभ्र स्वच्छ प्रकाशात त्याची दुष्ट प्रवृत्ती लक्षात आली आणि ती भावना ती मनोप्रेरणा नैतिक बंधन कधीच पार करू शकली नाही.

प्रेषित योहान लिहितो, "मुलांनो, तुम्ही देवाचे आहा आणि त्यांजवर (खोटे आत्मे / संदेष्टे) तुम्ही जय मिळविला आहे, कारण जगात जो आहे त्याच्यापेक्षा तुम्हांत जो आहे तो मोठा आहे." (1 योहान 4 : 4) पुढे तो म्हणतो, "आणि ज्याने जगावर जय मिळविला तो म्हणजे आपला विश्वास" (5 : 4).

## खरा स्वभाव : "तो ख्रिस्तामध्ये प्रत्यक्ष आचरणात आणला पाहिजे. आता मी नाही तर ख्रिस्त आहे"

येशूने शुभवर्तमानामध्ये जे सांगितले तेच पौल गलतीकरांस पत्रांमध्ये सांगत असल्याचे माझ्या एकदा लक्षात आले. जर मी आत्मत्याग करून दररोज माझा वधस्तंभ उचलून घेऊन त्याला अनुसरले, तर मला स्वयंपूर्णता लाभेल (लूक 9 : 23-24)

**स्वतःचा मनोदय पूर्ण करणे हाच नव्या युगाच्या चळवळीचा उद्देश आहे**

**ख्रिस्ताचा मनोदय पूर्ण करणे हाच शुभवर्तमानाचा उद्देश आहे**

वधस्तंभाचा मार्ग हाच वैयक्तिक स्वयंपूर्णतेचा मार्ग आहे, याहून अन्य काही सत्य नाही, तरीही सर्वांगीण ख्रिस्ती दृष्टिकोनातून **स्वयंपूर्णता** ही ख्रिस्ताबरोबर खिळले जाण्यातून मिळणारी केवळ एक गोष्ट आहे. आमचे ख्रिस्ताबरोबर खिळले जाणे यातून **दैवी स्वभावाचा मनोदय पूर्ण करते** - "मी नाही तर ख्रिस्त" हा देवाने ठरवलेला उद्देश आहे. **स्वतःचा मनोदय पूर्ण करणे** हा तथाकथित नव्या युगाच्या चळवळीचा आदर्श आहे; **ख्रिस्ताचा मनोदय पूर्ण करणे** हा शुभवर्तमानाचा हेतू आहे.

माझा अहंकारी-अहंमान्य स्वभाव वधस्तंभावर खिळण्यामागे देवाचा हेतू आहे तो असा की, माझ्यामध्ये ख्रिस्ताने पुन्हा देहधारण करावे आणि त्याचे पवित्र आस्थेने सेवा करणारे जीवन माझ्या दररोजच्या, निस्तेज कंटाळवाण्या आयुष्यात जगता यावे. आपल्या ख्रिस्तामधील जीवनाविषयी बिल ब्राईट[2] आपल्याला सांगतात :

"उपकारस्तुतीचे स्तोत्र म्हणतच मी बहुतेक सकाळी जागा होतो. अंतरंगात उपकारस्तुतीची भावना असते : "हे प्रभू, मीं तुझा आहे म्हणून मी तुझे आभार मानतो. तू माझ्याठायी आपली वसती करून आहेस त्याबद्दल मी तुझा ऋणी आहे. तू माझ्या पातकांची क्षमा केलीस याबद्दल तुला धन्यवाद देतो, तुझे उपकार मानतो. मी तूझे मूल आहे म्हणूनही तुझे उपकार मानतो. आता ह्या दिवसाच्या आरंभी आणि संपूर्ण दिवसभरात देखील माझ्या संगती राहा, तुझी प्रीती माझ्या अंतरी असू दे, माझे बोलणे-चालणे-विचार करणे यावर तुझे नियंत्रण असू दे. आणखी एका गोष्टीबद्दल मी तुला धन्यवाद देतो, या पृथ्वीवर तू असताना तू केल्या त्यापेक्षा अधिक महान गोष्टी माझ्याद्वारे करण्याचे तू अभिवचन दिले आहेस. आज दिवसभरात अशा गोष्टी तू कर. तुझे थोरपण, तुझे

सामर्थ्य, माझ्या जीवनातील तुझे सामर्थ्य यावर माझा विश्वास आहे आणि माझ्यामध्ये व माझ्याद्वारे तुझ्या इच्छेप्रमाणे कार्य घडवून आण. यासाठी माझे तुला आग्रहाचे बोलावणे आहे.''

मग मी बिछान्यातून उठून गुडघ्यावर बसतो. याप्रकारे मी औपचारिकरित्या त्या प्रभुपणासमोर माझे मस्तक लववतो.

ख्रिस्ताबरोबर अशाप्रकारे समरूप होऊन एकरूप होणे यातच पवित्र जीवनाचे रहस्य व साधेपण आहे.

**इच्छा तुझी, हे देवा, इच्छा तुझी**
**भटकू देऊ नको मला, हस्ते तुझ्या धरी**
**आत्मा तुझा माझ्या येऊ दे अंतरी**
**ख्रिस्त दिसू दे सर्वां दिगंतरी ।**

### तुमच्या आध्यात्मिक वाटचालीसाठी प्रकाशशलाका / मार्गदर्शन

### मुख्य आधारस्तंभ

प्रस्तुत पाठ तुम्ही रविवार शाळेच्या वर्गाला शिकवणार असाल, तर त्याकरिता तुम्हांला दोन किंवा तीन तासिका लागतील. म्हणजे मग त्यामध्ये तुम्हांला पापमय स्वभाव वधस्तंभावर खिळण्याची आवश्यकता, नैसर्गिक स्वभावाला वळण लावण्याची गरज आणि खरा स्वभाव परिपूर्ण करण्याची गरज ह्या गोष्टी स्पष्टपणे समजावून देता येतील.

पाठाची तयारी करताना त्याची उद्दिष्टे ठरविणे ही झाली तुमची पहिली पायरी. एक वेगळा कागद घ्या आणि त्यावर पुढील प्रश्नांची उत्तरे द्या.

1. **माझ्या विद्यार्थ्यांना मला कशाचे ज्ञान करून द्यायचे आहे ?** म्हणजेच, कोणत्या संकल्पना, संज्ञा, सत्य आणि वास्तव गोष्टी त्यांना समजणे आवश्यक आहे ?
2. **माझ्या विद्यार्थ्यांना मला कशाची जाणीव करून द्यायची आहे ?**

   एखादी गोष्ट मन लावून शिकली तरच शिकता येते, नाहीतर ती नुसतीच घोकंपट्टी होते. त्यांच्या मनावर कोणते गुण, कोणत्या आशा, इच्छा, कोणते हेतू, कोणती मूल्ये वगैरे गोष्टी मला बिंबवायच्या आहेत ?

3. **माझ्या विद्यार्थ्यांनी काय करावे याबद्दल माझी इच्छा काय आहे ?**

मी दिलेल्या शिक्षणातून काय साध्य झाले पाहिजे - प्रार्थना, समर्पण, भक्ती करणे, साक्ष देणे, संपूर्ण पवित्रीकरण व्हावे यासाठी प्रयत्न करणे ?

तुम्हांला एखादा आध्यात्मिक मित्र वा मैत्रिण किंवा प्रार्थना करणारा सहकारी असेल, तर त्याला किंवा तिला तुमच्याबरोबर यामध्ये सहभागी करून घ्या.

## आध्यात्मिक पायऱ्या

### 1. हरणाला वाचवणे

"मला एक स्वप्न पडले" एक मनुष्य आपल्या पाळकांना सांगत होता" "स्वप्नात मी एका पिंजऱ्याकडे गेलो. त्यात बरेच वन्यपशू भरलेले होते. त्या पिंजऱ्यात पुढच्या बाजूला खादाड-आधाशी सिंह, वाघ आणि अस्वल हे प्राणी होते, तर पिंजऱ्याच्या मागच्या बाजूला एक भावुक, मोहक, टपोऱ्या डोळ्यांचे हरिण होते. त्या मागच्या हरणाला काहीतरी खायला देण्याचा माझा प्रयत्न होता; पण पिंजऱ्यात पुढे असलेले हिंस्र पशू ते सगळे खाणे अधाशासारखे फस्त करीत होते. शेवटी ते भुकेले हरिण उपासमारीने अशक्त होऊन मरून गेले."

समुपदेशन करणारे पाळकांनी त्याला सांगितले, "ते हरिण म्हणजेच तुझा खरा स्वभाव-तुझ्या स्वभावातील सर्वोत्कृष्ट भाग होय. तुझ्यामधील हाच भाग देवाच्या प्रतिमेप्रमाणे घडवलेला आहे. स्वप्नात दिसलेले वाघ, सिंह आणि अस्वले म्हणजे तुझ्यातील अधाशीपणा, दुःख, राग, वासना वगैरे गोष्टी असतील आणि या गोष्टी तुझ्या जीवनातील सर्वोत्तम गोष्टी गिळंकृत करीत आहेत."

या स्वप्नाचा संबंध तुम्हांला या पाठातील मुद्द्यांशी कशाप्रकारे लावता येईल ? तुमच्या स्वतःच्या आध्यात्मिक वाटचालीशी ह्या स्वप्नकथेचा संबंध तुम्ही कसा जोडाल ? तुमच्या आत्ताच्या जीवनाशी हे स्वप्न कशाप्रकारे संबंधित आहे ?

### 2. ख्रिस्ताचा मनोदय

कित्येक लोकांसाठी स्वयंपूर्णता किंवा आत्मसाक्षात्कार हेच जीवनातील आद्य आणि सर्वोच्च उद्दिष्ट असते. लेखक सांगतो की, **ख्रिस्ताचा मनोदय** पूर्ण करणे हेच शुभवर्तमानाचे सर्वोच्च उद्दिष्ट आहे.

या कल्पनेवर विचार करा. ख्रिस्ताने आपले पवित्र जीवन तुमच्याद्वारे जगावे ही गोष्ट प्रत्यक्षात घडून येण्यापूर्वी कोणते बदल होणे आवश्यक आहेत ?

खरी पवित्रता नेहमीच निःस्वार्थी सेवेमधून व्यक्त होत असते. **ख्रिस्त-समजणे** आणि **ख्रिस्ती सेवा** ह्यांचा एकमेकांशी कसा संबंध आहे ?

जॉन वेस्ले ह्यांनी म्हटले की, "मोहरीच्या दाण्याएवढा विश्वास असणारा" मनुष्य दुसऱ्यांसाठी "काम करील आणि करीत राहील" तो स्वतःचा विचार न करता इतरांची सेवा करील. तुमचा विचार काय आहे ?

तुमचा एखादा आध्यात्मिक मित्र वा प्रार्थना करणारा सहकारी असेल, तर त्याच्याबरोबर याविषयी चर्चा करा आणि एकत्रित प्रार्थना करा.

### 3. नैसर्गिक स्वभाव

काही लोकांना वाटते की, एकदा का तुम्ही पूर्णपणे पवित्र झालात की मग नैसर्गिक स्वभावाची काळजी स्वयंप्रेरणेने घेतली जाईल. नैसर्गिक स्वभावातील मानसिक व शारीरिक-भौतिक ऊर्मी आणि इच्छा यांकडे वेगळे लक्ष देण्याची जरूर नाही असे त्यांना वाटते. पौल आणि ग्रेटहाऊस नावाचे लेखक म्हणतात की, "आमच्यातील अत्यंत पवित्र मनुष्याने देखील देहाला "दास" करून ठेवले पाहिजे. देहाच्या शारीरिक तसेच मानसिक आकांक्षा व इच्छा यांवर नियंत्रण ठेवले पाहिजे. याबद्दल तुमचे मत काय आहे ? या प्रश्नावर तुमच्या आध्यात्मिक वाटचालीतील कोणते अनुभव प्रकाश टाकतात ?

4. पातकी स्वभाव वधस्तंभावर खिळणे अगत्याचे आहेच; परंतु देवाने दिलेले व्यक्तित्व नष्ट करणे या दोन्ही गोष्टी भिन्न आहेत. असा फरक यात करणे किती महत्त्वाचे आहे ? व्यक्तित्व हे मानवपणातील देवाच्या प्रतिरूपाचा एक भाग आहे का ?

## उपयोगात आणावयाची साधने

मंडळीतील उपासना, सभा, वर्ग आणि अगदी पाठ-धडे यांनाही आशीर्वादांची आवश्यकता आहे. आता ह्या पाठामधून सांगितले त्यानुसार तुम्ही "पवित्र भूमीवर" उभे आहात, तर यासाठीचे आशीर्वचन लिहा. तुमच्या विचारांना चालना मिळावी याकरिता आम्ही ही पुढील गीत देत आहोत.

**पापी आम्ही हे प्रभू, आम्हा क्षमा करी,**
**पावित्र्याने तुझ्या आम्हा सर्वा सुधारी**
**कसे असावे आम्ही, तू आज्ञा करी**
**दान तुझे देवा, मुकुट आम्हा डोक्यावरी**

**- जॉन वेस्ले**

(वैयक्तिक प्रार्थना पुस्तिका, अप्रकाशित)

हे प्रभू, ... अहंकार किंवा स्वार्थ, लोभ किंवा सूड, क्षुद्र विचार आणि निःसत्व विचार यांसारख्या गोष्टींनी माझा आत्मा मलिन होऊ देऊ नकोस ....... माझा देह माझ्या आत्म्याच्या अधीन राहावा आणि माझा देह व आत्मा हे दोन्ही येशूचे दास व्हावेत.

*परंतु आपल्या मुखांवर आच्छादन नसलेले आपण सर्व जण आरशाप्रमाणे प्रभूच्या वैभवाचे प्रतिबिंब पाडीत आहो आणि प्रभू जो आत्मा त्याच्याद्वारे तेजस्वितेच्या परंपरेने, आपले रूपांतर होत असता आपण त्याच्याशी समरूप होत आहो.*

2 करिंथ 3 : 18.

# 7

# दैवी रूपांतरित प्रतिमा

मोशे सीनाय पर्वतावरून उतरला तेव्हा त्याच्या हातात साक्षपटाच्या दोन पाट्या होत्या आणि ''परमेश्वराशी संभाषण केल्यामुळे त्याच्या चेहऱ्यांतून तेजाचे किरण निघत होते.''(निर्गम 34 : 29) या तेजाच्या किरणांनी अहरोन व इस्राएल लोकांचे डोळे दृष्टिहीन होऊ नयेत यासाठी मोशे त्यांच्याशी बोलताना आपल्या चेहऱ्यावर आच्छादन-बुरखा घालीत असे.

ख्रिस्ताच्या नव्या कराराची तुलना मोशेशी करण्यात आलेल्या कराराशी करताना, मोशेचे आपले तोंड बुरख्याने झाकून घेण्यामध्ये अधिक सखोल हेतू असल्याचे पौल सांगतो : त्याचा चेहरा ज्या तेजाने न्हाऊन निघाला होता ते तेज **नाहीसे होत** चालले आहे, ही बाब उघड होऊ नये यासाठी तो आपला चेहरा झाकून घेत असे. लोकांनी त्या नाहीशा होणाऱ्या तेजाकडे एकसारखी दृष्टी लावू नये म्हणून तो तोंड झाकून घेई. पौल सांगतो, ''इस्राएल लोकांनी जे नाहीसे होत चालले होते त्या तेजाकडे एकसारखी दृष्टी लावू नये म्हणून मोशे आपल्या मुखावर आच्छादन घालीत असे, तसे आम्ही करीत नाही...... परंतु आपल्या मुखांवर आच्छादन नसलेले आपण सर्वजण आरशाप्रमाणे प्रभूच्या वैभवाचे प्रतिबिंब पाडीत आहो आणि प्रभू जो आत्मा, त्याच्याद्वारे तेजस्वितेच्या परंपरेने, आपले रूपांतर होत असता आपण त्याच्याशी समरूप होत आहोत.'' (2 करिंथ 3 : 13, 18)

प्रस्तुत प्रकरणाचे शीर्षक हे फिनिस एफ्. ब्रीझी[1] ह्यांच्या उपदेशातून घेतलेले आहे. यामध्ये त्यांनी पवित्रिकरणाविषयी त्यांचे मत व्यक्त केले आहे. पवित्रिकरण म्हणजे विश्वासणाऱ्याचे ख्रिस्ताशी साधर्म्य असणाऱ्या रूपात रूपांतर होणे होय.

पवित्रीकरण ही एक प्रक्रिया असून त्यामध्ये विश्वासणाऱ्याचे "देवाची प्रतिमा, नीतिमत्व आणि खरी पवित्रता ह्यामध्ये नवीकरण" होते; जॉन वेस्ली यांनी पवित्रीकरणाविषयी सांगितलेली मुख्य गोष्ट डॉ. ब्रीझी सांगत आहेत.

सदर प्रक्रिया म्हणजे पेचप्रसंगांची मालिकाच होय. विश्वासणाऱ्याचे अपराध व पातकाचे सामर्थ्य यापासून (परिवर्तनामध्ये), पातकाचे मूळ व अस्तित्व यापासून (संपूर्ण पवित्रीकरण) आणि शेवटी पातकाच्या परिणामांपासून (गौरवीकरणामध्ये) सुटका हे या प्रक्रियेत अंतर्भूत आहे; परंतु ही एकसंघ आणि एकच उद्देश असलेली प्रक्रिया आहे. यामध्ये आमची वैयक्तिक आणि संयुक्तरीत्या अशा दोन्ही प्रकारे "ख्रिस्ताच्या पूर्णतेप्रत" पुनःस्थापना होते. (इफिस 4 : 13).

ख्रिस्ताबरोबरच्या नातेसंबंधामध्ये वाढ होत राहणे म्हणजे पुढीलप्रमाणे धावा करणे.

**तुझ्यासारखा व्हावा मी देवा, तुझ्यासारखा,**

**शुद्ध, धन्य तू माझा तारणारा !**

**माधुर्य तुझे, पूर्णत्व तुझे,**

**हृदयावर माझ्या प्रतिमा तुझी सजे !**

**पवित्रीकरण**

आदामाचे पतन झाले तेव्हा त्याच्याठायी असलेली देवाची प्रतिमा त्याने गमावली. याच प्रतिमेमध्ये त्याला घडवले होते. तसेच मुळात त्याच्याठायी असलेले देवाचे गौरवही त्याने नासवले; परंतु देवाची स्तुती असो,

दूसरा आदाम सामना करण्यासाठी

आणि सुटका करण्यासाठी आला[2]

ख्रिस्त हा दूसरा आदाम असून तो देवाची प्रतिमा होता, त्याच्याठायी देवाच्या प्रतिमेची पुनःस्थापना झाली. ख्रिस्ताच्याठायी असणे म्हणजे" सत्यापासून निर्माण होणारे नीतिमत्व व पवित्रता ह्यांनी युक्त असा देवसदृश निर्माण केलेला नवा मनुष्य धारण करणे" (इफिस 4 : 24).

आमचे देवाच्या प्रतिमेमध्ये नवीकरण होणे ही एक कायम सुरू राहणारी प्रक्रिया आहे. यामध्ये देवाची मनोवृत्ती व गौरव या गोष्टी आपल्याला पुन्हा मिळत असतात. कलस्सैकरांस पौल लिहितो, "कारण तुम्ही जुन्या मनुष्यास त्याच्या कृतींसह काढून टाकले आहे आणि जो नवा मनुष्य, आपल्या निर्माणकर्त्याच्या प्रतिरूपाप्रमाणे पूर्ण ज्ञानात नवा केला जात आहे, त्याला तुम्ही धारण केले आहे." (कलस्सै 3:9-10) खरोखर आपण "प्रभू जो (जीवन देणारा) आत्मा याच्याकडूनच गौरवापासून गौरवात असे त्याच्या प्रतिरूपात पालटले जातो" (2 करिंथ 3:18 पं. रमाबाई ; 1 करिंथ 15 : 45).

हे होत असतानाच, आपण सर्वजण तर ख्रिस्ती आहोतच. तसेच खरोखर आपले पवित्रीकरण झाले असले तरी आपण "देवाच्या गौरवाला उणे पडलो आहोत." (रोम 3 : 23); ख्रिस्ताचे दुसरे येणे होईल तेव्हाच ह्या गौरवातील त्याच्या प्रतिरूपात आपले परिवर्तन होईल. त्या प्रसंगी तो आमचे तारण पूर्णत्वास नेईल." तो तुमचे-आमचे दैन्यावस्थेतील शरीर स्वतःच्या गौरवावस्थेतील शरीरासारखे व्हावे म्हणून त्याचे रूपांतर करील." (फिलिप्पै 3 : 21).

असे असले तरी, "जसा तो प्रकाशात आहे, तसे जर आपण प्रकाशात चालत असलो तर" (1 योहान 1 : 7), "देवाची प्रतिमा जो ख्रिस्त" (2 करिंथ 4 : 4) तो हळूहळू आपले रूपांतर त्याच्या प्रतिरूपात करतो. अर्थात, हा बदल घडत आहे या बाबतीत आपण मोशेप्रमाणेच अज्ञानी असतो, असा बदल होत असल्याचे आपल्या ध्यानात येत नाही (निर्गम 34 : 29), परंतु एकेदिवशी, त्याच्या कृपेबद्दल त्याची स्तुती असो. "आपण त्याच्यासारखे होऊ, कारण जसा तो आहे तसाच तो आपल्याला दिसेल." (1 योहान 3 : 2).

**देवाच्या गौरवाचा प्रकाश आमच्या अंतरंगात पडतो**
**आणि आमचे रूपांतर होण्यास सुरुवात होते**

### आरंभीचे पवित्रीकरण

आमचे रूपांतर होण्याची सुरुवात परिवर्तनाने होते. पौल 2 करिंथ मध्ये जे लिहितो, त्यावरून हे स्पष्ट होते : "देवाची प्रतिमा जो ख्रिस्त त्याच्या तेजाच्या सुवार्तेचा प्रकाश त्यांच्यावर प्रकाशू नये" म्हणून "ज्यांचा नाश होत आहे त्यांच्याठायी ती आच्छादलेली आहे" त्यांचे डोळे "ह्या युगाच्या दैवताने आंधळे केले आहेत." परंतु पौलाला त्याच्या

स्वतःबद्दल तसेच आम्हा विश्वास ठेवणाऱ्या सर्वांबद्दल असे म्हणता येईल की, "'अंधारातून उजेड प्रकाशित होईल' असे जो देव बोलला तो येशू ख्रिस्ताच्या मुखावरील देवाच्या गौरवाच्या ज्ञानाचा प्रकाश पाडण्यासाठी आमच्या अंतःकरणात प्रकाशला आहे." (2 करिंथ 4 : 3, 4, 6)

दिमिष्कच्या रस्त्यावर पौलाची आणि पुनरुत्थित ख्रिस्ताची समोरासमोर गाठ पडली आणि पौलाच्या अंतरंगात ह्या रूपांतराच्या अद्‌भुत चमत्काराचा आरंभ झाला.

आम्ही पश्चात्ताप करतो आणि विश्वासाने वधस्तंभावर खिळलेल्या, पुनरुत्थित ख्रिस्ताची भेट घेतो तेव्हा आमचे ख्रिस्तासारख्या चित्तवृत्तीमध्ये रूपांतर होण्यास सुरुवात होते. त्याक्षणी "येशू ख्रिस्ताच्या मुखावरील देवाच्या गौरवाचा" प्रकाश आमच्या अंतःकरणात पडतो आणि त्याच्या सादृश्य आमचे रूपांतर होण्यास सुरुवात होते.

परंतु हे रूपांतर म्हणजे केवळ एक वैयक्तिक-खाजगी बाब नाही. आम्ही आमचा विश्वास जाहीरपणे कबूल करणे आणि ख्रिस्ताच्या शरीररूपी मंडळीशी बाप्तिस्मा घेऊन समरूप होणे अगत्याचे आहे. नव्या कराराच्या सर्व ख्रिस्ती लोकांबद्दल बोलले जाते तसे आमच्याबद्दलही नेहमीच म्हटले जाते, "तुम्हांमधील जितक्यांचा ख्रिस्तामध्ये बाप्तिस्मा झाला आहे तितक्यांनी ख्रिस्ताला परिधान केले आहे" आणि त्याच्या शरीरामध्ये "यहूदी व हेल्लेणी, गुलाम व स्वतंत्र, पुरुष व स्त्री हा भेदच नाही, कारण तुम्ही सर्वजण ख्रिस्त येशूच्याठायी एकच आहा." (गलती 2 : 27-28)

**त्याच्या प्रीतीत भीती असते**

**त्याच्या विश्वासात शंका-कुशंका असतात**

**त्याच्या नम्रतेपणात अहंकार येतो**

## पूर्ण पवित्रीकरण

जॉन वेस्ली म्हणतात, "नीतिमान ठरवण्यात आल्यामुळे आमची पातकाच्या अपराधातून मुक्तता झाली आणि आम्ही पुन्हा देवाच्या पसंतीस उतरलो; पवित्रीकरणामुळे आमची पातकाच्या सामर्थ्यातून पूर्णतः सुटका झाली आणि आम्हांला देवाची प्रतिमा पुन्हा मिळाली."[3]

देवाची प्रतिमा ह्याचा अर्थ वेस्ली सांगतात[4], "देव आणि मनुष्य ह्यांची पवित्र, नम्र, हळूवार, सोशिक प्रीती होय." "ज्या क्षणी आम्ही नीतिमान ठरतो" त्या क्षणी ह्या प्रीतीचा आरंभ होतो. "आमचा सर्व अनुभव तसेच शास्त्रलेख हीच बाब दाखवून देतात."

परंतू ख्रिस्ताची नव्यानेच ओळख झालेला-नव्यानेच पालट झालेल्यामध्ये मात्र ही प्रीती "शंका किंवा भयमिश्रित" असते आणि शिल्लक राहिलेल्या पातकी-स्वार्थी स्वभावामध्ये "मिसळून" जाते.[5] नव्यानेच सापडलेल्या विश्वासाच्या प्रकाशात तरुण ख्रिस्ती लोकांना कदाचित् शिल्लक राहिलेल्या पातकाची कल्पनाच नसते. आपले पातक संपले याच आनंदात ते असतात; पण लवकरच त्यांच्या लक्षात येते की, दडून बसलेली आत्मपूजा, ख्रिस्ताच्या अधिकाराशी स्पर्धा करीत आहे आणि त्यांची शांती व आनंदाचा भंग करीत आहे; परंतु डॉ. ब्रीझी[6] सांगतात की खरा त्रास पुढेच आहे : "ह्या नव्या जीवनाला त्याच्या स्वतःकडूनच विरोध होतो...... त्याचे देवावर प्रेम असते; पण तो पूर्ण अंतःकरणाने त्याच्यावर प्रीती करीत नाही आणि मग...... स्वार्थ-मीपण हळूच शिरकाव करते : त्याच्या प्रीतीमध्ये भीती असते, त्याच्या विश्वासात शंका-कुशंका असतात. त्याच्या नम्रपणात अहंकार असतो. त्याच्या भक्तीमध्ये महत्त्वाकांक्षा आणि आत्मशोध असतो. त्याच्या अंतःकरणात संघर्ष सुरू असतो. तो पवित्र आत्म्याच्या प्रकाशात येशूच्या शुद्ध-पवित्र आत्म्याकडे वर पाहतो आणि दडपून जातो."

परंतु शिल्लक राहिलेल्या पातकाबद्दल खात्री पटून त्यातून सुटका होण्याची प्रबळ इच्छा असणारा ख्रिस्ती मनुष्य धन्य. येशूने म्हटले, "जे शोक करीत आहेत ते धन्य, कारण त्यांचे सांत्वन करण्यात येईल." (मत्तय 5 : 4). अशा प्रकारच्या व्यक्तीकरिता, वेस्ली सांगतात[7] की देव "प्रथम पूर्वजांसाठी आणि इस्राएल व देवाच्या लोकांकरीता युगानुयुगाकरिता दिलेले अभिवचन पूर्ण करतो : 'तुझा देव परमेश्वर तुझ्या हृदयाची व तुझ्या वंशजांच्या हृदयाची सुंता करील आणि आपण जिवंत राहावे म्हणून तू आपला देव परमेश्वर ह्याच्यावर संपूर्ण मनाने व संपूर्ण जिवाने प्रेम करशील.'"

(अनुवाद 30:6).

परिपूर्ण प्रीतीचे अभिवचन हे "शुद्ध प्रीतीचे" अभिवचन आहे - ह्या प्रीतीमध्ये मूर्तिपूजक आत्मप्रेमाची **भेसळ** नसते. संपूर्ण पवित्रीकरणाच्या गंभीर अवस्थेमध्ये आत्मप्रीतीच्या पातकापासून अंतःकरण शुद्ध केले जाते. वेस्ली स्पष्टीकरण करून सविस्तर सांगतात, "हा सार्वत्रिक बदल त्याच्या अंतःकरणात घडून येत नाही तोपर्यंत त्याचा सर्व पवित्रपणा हा **भेसळ**युक्त होता..... आता मात्र त्याचे अंतःकरण पवित्रपणाशी मिळते-जुळते सुसंगत असे आहे..... त्यामध्ये कसल्याही विपरीत गोष्टींची सरमिसळ नाही : (अंतरंगात) सर्वत्र शांती व सुसंगत एकवाक्यता आहे."[8]

परंतु अंतरंगातील ह्या बदलानंतर, वेस्ली पुढे सांगतात, "तो ख्रिस्ताची कृपा, ज्ञान, देवाची प्रीती व प्रतिरूप यात वाढतच असतो आणि ही प्रक्रिया मृत्यूपाशीच संपते असे नाही, तर सर्वकालात ती सुरू असणार आहे."[9]

संपूर्ण पवित्रीकरणामध्ये वेस्ली समारोप करताना सांगतात, "अंतःकरण-हृदय सर्व पातकांपासून शुद्ध केले जाते आणि ते देव व मनुष्य यांच्याबद्दलच्या प्रीतीने भरले जाते; परंतु 'आमचे मस्तक असणाऱ्या ख्रिस्तामध्ये आमची सर्व बाबतीत संपूर्ण वाढ होत नाही', 'ख्रिस्ताच्या परिपूर्णतेची उंची आम्ही गाठत नाही' तोवर ही प्रीती अधिक आणि अधिक वाढतच राहणार."[10]

## अंतिम पवित्रीकरण

येथे एक पूर्वसूचना - अट घातलीच पाहिजे. "ख्रिस्त व त्याच्या पुनरुत्थानाचे सामर्थ्य ह्यांची मी ओळख करून घ्यावी" अशी पौलाप्रमाणे माझ्याही अंतःकरणाला उत्कंठा लागलेली असली, तरी त्याच्याबरोबर मी हे देखील कबूल केले पाहिजे, की "एवढ्यांतच मी मिळविले किंवा एवढ्यांतच मी पूर्ण झालो आहे असे नाही.... तर मागील गोष्टींकडे दुर्लक्ष करून व पुढील गोष्टींकडे लक्ष लावून, ख्रिस्त येशूच्या ठायी देवाचे जे वरील पाचारण त्यासंबंधीचे बक्षिस मिळविण्यासाठी मर्यादेवरील खुणेकडे मी धावतो, हेच एक माझे काम आहे" (फिलिप्पै. 3 : 10, 12-14). अतिशय प्रामाणिकपणे आणि अत्यंत नम्रभावाने मी दररोज असे कबूल करतो की,

**देव मला तयार करीत आहे,**

**एखाद्या पुतळ्याला आकार द्यावा**

**तसा देव घडवीत आहे,**

**देव मला बदलत आहे, सुधारत आहे,**

**माझी परिपूर्णता हाच देवाचा उद्देश आहे.**

**परंतु मी अद्याप परिपूर्ण झालो नाही !**

प्रेषित पौल आणि देवाचा प्रत्येक पवित्रजन, मग तो कितीही परिपक्व व पूर्णावस्थेत गेलेला असला तरी, "**ख्रिस्ती लोकांची अद्याप जडण-घडण होत आहे**" ह्या ई. स्टॅन्ली जोन्स ह्यांच्या मताशी पूर्णपणे सहमत होईल.

माझ्या माहितीचे एक अत्यंत परिपक्व आणि ख्रिस्तासारख्या स्वभावाचे एक पवित्रजन आहेत. मला आठवते, एकदा ते मला म्हणाले, "बंधू ग्रेटहाऊस, केव्हा केव्हा मला

फार **सांसारिक** वाटते !'' कधी कधी, खरोखर आम्हांला खूप निराश-उदास वाटते, खरे तर आपण उत्साही व आनंदी असले पाहिजे. आम्हांला आनंद वाटला पाहिजे, अशा वेळी केव्हा केव्हा आम्ही निराश होतो. ख्रिस्तासारखी चित्तवृती धारण करण्याची आम्हांला उत्कंठा लागलेली असताना कधी कधी आम्ही अगदी मानवी स्वभावाप्रमाणे वागतो. लक्षात ठेवा : अद्याप आमची शरीरे उद्धार पावलेली नाहीत.

असे असले तरी हे दैवी रचनेप्रमाणे आहे. कार्ल बार्थ[11] अगदी रोखठोकपणे लिहितात की, ''ख्रिस्ती धर्मामध्ये अस्वस्थ करणारे युगांत परिज्ञान नसेल तर काहीही झाले तरी त्यामध्ये ख्रिस्ताशी नाते शिल्लक असणार नाही.'' म्हणजेच हे ''सांप्रत काळाचे दुःख'' पेंटेकॉस्ट (पन्नासावा दिवस) आणि ख्रिस्ताचे पुनरागमन यामधील वेदनेचा काळ आहे (रोम 8 : 18-23). हा काळ आम्हांला प्रार्थनाशील आणि ख्रिस्तावर विसंबून राहण्यास भाग पाडतो.

आता आपण पूर्वीचे नाही-आपल्याठायी पूर्वीचा स्वभाव आता नाही; परंतु आपण पुढे जसे असणार आहोत तसे अद्याप झालो नाही-ख्रिस्त आमची शरीरे मुक्त करण्यासाठी आणि आमचे पवित्रीकरण परिपूर्ण करण्याकरिता परत येणार आहे, तेव्हा आम्हांला नवी शरीरे मिळतील. पुढील परिच्छेदामध्ये पौल करिंथवासीयांना काय लिहितो ते ऐका :

''पाहा, मी तुम्हांस एक रहस्य सांगतो, आपण सर्वच महानिद्रा घेणार नाही, तरी आपण सर्वजण बदलून जाऊ, क्षणात, निमिषांत शेवटला कर्णा वाजेल तेव्हा ...... आणि आपण बदलून जाऊ......''**मरण विजयात गिळले गेले आहे**'' असा जो शास्त्रलेख आहे तो पूर्ण होईल. ''**अरे मरणा, तुझी नांगी कोठे ? अरे मरणा, तुझा विजय कोठे ?**''

मरणाची नांगी पाप आणि पापाचे बळ नियमशास्त्र आहे; परंतु जो देव आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताच्याद्वारे आपणाला जय देतो त्याची स्तुती असो (1 करिंन्थ. 15:51 - 52, 54 - 57).

''हीच ती आशा'' या गौरवाच्या आशेमध्ये - ख्रिस्ताबरोबर ''आपण तारले गेलो आहोत.'' (रोम 8 : 24).

## तुमच्या आध्यात्मिक वाटचालीसाठी प्रकाशशलाका / मार्गदर्शन

### आधारस्तंभ

सदर पाठातील मुद्दे सारांशरूपाने मांडून पुढील वाक्ये पूर्ण करा.

- पवित्रीकरण म्हणजे ..........................................................................

  ..........................................................................................

- आरंभीचे पवित्रीकरण म्हणजे ..........................................................

  ..........................................................................................

- संपूर्ण पवित्रीकरण म्हणजे ...........................................................

  ..........................................................................................

- अंतिम पवित्रीकरण म्हणजे ............................................................

  ..........................................................................................

## आध्यात्मिक पायऱ्या

"लोकप्रिय 10" ही आजच्या काळातील प्रसिद्ध यादी. तेथे तुम्हीही अशीच एक यादी तयार करायची आहे. यामध्ये तुम्हांला अत्यंत प्रेरणादायी ठरलेले, मनावर फुंकर घालणारे, प्रोत्साहन देणारे किंवा आशा पल्लवित करणारे सदर पाठातील शब्द, वाक्यप्रयोग किंवा कल्पना तुमच्या पसंतीच्या क्रमाने लिहायच्या आहेत. उदाहरणार्थ, "मूर्तिपूजेच्या आत्मप्रेमाची **भेसळ नसलेली** प्रीती हे वाक्य माझ्या लोकप्रिय 10 ह्या यादीमध्ये कोठेतरी असेल. तुम्ही तुमची स्वतःची निवड लिहा आणि "1" क्रमांकाकरिता अत्यंत अर्थपूर्ण शब्द राखून ठेवा.

10 ..........................................................................................

9 ..........................................................................................

8 ..........................................................................................

7 ..........................................................................................

6 ..........................................................................................

5 ..........................................................................................

4 ..........................................................................................

3 ...................................................................................

2 ...................................................................................

1 ...................................................................................

**उपयोगात आणावयाची साधने**

चार्ल्स वेस्ली ह्यांच्या गीताची दोन कडवी येथे दिली आहेत. माझ्याकडे Hymns for the use of the people called Methodists ह्या पुस्तकाची 1949 सालची आवृत्ती आहे. त्या पुस्तकात ह्या गीताचा क्रमांक 408 आहे. या गीताला शीर्षक नाही. तुमची इच्छा असेल, तर तुमच्याकरिता एक अभ्यास आहे. तो असा की, पुढे दिलेल्या गीतामध्ये तुम्ही तुमचे स्वतःचे एक कडवे लिहायचे. हे कडवे पहिले असेल, दुसरे असेल किंवा शेवटचेही असेल. या कडव्यात तुमच्या स्वतःच्या अंतरंगाचे किंवा मनाचे प्रतिबिंब पडले पाहिजे. दुसरा अभ्यास असा की, या गीताला शीर्षक द्यायचे.

**येशूची इच्छा - परिपूर्णतेसाठी**

**पवित्र व्हावे मी असे, येशू इच्छितो**
**मी ही येशू इच्छेचा सन्मान करितो**

**इच्छेनुरूप येशूच्या समरूप होत मी**
**सवे चालेन त्याचीया असाच नेहमी**

**परिपूर्ण मज करावया उद्धारका तू ये**
**उधळून सर्व पातके, ये जवळ घे**

**निकोप स्वास्थ्याकरिता, स्थिर आत्मा दे**
**पवित्रता प्रीतीतही, मला पूर्णत्व दे**

तुमचे कडवे :

..............................................................................................

..............................................................................................

..............................................................................................

..............................................................................................

..............................................................................................

तुमचे शीर्षक :

..............................................................................................

*शांतीचा देव स्वतः तुम्हांस परिपूर्णपणे पवित्र करो आणि आपला प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्या आगमनासमयी तुमचा आत्मा, जीव व शरीर ही निर्दोष अशी संपूर्णपणे राखली जावोत. तुम्हांस पाचारण करणारा विश्वसनीय आहे, तो हे करीलच.*

- 1 थेस्सल 5 : 23-24

# 8

# पूर्ण पवित्रीकरणाकरिता प्रार्थना

पवित्र जीवनासाठीच्या ठोस पायाभूत आधारांचा विचार करीत असताना थेस्सलनीकाकरांस पहिले पत्र ह्या पुस्तकाइतके महत्त्वाचे अन्य कोणतेही पुस्तक नजरेसमोर येत नाही. सर्वसाधारणपणे अभ्यासकांचे असे मत आहे, की पौलाने सर्वप्रथम लिहिलेली अशी हीच पत्रे आहेत (सुमारे इ. स. 50) आणि म्हणूनच अस्तित्वात असलेले ख्रिस्ती साहित्यातील हे सर्वांत जुने वाङ्मय आहे.

अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे, पौलाच्या एकंदर पत्रांमध्ये पवित्रपणाविषयी जितके उल्लेख आहेत, त्यापेक्षा सरासरीने दुप्पट उल्लेख थेस्सलनिकाकरांस पहिल्या पत्रामध्ये आहेत. पौलाची आशीर्वादाची प्रार्थना 5:23-24 ह्या वचनांमध्ये आहे. त्याच्या लिखाणामध्ये फक्त याच ठिकाणी परिपूर्णपणे पवित्र असा स्पष्ट उल्लेख केलेला आहे. यातून थेस्सलनीकाकरांस पहिल्या पत्रामधील प्रेषिताची पवित्रपणाविषयीची आस्था दिसून येते. त्याचप्रमाणे ह्या विषयाला मध्यवर्ती महत्त्व दिल्याचे पहायला मिळते.[1]

माझ्या तरुण वयामध्ये, एकदा माझ्या सायंकाळच्या भक्तीमध्ये मी थेस्सलनीकाकरांस पहिले पत्र ह्या पुस्तकातील छोटे छोटे पाच अध्याय एकाच बैठकीत वाचून काढले. त्या सायंकाळी मला ख्रिस्ती पवित्रपणाविषयीची माहिती वृत्तांतरूपाने मिळाली. ही माहिती

नासोरी पंथाचा नवा सदस्य या नात्याने मला देण्यात आलेल्या शिक्षणाशी मिळतीजुळती होती आणि तेव्हापासून माझ्या ईश्वरपरिज्ञानामध्ये ती एखाद्या मार्गदर्शक तत्त्वाप्रमाणे सहाय्य करीत आहे. तथापी, पुढे वाचण्यापूर्वी थेस्सलनीकांकरांस पहिल्या पत्राचा तुम्ही स्वतः विचार करा. थोडा वेळ बाजूला काढा आणि यातील छोटे छोटे पाच अध्याय वाचून काढा; मग तुमचे पवित्र शास्त्र तुमच्यासमोर उघडे ठेवा आणि "ह्या गोष्टी अशाच आहेत की काय" (प्र. कृ. 17 : 11) ह्या आधारे पुढील रूपरेषा तपासून पहा.

**1 थेस्सलनीकावासीय खरे विश्वासणारे होते ( 1 : 1 - 2 : 16 )**

पौल थेस्सलनीकाकरांच्या परिवर्तनाविषयी येथे सांगतो. तो त्याच्याविषयी सांगत असलेल्या प्रत्येक गोष्टीतून ते खरोखर-मनापासून ख्रिस्ताकडे वळले असल्याची साक्ष खात्रीने पटते. त्यांनी अत्यंत सुंदर रीतीने विश्वास, आशा आणि प्रीती यांच्या खऱ्या ख्रिस्ती अनुभवाचा पुरावा, हे उदाहरणाने दाखवून दिले (1 : 3) - "देवावरील विश्वासाचा ठसा असलेले नैतिक जीवन, अंतिम तारणाची आशादायी अपेक्षा आणि दरम्यानच्या काळातील बंधुभाव दाखवणारी प्रीती."[2]

थेस्सलनीकाकरांची तारणाकरिता झालेली निवड स्पष्टपणे दाखवली आहे. शुभवर्तमान त्यांच्याकडे आले ते "केवळ शब्दाने नव्हे, तर सामर्थ्याने, पवित्र आत्म्याने व पूर्ण निर्धाराने" (वचन 4 - 5). "फार संकटांत असताना" त्यांनी "पवित्र आत्म्याच्या आनंदाने वचन स्वीकारले" आणि त्या कारणाने "सर्व विश्वास ठेवणारे ह्यांना आदर्श झाले." (वचन 6-7). ते "जिवंत व सत्य देवाची सेवा करण्यास आणि त्याचा पुत्र येशू ह्याची स्वर्गातून वाट पाहण्यास मूर्तीपासून देवाकडे वळले." (वचन 9 - 10).

दुसऱ्या अध्यायामध्येही त्यांच्या विश्वासाची आणि ते व प्रेषित यांच्यातील मधुर नात्याची हकीकत पुढे वाचायला मिळते. येथे थेस्सलनीका येथील मंडळींची तुलना "यहूदीयातील देवाच्या ज्या मंडळ्या ख्रिस्त येशूच्या ठायी आहेत...." त्यांच्याशी केली आहे, येथेही ह्या विश्वासणाऱ्यांनी "आपल्या देशबांधवांच्या हातून दुःखे सोसली." त्याचप्रमाणे यहूदीयातील मंडळ्यांनी देखील "यहूद्यांच्या हातून दुःखे सोसली....... त्यांनी प्रभू येशूला व संदेष्ट्यांनाही जिवे मारले." (2 : 14 - 15).

**2. थेस्सलनीकावासीयांचा विश्वास कडक छळाच्या कसोटीस उतरला (2 : 17 - 3 : 9)**

पौल थेस्सलनीकावासीयांना संदेश देत होता. त्याचे संदेश ऐकून विश्वास न ठेवणाऱ्या यहूद्यांमध्ये अस्वस्थता पसरली. त्यांनी ".... घोळका जमवून नगरात घबराट

निर्माण केली...... नंतर बंधुजनांनी पौल व सीला ह्यांना लागलेच रातोरात बिरुयास पाठविले.'' (प्रेरित कृ. 17 : 5, 10; पाहा - वचने 1 - 10). अशा प्रकारे पौलाला ''हृदयाने नव्हे, तर देहाने'' (1 थेस्सल 2 : 17) थेस्सलनीका येथील ख्रिस्ताकडे नव्याने आलेल्या मूर्तिपूजक लोकांपासून दूर जाणे भाग पडले. ''तुमचे तोंड पाहण्याचा आम्ही फार उत्कंठेने विशेष प्रयत्न केला'' पौल लिहितो, ''....... परंतु सैतानाने आम्हांस अडविले. कारण आमची आशा किंवा आमचा आनंद किंवा आमच्या अभिमानाचा मुगूट काय आहे ? आपला प्रभू येशू ह्याच्या आगमनसमयी त्याच्यासमोर तुम्हीच आहा ना ? कारण तुम्ही आमचे गौरव व आमचा आनंद आहा.'' (व. 17 - 20).

पौलाला त्यांचा विरह असह्य झाला तेव्हा त्याने अथेनैहून तीमथ्याला त्यांच्याकडे त्यांना विश्वासात ''स्थिर करण्याकरिता व बोध करावा यासाठी'' पाठविले. (3 : 2). अशासाठी की थेस्सलनीकाकरांनी ''संकटात घाबरू नये'' (व. 3) आणि त्याने त्यांच्याकरिता घेतलेले श्रम ''व्यर्थ होऊ नयेत.'' (व. 5) (पौल बिरुया येथून अथेनै येथे गेला होता.)

''आता तीमथ्याने तुम्हांपासून आम्हांकडे येऊन'' पौल पुढे सांगतो, ''तुमचा विश्वास प्रीती ह्याविषयी...... सुवर्तमान आम्हांस कळविले...... कारण जर तुम्ही प्रभूमध्ये स्थिरचित्त असला, तर आता आमच्या जीवात जीव आल्यासारखे होईल.'' (व. 6-8). मनाला प्रोत्साहन-उत्तेजन देणारे वर्तमान ऐकून प्रेषिताला देवाच्या समोर आनंद साजरा करण्याची संधी मिळाली. (व. 6, 8 - 9).

### 3. थेस्सलनीकावासीयांच्या विश्वासात न्यूनता शिल्लक आहे (3 : 10 - 4 : 12)

थेस्सलनीकाकरांनी सहनशक्तीने विजय मिळवला आणि त्यांच्या प्रीतीचे प्रमाणही पहायला मिळाले. तरी आता आपण वाचतो की पौल थेस्सलनीकाकरांसाठी ''रात्रंदिवस पुष्कळ प्रार्थना करतो'' जेणेकरून ''(त्याला) कदाचित् (त्यांना) तोंडोतोंड पाहता येईल आणि त्यांच्या विश्वासातील न्यूनता **पूर्ण** करता येईल.'' (3-10) नंतरच्या वाक्यातील मूळ ग्रीक भाषेतील क्रियापदाचा अर्थ ''पूर्ण करणे'', ''एकत्र जोडणे-साधणे'' किंवा ''फूट जोडणे-समेट करणे'' असा आहे. येथे हे क्रियापद, ह्या विश्वासणाऱ्यांना देवाने ज्या कार्यासाठी घडवले ते कार्य पूर्ण करण्यासाठी, उणीव असणाऱ्या गोष्टींची पूर्तता करणे ह्या अर्थाने वापरले आहे (ताडून पाहा - इफिस 4:12)

थेस्सलनीकाकरांना ''तोंडोतोंड'' पाहता यावे यासाठी पौलाची प्रार्थना सुरू आहे.

ही गोष्ट ईश्वरपरिज्ञानाच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. मंडळीचा विश्वास परिपूर्ण-स्थिर करण्याच्या इच्छेसंबंधी सर्वसाधारणपणे, प्रेषितांची तेथे उपस्थिती असण्याशी जोडला जातो (ताडून पाहा - रोम 1 : 11). थेस्सलनीका येथून अचानकपणे घालवून दिल्यानंतर आता प्रेषिताला तेथे व्यक्तिशः जाऊन त्यांच्या विश्वासातील व अनुभवातील न्यूनता पूर्ण करण्याची उत्कंठा लागलेली आहे.

थेस्सलनीकावासीयांमध्ये काही उणीवा होत्या. या उणीवा परस्परांशी (दोन क्षेत्रांमध्ये) निगडीत होत्या : (1) त्यांची प्रीती आणि (2) त्यांची पवित्रता (3 : 11 - 4 : 12). या दोनही गोष्टी अस्सल (खऱ्या) असल्या तरीपण त्यांची प्रीती परिपूर्ण आणि पावित्र्य निर्दोष असणे अगत्याचे होते.

## त्यांच्यातील अपूर्णतेचा संबंध प्रीती व पवित्रता ह्या गोष्टींशी होता

थेस्सलनीकावासीयांमध्ये अपूर्णता-न्यूनता शिल्लक होती. ह्याबाबत बोलताना-सांगताना पौलाचा दृष्टिकोन जाणवण्याइतपत सकारात्मक आहे. त्याचा हा दृष्टिकोन त्याने मंडळीसाठी केलेल्या प्रार्थनेतून स्पष्टपणे प्रकट होतो : "देव, आपला पिता हा स्वतः व आपला प्रभू येशू हा आमचे तुम्हाकडे येणे निर्विघ्न करो, आणि जशी आमची प्रीती तुम्हांवर आहे तशी प्रभू **तुमची प्रीती** एकमेकांवर व सर्वांवर **वाढवून विपुल करो,** ह्यासाठी की आपला प्रभू येशू आपल्या सर्व पवित्र जनांसह येईल. **त्यावेळेस त्याने तुमची अंतःकरणे** देव आपला पिता ह्याच्यासमोर **पवित्रतेत निर्दोष होण्यासाठी स्थिर करावी**" (3 : 11-13). ह्या प्रार्थनेवरून स्पष्ट दिसते, की विपुल प्रीती आणि निर्दोष पवित्रता हे एकाच पूर्ण गोष्टीचे दोन पैलू आहेत. या दोन्ही गोष्टी एकाच ठिकाणी असणे अगत्याचे आहे.

4 : 9-12 ह्या वचनांकडे एक नजर टाकली असता पुन्हा एकदा पौलाच्या सकारात्मक दृष्टिकोनाचा प्रत्यय येतो. थेस्सलनीकाकरांना विपुल प्रीतीची गरज होती याकडे तो सकारात्मक दृष्टिकोनातून पाहतो. "बंधुप्रेमाविषयी आम्ही तुम्हांस लिहावे ह्याची तुम्हांस गरज नाही." तो स्पष्ट करतो, "**कारण एकमेकांवर प्रीती करावी असे तुम्हांला देवानेच शिकवले आहे** आणि..... **तुम्ही ती करीतच आहा.** तरी बंधूनो, आम्ही तुम्हांस बोध करितो की, **ती उत्तरोत्तर अधिक करावी**" (4: 9-10 इफिस 3 : 14-19)[3]

त्यांच्या पवित्रतेच्या संबंधातही प्रेषिताचा दृष्टिकोन असाच सकारात्मक आहे. प्रेषित लिहितो, "बंधुजनहो, शेवटी आम्ही तुम्हांस विनंती करितो व प्रभू येशूमध्ये बोध करितो

की, तुम्ही कसे वागून देवाला संतोषवावे हे तुम्ही आम्हापासून ऐकून घेतले व **तुम्ही त्याप्रमाणे वागत आहात त्यात तुमची उत्तरोत्तर वृद्धी व्हावी**'' (4 : 1)[4] मग स्पष्ट आज्ञा दिलेली आहे. त्यामध्ये मूर्तिपूजक संस्कृतीत प्रचलित असणारे दुराचरण व विकार-वासनांच्या उसळत्या लाटांमध्ये अंतःकरणाची व जीवनाची शुद्धता-पवित्रता कशी राखायची हे सांगितले आहे. लिऑन्स[5] स्पष्ट करून सांगतात, ''ख्रिस्ती लोकांचा शीलस्वभाव हा त्यांच्या देवाच्या शीलस्वभावामुळे मूर्तिपूजक लोकांपेक्षा मुळातच वेगळा आहे. ह्या ईश्वरपरिज्ञानाच्या दृष्टीने गृहित गोष्टीपासून पुढे जातो. परराष्ट्रीय-मूर्तिपूजक लोकांची वागणूक अशी असते, कारण ते 'देवाला ओळखत नाहीत' (4 : 5, ताडून पाहा 2 थेस्सल 1 : 8 ; गलती 4 : 9). पौल थेस्सलनीकाकरांस नैतिक शिक्षण देतो. आग्रहाने सांगणे हे त्याच्या शिकवणुकीचे गुणलक्षण आहे. 'जो देव आपल्या राज्यात व गौरवात तुम्हांला पाचारण करीत आहे त्याला शोभेल असे तुम्ही चालावे.''' (2:12).

''देवाची इच्छा आहे की'' पौल आर्जवाने सांगतो ''तुमचे पवित्रीकरण व्हावे, म्हणजे तुम्ही जारकर्मापासून स्वतःला अलिप्त ठेवावे'' (4 : 3). ''मी म्हणतो तसे करा'' अशी नाही तर ''मी करतो-वागतो तसे करा / वागा'' अशी पौलाची सूचना आहे. याच पत्रात आरंभी तो त्यांना आठवण करून देतो : ''तुम्हा विश्वास ठेवणाऱ्यांत आम्ही पवित्रतेने, नीतीने व निर्दोषतेने कसे वागलो ह्याविषयी तुम्ही साक्षी आहात व देवही आहे.'' (2 : 10 ; 1 : 5-6 ; 2 : 3-4 ; 2 करिंथ 1 : 12). प्रेषिताने सुवार्ता सांगून ती प्रत्यक्ष उदाहरणाने दाखवली आणि त्याच्याद्वारे पालट झालेल्यांनी त्याचा कित्ता गिरवून ''जो देव आपल्या राज्यात व गौरवात तुम्हांला पाचारण करीत आहे त्याला शोभेल असे चालावे.'' असे तो सांगतो. (2 : 12) - पवित्रता म्हणजे नितळपणे दिसणारे जीवन.[6]

देवाने थेस्सलनीकाकरांना ''अशुद्धपणासाठी नव्हे, तर पवित्रतेसाठी'' पाचारण केले (4 : 7). या ठिकाणी ''पवित्रता'' हे ग्रीक नाम (<u>hagiasmos</u> व 3 आणि 7 मध्ये) पवित्रीकरणाची **प्रक्रिया** स्पष्ट करून दाखवते [7]: ''एक दैवी कृती - जी विश्वास ठेवणाऱ्याच्यामध्ये एक ठोस-ठाम कृती म्हणून आविष्कृत होते.'' यातून अशी कल्पना मांडली आहे, की थेस्सलनीकाकरांना देवाने पवित्र **होण्यासाठी** पाचारण केले. म्हणूनच जो कोणी संपूर्ण पवित्रिकरणासाठीच्या पाचारणाला नकार देतो तो ''माणसाचा नव्हे, तर तुम्हांस आपला पवित्र आत्मा देणारा देव ह्याचा अव्हेर करतो.'' याचा भावानुवाद जे.बी. फिलिप्स करतात, ''देव आम्हांला देतो त्या आत्म्याला **पवित्र** आत्मा म्हणतात ते योग्यच आहे.'' (व. ८). खरा पवित्रपणा ही काही मानवी तत्त्वप्रणाली नाही; हे पवित्र करणाऱ्या आत्म्याचे कार्य आहे आणि हे नाकारण्यामागे आमचे स्वतःचेच नुकसान होण्याचा धोका असतो. तसेच आमच्या अनुभवाच्या लैंगिक क्षेत्रातही पवित्रपणा असला

पाहिजे. आत्ममग्न राहणे हे पातकाचे **मूळ** असले तरी लैंगिक अनैतिकता हे त्याचे पहिले आणि अगदी उघडपणे दिसणारे **फळ** आहे. (रोम 1 : 21-27; गलती 5:19). पवित्र जीवन हे नैतिक शुद्धतेचे जीवन आहे.

**4. थेस्सलनीकावासीयांच्या संपूर्ण पवित्रीकरणासाठी प्रार्थना करून प्रेषित समारोप करतो.**

"शांतीचा देव स्वतः तुम्हांस परिपूर्णपणे पवित्र करो आणि आपला प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्या आगमनसमयी तुमचा आत्मा, जीव व शरीर ही निर्दोष अशी संपूर्णपणे राखली जावोत. तुम्हांस पाचारण करणारा विश्वसनीय आहे, तो हे करीलच." (5 ; 23-24).

ही प्रार्थना म्हणजे "पत्राचा मुख्य विषयच आहे" हे स्पष्टच आहे. येथे 3 : 9-13 ह्या वचनांतील पौलाच्या "प्रार्थना-इच्छे"ची पुनरावृत्ती आहे. तसेच 4 : 1 ते 5 : 22 ह्या वचनांमध्ये त्याने केलेल्या सूचनांचे सर्व महत्त्वपूर्ण मुद्द्यांचे एकत्रिकरण यात पहायला मिळते. संपूर्ण पत्राचा हा उच्चबिंदू आहे. प्रस्तूत प्रार्थनेमध्ये याआधी आलेल्या सर्व गोष्टींचा सारांश आहे. हा सारांश जाणीवपूर्वक विचार करून मांडला आहे असे आपल्याला दिसते. हा सारांश विस्तृत आणि बहुव्यापक आशीर्वादाच्या स्वरूपात मांडलेला आहे.[8]

आशीर्वादाची ही प्रार्थना तिहेरी स्वरूपाची आहे. यामध्ये संपूर्ण पवित्रीकरणाचा **विषय**, **व्याप्ती** आणि **खात्री** उलगडून दाखवली आहे.

**विषय -**

"येथे कार्य करणारा कर्ता प्रत्यक्ष देव स्वतः आहे यावर भर दिलेला आहे" असे स्प्रौस म्हणतात.[9] पवित्रीकरण घडवून आणण्यामध्ये पवित्र आत्म्याची कृतिशील भूमिका आहे (2 थेस्सल 2 : 13); तरी त्याला मनुष्याच्या सहकार्याशिवाय कार्य करता येत नाही, हे पवित्र जीवन जगण्याच्या पौलाच्या आग्रहाच्या उपदेशातून सूचित होते. पवित्रतेसाठी देवाने केलेल्या पाचारणाचा अव्हेर केला जाऊ शकतो (1 थेस्सल 4:8). आत्मा शुद्ध करतो, पवित्र जीवन जगण्याकरिता प्रेरणा व सामर्थ्य देतो; परंतु यामध्ये आमचा वैयक्तिक सहभाग हा नेहमीच गृहित धरलेला असतो.[10] ऑगस्टीन व इतरांनी म्हटले आहे त्यानुसार "देवाशिवाय आम्हाला काही करता येत नाही आणि आमच्याशिवाय देव काही करणार नाही."

खऱ्या पवित्रीकरणासाठी आम्ही स्वतःला देवाच्या हाती समर्पित करणे आवश्यक असले (पाहा रोम 6 : 13, 19) तरी केवळ "शांतीचा देव स्वतः"(1 थेस्सल 5:23)

आम्हांस परिपूर्णपणे पवित्र करील. यहुदी पौलासाठी, देव देत असलेली शांती, **शालोम** म्हणजे कल्याण, परिपूर्णता आणि आशीर्वाद होय. येथे याचा अर्थ "प्रभू आपल्या लोकांना देत असलेला अखेरचा आशीर्वाद म्हणजे अंतिम तारण" असाही आहे.

**देवाशिवाय आम्हांला काही करता येत नाही आणि आमच्याशिवाय देव काही करणार नाही**

पौल येथे सामान्यभूतकाळ वापरतो. यातून पवित्रीकरणाबद्दलचा दृष्टिकोन स्पष्ट होतो. पवित्रीकरणाची प्रक्रिया व्यक्तीचा पालट होतो तेव्हाच सुरू होते आणि ख्रिस्ताच्या दुसऱ्या येण्यापर्यंत ती सुरू असणार आहे. एक अभ्यासक[12] याहीपुढे जाऊन असे सुचवतात, की येथे वापरलेल्या क्रियापदाचा "भाग असणे याचा अर्थ 'देवाच्या स्वभावाशी जुळवून घेणे असा आहे.' यामध्ये नैतिक परिपूर्णतेचा समावेश-कोणतीही मर्यादा न घालता-केलेला आहे असे खात्रीने म्हणता येईल."आमचे समर्पण, पातकापासून आमचे पूर्णपणे विभक्त होणे आणि आमच्या अंतरंगातील त्याच्या कार्याला आम्ही स्वतःला वाहून घेणे यातून देव स्वतः आमचे पवित्रीकरण करतो. लिऑन मॉरिस[13] नेमकेपणाने सांगतात की, "यामध्ये मानवी साधनाचा हस्तक्षेप असेल, तर त्यात मनुष्याने स्वतःला देवाच्या हाती सोपवणे अगत्याचे आहे (4 : 4), असे असले तरी हे चांगल्याप्रकारे घडून येण्यासाठी देवाचे सामर्थ्य सहाय्य करते ही प्रमुख गोष्ट आहे."

## व्याप्ती

"शांतीचा देव स्वतः तुम्हांस परिपूर्णपणे पवित्र करो" (1 थेस्सल 5 : 23) नव्या करारामध्ये फक्त याच ठिकाणी holoteleis (होलोटेलीअस्) हे ग्रीक भाषेतील संयुक्त क्रियाविशेषण पहायला मिळते. याचा शब्दशः अर्थ "संपूर्णपणे आणि परिपूर्णपणे" असा आहे. "यातून संपूर्ण, सकल आणि पूर्णपणे असा अर्थबोध होतो" डॅन स्प्रॉस[14] स्पष्टीकरण करतात "पवित्रीकरणासाठीची प्रार्थना ही संपूर्ण-परिपूर्ण पवित्रीकरणाकरिता आहे." पवित्र शास्त्राच्या NIV अनुवादामध्ये "संपूर्णपणे" असा शब्द आहे, हा शब्द लूथरच्या durch und durch ह्या जर्मन अनुवादावरून घेतला आहे. थेस्सलनीकावासीयांच्या संपूर्ण नैतिक व आध्यात्मिक नवीकरणासाठी पौलाची प्रार्थना आहे. चार्ल्स वेस्लींनी लिहिलेल्या प्रार्थनेतून त्यांची आस्था दिसून येते,

**नवनिर्मित कार्य पूर्ण कर देवा**
**शुद्ध कलंकरहित होऊ दे आम्हा**
**मोठे तारण दिसू दे देवा**
**तुझ्यामध्ये असे ते दे आम्हा**

इतर अभ्यासकांना ह्या क्रियाविशेषणामध्ये आणखी इतर अर्थ असल्याचे वाटते. लिऑन मॉरिस त्यांचे मत मांडतात, "मुद्दा असा आहे की, हा शब्द संयुक्त असून त्यातील पहिल्या भागाचा अर्थ 'पूर्णपणे' असा आहे. आता दुसरा भाग अर्थबोधक होण्यासाठी आम्ही एखाद्याचा अंतिम हेतू एखाद्याच्या निर्मितीमागचा उद्देश काय आहे हे जाणून घेण्यासाठी काहीतरी विचार केला पाहिजे." मग आम्ही प्रश्न विचारणे आवश्यक आहे, "आम्हांला उत्पन्न करण्यात आले त्यामागे काय उद्देश आहे ?" ॲडम क्लार्क[16] या मुद्द्यावर मत मांडतात, "प्रत्येक मनुष्याने देवावर पूर्ण अंतःकरणाने, आत्म्याने, मनाने आणि सामर्थ्याने प्रेम केले पाहिजे तसेच जशी स्वतःवर तशी आपल्या शेजाऱ्यावर प्रीती केली पाहिजे, अशी त्याची इच्छा आहे, मग तो परिपूर्ण मनुष्य झाल्याने तसे करतो; **देवाने त्याला ज्या हेतूसाठी निर्माण केले त्याबद्दलचे उत्तर हेच आहे**". "परिपूर्ण पवित्रीकरण हाच परिपूर्ण प्रीतीचा अंतिम हेतू किंवा उद्देश आहे."[17]

पौल थेस्सलनीकावासीयांच्या पवित्रीकरणासाठी प्रार्थना करतो त्यामध्ये ह्या पवित्रपणात त्यांनी टिकून राहावे या विनंतीचाही अंतर्भाव आहे. "आपला प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्या आगमनसमयी तुमचा आत्मा जीव व शरीर ही निर्दोष अशी संपूर्णपणे राखली जावोत." (5:23). पवित्र शास्त्राच्या अर्थाचा उलगडा करणारे बहुसंख्य लोक "आत्मा, जीव व शरीर" ह्या संज्ञा एकत्रित अर्थाने घेतात, यातून मानवी व्यक्तिमत्वाच्या संपूर्णपणाचा अर्थबोध होतो. प्रेषित प्रस्तुत पत्र ग्रीक संज्ञा वापरून लिहित असला, तरी त्याचे विचार मात्र एखाद्या इब्री माणसासारखे आहेत. आम्ही आपला देव परमेश्वर ह्याच्यावर पूर्ण जीवाने, मनाने व अंतःकरणाने प्रीती करावी अशी आज्ञा आमच्या प्रभूने दिली. (मत्तय 22 : 37). प्रेषितही आपल्या प्रभूसारखाच विचार करतो - म्हणजेच आम्ही जिवेभावे प्रेम केले पाहिजे. परिपूर्ण पवित्रीकरण म्हणजे नैतिक व आध्यात्मिक **पूर्णता**, देवाच्या सामर्थ्याने आध्यात्मिक आरोग्य पुन्हा मिळणे आणि टिकून राहणे होय.

देवाचे आभार माना, "आपण आपला प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्या आगमनसमयी निर्दोष राखले जावोत." (5 : 23). निर्दोषपणा म्हणजे ख्रिस्ताच्या आगमनसमयासाठीच्या क्षणाकरिता राखून ठेवलेली गोष्ट नाही. "राखो" असा अनुवाद केलेल्या मूळ ग्रीक

शब्दातून (tere theie) दोन अर्थ सूचित होतात. या शब्दामध्ये जतन व जोपासना करणे हे अर्थ तर आहेतच; पण त्याचबरोबर संरक्षण करणे, बचाव करणे आणि समर्थन करणे हे अर्थही त्यातून समजतात, गॉर्डन पिट्स विल्स[17] ह्यांच्या मते "राखणे ह्या शब्दातून" अगोदरच-मुळात अस्तित्वात असणारी गोष्ट पुढे खंड न पडता सुरू आहे असा अर्थबोध होतो. म्हणजेच त्यांचे आत्ताचे -सध्याचे पवित्रीकरण ख्रिस्ताच्या दुसऱ्या येण्यापर्यंत टिकवून ठेवण्यात येणार आहे. त्यांना ख्रिस्ताच्या दुसऱ्या येण्यापर्यंत निर्दोष राखले जावो या प्रार्थनेतून, म्हणूनच, त्यांच्या सध्याच्या-आत्ताच्या पवित्रीकरणाविषयीचा अर्थबोध होतो." हाच धागा पकडून अर्नेस्ट बेस्ट[19] लिहितात, "अर्थातच पवित्रपणा ही काही एकदम-अचानक अस्तित्वात येणारी गोष्ट नाही. विश्वासणारे मात्र आता 'पवित्र' असायला हवेत आणि पवित्रतेचा आस्थेने शोध घेणारे असले पाहिजेत. समजा, न्यायाच्या दिवसापर्यंत विश्वासणाऱ्यांचे जतन केले गेले, तर त्या दिवसापर्यंत जपणूक करून ठेवणे असा यातून अर्थ सूचित होईल."

## मी कितपत धर्माचरण करावे ?

"मी कितपत धर्माचरण करावे ?" कोणीतरी विचारले. उत्तर : "ख्रिस्त कोणत्याही क्षणी येईल या विचाराने समाधान वाटावे इतपत धर्माचरण असावे." खरीखुरी पवित्रीकरण झालेली व्यक्ती प्रकाशित वाक्य लिहिणाऱ्या योहानाबरोबर प्रार्थना करील, "आमेन, ये प्रभू येशू ये !" (प्रकटी 22 : 20).

### खात्री

"तुम्हांस पाचारण करणारा विश्वसनीय आहे; तो हे करीलच" (1 थेस्सल 5:24). नीतिमान ठरणाऱ्या विश्वासाप्रमाणे पवित्र करणाऱ्या विश्वासानेही "..... देवाचे गौरव केले आणि देव आपण दिलेले अभिवचन पूर्ण करावयासही समर्थ आहे अशी त्याची पक्की खात्री होती." (रोम 4 : 20 - 21).

"परंतु आमचे पवित्रीकरण करणारा विश्वास - पातकापासून बचाव करणारा आणि प्रीतीमध्ये परिपूर्ण करणारा- नेमका आहे तरी काय ?" जॉन वेस्ली[20] विचारतात. ते उत्तर देतात,

विश्वास हा दैवी पुरावा व खात्री आहे. प्रथम, देवाने पवित्र शास्त्रलेखांमध्ये याचे अभिवचन दिले. प्रथम याची संपूर्ण खात्री पटल्याशिवाय एकही पाऊल पुढे टाकता येत नाही. विचार करणाऱ्या माणसाला ह्या प्राचीन अभिवचनाखेरीज अन्य कशाची गरज

नाही. याची खात्री पटण्यासाठी त्याला एवढे अभिवचन पुरेसे आहे, "तुझा देव परमेश्वर तुझ्या हृदयाची व तुझ्या वंशजांच्या हृदयाची सुंता करील आणि ...... तू आपला देव परमेश्वर ह्याच्यावर संपूर्ण मनाने व संपूर्ण जीवाने प्रेम करशील." प्रीतीमध्ये परिपूर्ण केले आहे हे येथे किती स्पष्टपणे दाखवले आहे ! - सर्व पातकांपासून सुटका करण्यात आली आहे हे किती ठामपणे नमूद केले आहे ! संपूर्ण अंतःकरणच जर प्रीतीने भरून गेले असेल, तर त्यात पातकाला जागा उरेलच कशी ?

हा दैवी पुरावा व खात्री आहे, दुसरी गोष्ट, दिलेले अभिवचन पूर्ण करण्याचे सामर्थ्य देवाच्या ठांयी आहे - तो दिलेले अभिवचन पूर्ण करतोच. "मनुष्याच्या दृष्टीने हे अशक्य वाटत असले" तरी "देवाला सर्व काही शक्य आहे" असा दृष्टिकोन ठेवण्यात-बाळगण्यात कसलीच अडचण वाटत नाही...... देवाने सांगितले आहे तर तसे घडणारच...

हा दैवी पुरावा व खात्री आहे. त्याचा तिसरा मुद्दा असा की, हे प्रत्यक्ष करण्यास तो समर्थ आहे आणि आत्ता तसे करण्याची त्याची इच्छा आहे आणि का नसावी ? एक क्षण त्याच्यासाठी एक हजार वर्षांसारखा नाही काय ? त्याच्या इच्छेप्रमाणे घडवून आणण्यासाठी त्याला आणखी वेळेची गरज नाही. त्याला ज्या व्यक्तीचा सन्मान करायचा आहे त्याची आणखी **योग्यता** वा **लायकी** वाढावी म्हणून वाट बघण्याची त्याला आवश्यकता नाही, म्हणूनच कोणत्याही क्षणी-वेळी "आजच तारणाचा दिवस आहे." असे आम्हांला निर्भयपणे म्हणता येते. "आज तुम्ही त्याची वाणी ऐकाल तर किती बरे होईल, तुम्ही आपली मने कठीण करू नका."

आत्ता आम्हांला पवित्र करण्याचे सामर्थ्य देवाच्याठायी आहे आणि त्याची तशी इच्छाही आहे असा विश्वास बसण्यासाठी केवळ एकाच गोष्टीची आणखी भर घालणे आवश्यक आहे, तो हे **करतो** हा दैवी पुरावा व खात्री. हे ज्या घटकेला घडते तेव्हा ...... विश्वासणाऱ्याला पुढील गांभीर्यपूर्ण शब्दांच्या सखोल अर्थाचा अनुभव येतो, "पण जसा तो प्रकाशात आहे तसे जर आपण प्रकाशात चालत असलो, तर आपली एकमेकांबरोबर सहभागिता आहे आणि त्याचा पुत्र येशू ह्याचे रक्त आपल्याला सर्व पापांपासून शुद्ध करिते." (1 योहान 1 : 7).

कॅन्सास शहरातील नाझरीन थिऑलॉजिकल सेमिनरीमध्ये मी होतो, त्यावेळी मला किर्क्सव्हिला, मिसुरी येथील सेवकांना भेटण्यासाठी आमंत्रण दिले. तेथे मला रोमकरांस पत्रातील 6 ते 8 अध्यायांचा अर्थ स्पष्ट करून उलगडून सांगण्यास सांगितले होते. या ठिकाणी प्रमुख संप्रदायांसह रोमन कॅथॉलिक प्रिस्ट, तसेच नाझरीन व असेंब्ली ऑफ गॉडचे पाळक यांच्यासह पंधरा ते सोळा लोक उपस्थित होते. आम्ही शहराबाहेरील

एका लहानशा चर्चमध्ये भेटण्यासाठी एकत्र जमलो. आम्ही सर्वजण एका मोठ्या मेजाभोवती बसलो आणि दुपारच्या जेवणापूर्वी आम्ही 6 ते 7 ह्या अध्यायांचा अभ्यास पूर्ण केला. सदर पत्रातून आम्ही सर्वांनीच प्रेषिताला काय म्हणायचे आहे-सांगायचे आहे ते ऐकून घेतले. त्यामुळे आम्हांला त्यातील विचार एकाच वेळी समजले. अशा प्रकारचे आकलनशक्तीमधील ऐक्य पाहून मी फारच प्रभावित झालो. दुपारपर्यंत ह्या अध्यायातील निश्चित अशा विधानापर्यंत आम्ही आलो : "जे देहाच्या अधीन आहेत त्यांना देवाला प्रसन्न करिता येत नाही; परंतु तुम्हांमध्ये जर देवाचा आत्मा वसती करीत आहे, तर तुम्ही देहाच्या अधीन नाही, आत्म्याच्या अधीन आहा" (व. 8-9). "तुम्ही देहाच्या अधीन नाही, तर आत्म्याच्या अधीन आहा" असे पौलाने लिहिले तेव्हा तो स्वर्गातील पवित्रजनांना नाही, तर रोममधील पवित्रजनांना उद्देशून लिहित आहे यावर मी भर दिला.

यानंतर पवित्र आत्म्याच्या पवित्र करणाऱ्या कृपेविषयीची माझी साक्ष सांगण्याची प्रेरणा मला झाली. माझी साक्ष देऊन झाल्यावर माझ्या बाजूला शेजारीच बसलेल्या बॅप्टिस्ट संप्रदायाच्या पाळकांनी विचारले, "तुम्ही खरोखर पवित्र झालात हे तुम्हांला कसे काय समजते ?" मी या प्रश्नाचे उत्तर देणार इतक्यात एका प्रॉटेस्टंट बंधूच्या शेजारी उंच स्टुलावर बसलेल्या रोमन कॅथॉलिक प्रीस्टनी मध्ये व्यत्यय आणला. त्यांच्या शेजारीच बसलेल्या व्यक्तीला टक्कल होते. त्यांच्या डोक्यावर हात ठेवून ते मृदु शब्दांत म्हणाले, "एखादा दिवस उजाडतो, दाढी करताकरता तुम्ही आरशात डोकावता आणि स्वतःशीच म्हणता, 'अरे, हे काय मला टक्कल पडले !' मग असाच एखादा क्षण येतो, देवाचे संपूर्ण आज्ञापालन करण्यास स्वतःचे समर्पण केल्यावर आपण स्वतःशीच म्हणतो, "**अरे, असे घडून आले की !**'"

"परंतु तुम्ही पवित्र झालात, तुमच्यातील उपजत भ्रष्टतेपासून तुमचा बचाव झाला हे तुम्हांला कसे काय समजते ?" वेस्ली [21] विचारतात व उत्तर देतात, "आत्म्याची साक्ष आणि फळ याद्वारे आम्हांला हे समजते." साक्षीचे समर्थन फळ करते. फळाने साक्षीची पुष्टी होते. संपूर्ण परिपूर्ण पवित्रीकरण ही अनुभवाच्या पलीकडची गोष्ट आहे, जीवन बदलून टाकणाऱ्या देवाच्या कृपेचे हे कार्य आहे. ही कृपा अंतःकरणाला आत्मपूजनापासून शुद्ध करते, त्याला देव आणि शेजारी यांच्या प्रीतीत परिपूर्ण करतो तसेच विश्वासणाऱ्यांची ख्रिस्तासारख्या चित्तवृत्तीत वाढ होण्यासाठी प्रेरणा देतो. थेस्सलनीकावासीयांना परिपूर्णपणे पवित्र करण्याचे अभिवचन देवाने दिले होते, असेच आज आमच्यासाठी देखील करण्याचे त्याचे अभिवचन आहे ! "**तुम्हांस पाचारण करणारा विश्वसनीय आहे, तो हे करीलच !**" (1 थेस्सल 5:24).

मुक्त झालो मुक्त मी
पापबंध तुटले ते, मुक्त झालो मुक्त मी
या चला त्वरा करा, स्तुती गा परात्परा
शुद्ध झालो शुद्ध मी !

तारण्या मला प्रभो, तू रक्त सांडिले सुळी
ही जाण नित्य मन्मनास, विसरू कसा माउली
म्हणून या क्षणी प्रभो, स्तवन गीत गातो मी
मुक्त झालो मुक्त मी !

हृदयी या विराज तू, तूच धनी यापुढे
तुझेच बोल नित्य श्रविन, बसेन मी तुझ्यापुढे
राज्य तुझे सर्वकाळ, घोष करीत आज मी
मुक्त झालो मुक्त मी

हृदय हे सुबक स्वच्छ आसन हे तुला दिले
विनम्रता मी बाणली, तुझ्यामुळे हे साधले
इथे आता तुझेच शब्द, वेचणार नित्य मी
मुक्त झालो मुक्त मी

- चार्ल्स वेस्ली

**तुमच्या आध्यात्मिक वाटचालीसाठी प्रकाशशलाका / मार्गदर्शन**

**मुख्य आधारस्तंभ**

**तेथे प्रत्यक्ष उपस्थित असल्याचे जाणवणे**

थेस्सलनीका येथील ख्रिस्ती लोकांच्या गृहमंडळीतील तुम्ही एक सभासद आहात असे समजा. तुम्ही दिवसभरच्या कामावरून दमून, भागून, थकून घरी येता. आज रात्री मंडळीच्या सभेला जाण्याचे त्राण तुमच्या अंगात आहे की नाही हे तुम्हांला ठाऊक नाही; परंतु मंडळीचा एक अत्यंत उत्साही सभासद तुम्हांला सांगतो, "पौलाकडून पत्र आले

आहे ! ही सभा तुम्ही चुकवू नका. आपले पाळक हे पत्र आजच्या सभेत सर्वांना वाचून दाखवणार आहेत !''

पौल - पौलाकडून पत्र आलं आहे ! अचानक तुमचा थकवा नाहीसा होतो - पाय दुखायचे थांबतात. संध्याकाळी बरोब्बर सात वाजता तुम्ही आणि तुमचे कुटुंबीय सभेच्या ठिकाणी अगदी पहिल्या रांगेत बसलेले असता. पौलाने काय लिहिले असेल ?

1. तुमचा विश्वास, प्रेम, छळ होत असताना दाखवलेला खंबीरपणा आणि चांगले उदाहरण याबद्दल पौलाच्या प्रशंसेचे शब्द तुमच्या कानी पडतील तेव्हा तुम्ही कसा प्रतिसाद द्याल ? हे ऐकून तुमच्या मनात

   - कोणते विचार येतील ? ........................................
   - तुम्हांला काय वाटेल ? ........................................
   - तुम्ही काय बोलाल ? ........................................
   - तुम्ही काय कराल ? ........................................

2. प्रीती आणि ममता याविषयीचे विधान पाळकांनी वाचल्यावर तुमची प्रतिक्रिया काय असेल ? ''आपल्या मुलाबाळांचे लालनपालन करणाऱ्या दाईसारखे'', ''आम्हांस तुमच्याविषयी कळकळ वाटते'', ''तुम्हांकरिता आपला जीवही देण्यास राजी... किंवा ''तुम्हांवरील आमच्या अत्यंत प्रीतीमुळे...'' (1 थेस्सल 2: 7-8) यासारखी वाक्ये पाळक वाचतात तेव्हा तुमच्या मनात

   - कोणते विचार येतील ? ........................................
   - तुम्हांला काय वाटेल ? ........................................
   - तुम्ही काय बोलाल ? ........................................
   - तुम्ही काय कराल ? ........................................

3. ''तुमच्या विश्वासातील **न्यूनता**'' (3:10) परिपूर्ण करण्यामागे असणारा पौलाचा हेतू वाचक लक्षात घेतात तेव्हा तुमच्या मनात

   - कोणते विचार येतील ? ........................................
   - तुम्हांला काय वाटेल ? ........................................

- तुम्ही काय बोलाल ? ..............................
- तुम्ही काय कराल ? ..............................

4. तुम्हांला (आणि तुमच्या संपूर्ण मंडळीला) पवित्र करण्याची आणि लैंगिकदृष्ट्या शुद्ध ठेवण्याची देवाची इच्छा आहे असे तुम्ही ऐकता, तेव्हा तुमच्या मनात,
   - कोणते विचार येतील ? ..............................
   - तुम्हांला काय वाटेल ? ..............................
   - तुम्ही काय बोलाल ? ..............................
   - तुम्ही काय कराल ? ..............................

5. देव तुम्हांला परिपूर्णपणे पवित्र करो ( 5 : 23 - 24) अशी प्रार्थना पाळक वाचून दाखवतात तेव्हा तुमच्या मनात,
   - कोणते विचार येतील ? ..............................
   - तुम्हांला काय वाटेल ? ..............................
   - तुम्ही काय बोलाल ? ..............................
   - तुम्ही काय कराल ? ..............................

## पवित्र करणाऱ्या कृपेकडे नेणाऱ्या पायऱ्या

पवित्र करणारी कृपा मिळविण्यासाठी ख्रिस्ती मनुष्याने करावयाच्या चार गोष्टी येथे लिहा. प्रस्तुत पाठाच्या शेवटी जॉन वेस्ली यांचा उतारा दिला आहे, तो वाचा. चार पायऱ्या अशा आहेत -

1. ..............................
2. ..............................
3. ..............................
4. ..............................

पवित्र आत्म्याने दाखवलेल्या मार्गावरून चालण्याची आणि त्या चार गोष्टी करण्याची तुमची तयारी आहे का ?

## उपयोगात आणावयाची साधने

लक्षात ठेवण्याच्या काही गोष्टी :

♦ तुमचा परिवर्तन होण्याचा, नव्याने जन्म होण्याचा अनुभव हे कृपेचे महान कार्य होते, यामुळे तुमचे जीवन बदलून गेले. थेस्सलनीकावासीयांच्या बाबतीत अगदी असेच घडले. त्यांचा विश्वास, प्रेम, काम आणि दृढपणे खंबीर उभे राहणे या सर्व गोष्टी प्रशंसनीय होत्या. नवा जन्म ही काही पवित्रीकरणासाठीची केवळ पार्श्वभूमी नाही. आताच वेळ काढून तारणदायी कृपेबद्दल देवाची स्तुती करा.

♦ शुद्धता आणि आज्ञापालन यांचा सखोल अनुभव तुम्हांला यावा याकरिता देव तुम्हांला पाचारण करतो, ही वस्तुस्थिती आहे. यामुळे तुम्ही निराश होता कामा नये. देवाने तुमच्यासाठी जे अगोदरच करून ठेवले आहे, त्याबद्दल त्याचे आभार मानून, त्याला तुम्ही स्वतःचे समर्पण करा. तो तुमच्यावर प्रीती करतो आणि तुमच्यासाठी सर्वोत्तम तेच करण्याची त्याची इच्छा आहे.

♦ प्रत्येक ख्रिस्ती पिढीतून दोनप्रकारचे ख्रिस्ती लोक पुढे येतात. एका प्रकारचे ख्रिस्ती लोक अपयश असो वा विजय रखडत रखडत चालतात तर दुसऱ्या प्रकारच्या लोकांना सखोल जीवन, पवित्र जीवन गवसलेले असते.त्यांना ख्रिस्तासमान चित्तवृत्तीचा सखोल अनुभव आलेला असतो. या अनुभवाच्या सोबतीने परिपूर्णता, आनंद आणि समाधान ह्या गोष्टी येतात. काही ख्रिस्ती लोक ह्या गोष्टींचे केवळ स्वप्नच पाहतात.

यापैकी कोणत्या गटात तुमचा समावेश व्हावा हे तुमच्या अंतकरणाच्या उत्कंठेवर अवलंबून आहे. गाड्या उडवणे, रात्रीचे वर्ग, संगीताचे धडे, सॉकरचा सराव आणि दूरदर्शन यासारख्या "भुलभुलय्या करणाऱ्या गोष्टीं"मुळे 'ध्येय' धूसर होते. अंतिम उद्देशाप्रत जाणारा मार्ग अस्पष्ट होतो. तो तुम्हांला पाचारण करत आहे आणि तो पाचारण करीत आहे, तंर तो विश्वसनीय आहे. तसेच तुम्हांला दिलेले अभिवचन तो पूर्ण करीलच. तुम्ही त्याच्यावर पूर्ण भंरवसा टाका. तो दुसऱ्यावेळी बोलेल, "तू शुद्ध हो."

*देवाची आपल्यावर जी प्रीती आहे ती आपल्याला कळून आली आहे व आपण तिच्यावर विश्वास ठेवला आहे. देव प्रीती आहे, जो प्रीतीमध्ये राहतो तो देवामध्ये राहतो व देव त्याच्यामध्ये राहतो. न्यायाच्या दिवसासंबंधाने आपल्या ठायी धैर्य असावे म्हणून त्याची प्रीती आपल्यामध्ये अशा प्रकारे पूर्णत्व पावली आहे; कारण जसा तो आहे तसे ह्या जगात आपणही आहो. प्रीतीच्या ठायी भीती नसते, इतकेच नव्हे, तर पूर्ण प्रीती भीती घालवून देते ; भीतीमध्ये शासन आहे आणि भीती बाळगणारा प्रीतीमध्ये पूर्ण झालेला नाही. पहिल्याने त्याने आपणावर प्रीती केली म्हणून आपण प्रीती करितो.*

1 योहान 4 : 16 - 19.

# 9

# परिपूर्ण प्रीती

**जुन्या करारामध्ये देव पवित्र असा** प्रकट झालेला आहे. त्याने निर्माण केलेल्या सर्व गोष्टींपासून तो वेगळा-निराळा असा आहे. तो अत्यंत गौरवी असून, केवळ त्याचेच "डोळे इतके पवित्र आहेत, की त्याच्याने दुष्टता पाहवत नाही" (हबक्कूक 1 : 13). यशया संदेष्ट्याला मंदिरामध्ये देवाच्या पवित्रपणाचा अनुभव आला. त्याची पवित्रता दाखवणारे ते एक प्रभावशाली उदाहरण आहे. यशयाचे देहभान हरपले आणि त्याला "उच्चस्थळी असलेल्या उच्च सिंहासनावरील" प्रभूचे दर्शन झाले, तसेच सराफीम उच्च स्वराने बोलत असल्याचे ऐकू आले,

पवित्र ! पवित्र ! पवित्र ! सेनाधीश परमेश्वर !
अखिल पृथ्वीची समृध्दी त्याचे वैभव होय.
ह्या दृष्टांताने संदेष्टा अगदी नम्र झाला. नतमस्तक होऊन त्याने धावा केला,
हाय हाय ! माझे आता वाईट झाले,
कारण मी अशुद्ध ओठांचा मनुष्य आहे
आणि मी अशुद्ध ओठांच्या लोकात राहतो
आणि सेनाधीश परमेश्वर, राजाधिराज
ह्यांस मी आपल्या डोळ्यांनी पाहिले.

(यशया 6 : 1,3,5)

**पवित्र प्रीती**

नव्या करारामध्ये प्रकट झालेला पवित्र देव हा **प्रीती** आहे. 1 योहान 4 ह्या अध्यायामध्ये देवाचे प्रकटीकरण 'प्रीती' आहे असे सारांशरूपाने सांगितले आहे. नव्या करारातील हा अध्याय यशया 6 ह्या अध्यायाच्या बरोबरीचा आहे. यशया 6 मध्ये देव पवित्र आहे असे प्रकट केले आहे. देवाने प्रथम स्वतःला ''इस्राएलाचा पवित्र प्रभू'' असे प्रकट केले, तोच आमच्याकडे ख्रिस्त म्हणून आला आणि त्याने स्वतःची ओळख प्रीती - **पवित्र प्रीती** अशी करून दिली (यशया 1 : 4; 10 : 17; 12 : 6). देवाचे हे दुहेरी प्रकटीकरण आहे. हा देवाबद्दलच्या सर्व चांगल्या विचारांचा आणि आम्हा मर्त्य मनुष्यासाठीच्या त्याच्या उद्धाराच्या हेतूंचा पाया आहे.

पण ''देव **प्रीती** आहे'' असे निवेदन करण्यामागे योहानाचा **हेतू** काय असावा ? इंग्रजी भाषेतील **लव्ह** ह्या शब्दावरून फारसा अर्थबोध होत नाही. ''प्रीती'' हा शब्द रंग बदलणाऱ्या शॅमेलिऑन सरड्यासारखा आहे. ज्या गोष्टीशी ह्या शब्दाची सांगड घातली जाते त्याचेच रूप हा शब्द घेतो. विल्यम सँगस्टर ह्यांच्या शब्दांत सांगायचे तर ह्या शब्दात सर्व काही सामावलेले आहे. अगदी ''बालिश प्रेमापासून'' ते देवाच्या वैभवशाली प्रीतीपर्यंत सर्व येते - याच प्रीतीने देवाला जगाच्या पातकांसाठी ख्रिस्ताचे अर्पण करण्यास भाग पाडले. इंग्रजी भाषेत ''देव प्रीती आहे'' असे म्हणण्यातून काही कल्पना येत नाही.

ग्रीक भाषेतील परिस्थिती याहून वेगळी आहे, हे तुम्हांला माहित असेलच यात शंका नाही. या भाषेमध्ये, आपल्याला अनुभवायला येणारी निरनिराळ्या प्रकारची प्रीती व्यक्त करण्यासाठी किमान चार निश्चित शब्द आहेत.

या अध्यायामध्ये योहानाला नेमके काय म्हणायचे आहे ते स्पष्ट करण्यासाठी दोन ग्रीक शब्द पुरेसे आहेत - **एरॉस** (मानवी प्रेम) आणि **अगापे** (दैवी प्रीती). मानवी प्रेम हे **गरजेवर आधारित प्रेम** आहे, तर दैवी प्रीती ही प्रेमाची **देणगी** आहे. हा फरक समजावून घेण्यासाठी देव आणि मानवी तारण तसेच विशेष करून "परिपूर्ण प्रीती" याविषयी योग्य विचार करणे अत्यंत आवश्यक आहे.

मानवी प्रेम हे मर्यादित व्यक्तिमत्वाच्या अपूर्णपणाच्या जाणीवेतून निर्माण होणारी प्रेमाची इच्छा आहे. या प्रेमामध्ये दुसऱ्याकडून अपेक्षा केली जाते - हक्क शाबित करणे आणि दुसऱ्याशी एक होणे - आणि दुसऱ्याशी केलेल्या ऐक्यातून व दाखवलेल्या हक्कातून मानवी प्रेमाची परिपूर्ती होते.

**मानवी प्रेमाच्या** संबंधात ग्रीक लोकांमध्ये अनेक दंतकथा प्रचलित आहेत. त्यापैकी एका दंतकथेनुसार, आपण मर्त्य मनुष्ये मुळात संयकुत-पुरुष आणि स्त्री एकत्र-असे होतो; परंतु आपण देवांना त्रास दिला आणि मग त्यांनी रागाने आपल्या क्रोधाचा वर्षाव आमच्यावर करून आम्हांला वेगळे-विभक्त केले. तेव्हापासून एक अर्धा भाग दुसऱ्यांचा शोध घेत आहे. अशाप्रकारे, **मानवी प्रेम** ही मुळात उदात्त, शुद्ध संकल्पना होती.

पवित्रशास्त्र आम्हांला सांगते की, **मानवी प्रेम** ही देवाची स्वतःची कल्पना आणि निर्मिती आहे. आरंभी त्याने आम्हांला "नर व नारी" असे निर्माण केले (उत्पत्ती 1:27). परमेश्वराने म्हटले, "मनुष्य एकटा असावा हे बरे नाही" ( 2 : 18). म्हणून देवाने मनुष्याची सहकारी-जोडीदार म्हणून हव्वेला निर्माण केले. उत्पत्तीमध्ये आपण वाचतो, "यास्तव पुरुष आपल्या आई-बापांस सोडून आपल्या स्त्रीशी जडून राहील, ती दोघे एकदेह होतील" (व. 24). परंतु एक गोष्ट येथे लक्षात घ्या, की ती स्त्री त्याची **पत्नी** असणे आवश्यक होते. मानवी प्रेमाचा आनंद हा **विवाहातून** लुटला पाहिजे हा निर्माणकर्त्याचा उद्देश होता. आमच्या वाढत्या मूर्तिपूजक संस्कृतीतील मोकळा-ढाकळा स्वैराचार येथे अभिप्रेत नाही.

मानवी प्रेमाचा उपभोग-आनंद दैवी उद्देशानुसार घेतला-त्याला विवाहाचे बंधन घालून त्यात सत्यतेने पावित्र्य राखले गेले - म्हणजे **मानवी प्रेम** ही देवाने मानव जातीला देऊ केलेल्या अत्यंत मौल्यवान देणग्यांपैकी एक अशी ठरते. तथापी, एखाद्याचा जोडीदार त्याच्या **सर्व** गरजा पूर्ण करू शकत नाही, म्हणून विवाहामध्ये संपूर्ण मानवी परिपूर्तीची अपेक्षा करणे म्हणजे एकतर मूर्तिपूजेच्या मागे जाणे (निर्माणकर्त्याला बाजूला ठेवून निर्मितीचीच पूजा करणे) किंवा निराश होऊन गोंधळात पडणे होय, कारण मानवी प्रेमाने मानवी अंतःकरणाची तीव्र भूक कधीच शांत होत नाही.

पतंगाला जशी ज्योतीची ओढ असते तशी जे मर्यादित असते त्याला जे अमर्यादित आहे. त्याची ओढ असते, हे समजावून घेण्यासाठी ग्रीक लोकांनी **स्वर्गीय मानवी प्रेमाची** संकल्पना मांडली : अंतःकरणाला सत्य, चांगल्या, सुंदर गोष्टींची-देवाची आस असते. ऑगस्टीनने हे सत्य अत्यंत दर्जेदारपणे व्यक्त केले आहे, याची कबूली देताना ते म्हणतात, "तू आम्हांला तुझ्यासाठी निर्माण केले, तुझ्यामध्ये आम्हांला विसावा मिळत नाही तोपर्यंत आमचे अंतःकरण अस्वस्थच राहणार आहे."

एका गीतकर्तीने हीच कल्पना गीतातून व्यक्त केली आहे :

**गीतकर्त्यांचे आत्मकथन**

**जीवनभर शोधित फिरलो शीतल निर्झर स्त्रोत**
**शुष्क जाहलो, फार लुलपलो तरी राहिलो रिक्त**
**इथे तिथे भागेल तृषा ती, म्हणून धडपडतो**
**अंतरिची ती आग न शमली, हतबल मी झालो**
**क्षुधा छळीते म्हणून तेंव्हा, कांटे कुसळे गिळले**
**हीन-दीन अति क्षीण होत ते अवसानहि गळले**
**तिष्ठत होता अंतरात्मा, इच्छित सुंदर कांही**
**परि न मिळाले पामरास या, दुःखावाचुन काही**
**हालेलुया ! ती दैन्यावस्था येशू मिळता सरली**
**ज्यांच्यासाठी लुलपत होतो, क्षुधा-तृषा ती हरली**
**हवे मला जे तोच पुरवितो, तृप्त ठेवतो सदा मला**
**रुधिराने मी ज्याच्या तरलो, आज तोच मम सोबतीला**

**- क्लारा टी. विलियम्स**

एरॉस म्हणजे देवाबद्दल वाटणारे आमचे मानवी प्रेम, ह्या प्रेमाची खरी पूर्तता फक्त जीवनी पाणी व भाकर असणाऱ्या ख्रिस्तामध्येच आढळते.

**आमच्या दुष्टपणाच्या दलदलीतून आमची सुटका करण्यासाठी, आमच्या पातकापासून आम्हांला स्वच्छ करण्यासाठी आणि आम्हांला पुन्हा आपल्या स्वतःच्या प्रतिमेप्रमाणे घडविण्यासाठी येशू आला आहे.**

**मानवी प्रेमाची** संकल्पना कितीही भव्य-उदात्त आणि सुंदर असली, तरी नव्या करारातील प्रेमाचा हेतू तसा नाही. **अगापे** ही प्रेमासाठीची ख्रिस्ती संज्ञा आहे. हे

आम्हांला देवाबद्दल वाटणारे प्रेम नाही, तर ही **देवाची आमच्यावरील प्रीती होय !** योहान लिहितो, "प्रीती **( अगापे )** म्हणावी, तर हीच आपण देवावर प्रीती केली असे नाही, तर त्याने तुम्हां आम्हांवर प्रीती केली आणि तुमच्या-आमच्या पापांचे प्रायश्चित्त व्हावे म्हणून स्वपुत्राला पाठविले.... देवाची आपल्यावर जी प्रीती आहे ती आपल्याला कळून आली आहे व आपण तिच्यावर विश्वास ठेवला आहे... पहिल्याने त्याने आपणांवर प्रीती केली म्हणून आपण (देवावर व इतरांवर) प्रीती करितो" (1 योहान 4 : 10, 16, 19). येथे आपण नेमके शुभवर्तमानाच्या गाभ्यामध्ये देवाच्या आमच्यावरील पूर्वीपासून असलेल्या, बिनशर्त, सर्वव्यापक प्रीतीमध्ये आहोत.

**एरॉस** (मानवी प्रेम) म्हणजे देवाकडे वर जाणारे आमचे प्रेम तर **अगापे** (दैवी प्रीती) म्हणजे आमच्याकडे वरून खाली येणारी देवाची प्रीती होय.

**अगापे** (दैवी प्रीती) ही प्रत्यक्ष देवाची प्रीती आहे. ती स्वर्गातून आमच्याकडे आली, तिने ख्रिस्त येशूमध्ये प्रत्यक्ष देहधारण केले. एक पापाचा अपवाद केला, तर ह्या प्रीतीने मानवी परिस्थिती पूर्णतः स्वीकारली.

ख्रिस्तामध्ये केलेले देहधारण आणि पाठीवरील वधस्तंभ यांच्यासह ही **आगापे** प्रीती ठेचकाळत-कालवरी नावाच्या टेकडीकडे गेली आणि तिथे तिने स्वतःला "आमच्या पातकांसाठीचे प्रायश्चित्ताचे बलिदान" म्हणून रिक्त केले. आम्ही मर्त्य मनुष्यांनी आम्ही स्वतः व पवित्र देव यांच्यामध्ये अडथळे उभे केले, हे सर्व अडथळे या ख्रिस्ताने मोडून काढले; आमच्या सर्व पातकांची विनामूल्य क्षमा करण्यात आली, आमच्या दुष्टपणाच्या दलदलीतून आम्हांला वर काढून आणि आमच्या पातकांपासून आम्हांला स्वच्छ करून त्याद्वारे आमच्या निर्माणकर्त्याशी आमची पुन्हा सहभागिता प्रस्थापित करून दिली आणि या सर्व गोष्टींच्याद्वारे तो आम्हांला प्रत्यक्ष त्याच्या प्रतिमेप्रमाणे व चित्तवृत्तीसारखे घडवत आहे.

**प्रीतीच्याद्वारे तारण**

**"देवाची आपल्यावर जी प्रीती आहे ती आपल्याला कळून आली आहे व आपण तिच्यावर विश्वास ठेवला आहे."** (1 योहान 4 : 16) म्हणजे तारण होणे. चार्ल्स एच. स्पर्जन ह्यांनी अनेक वर्षे लंडन येथील मेट्रॉपॉलिटन टॅबरनॅकल येथे पाळकीय सेवा केली. त्यांचा तरुण वयात धर्मासंबंधी गोंधळ उडाला होता. "मी असाच गोंधळलेल्या स्थितीत राहिलो असतो." ते सांगतात - "एका रविवारी सकाळी लंडनमध्ये मोठे बर्फाचे वादळ झाले म्हणून बरे." स्पर्जन विशिष्ट चर्चला जाण्याचा रस्ता शोधत होते; पण बर्फामुळे त्यांना काही दिसेना, असेच पुढे चालत असताना शेवटी त्यांना फूटपाथच्या कडेला एक दार उघडे दिसले. ते त्या दारातून आत गेले - आतमध्ये

एका लहानशा प्रिमिटीव्ह / मेथाडिस्ट चॅपेलमध्ये त्यांना सुमारे 12 ते 15 धाडसी आत्मे एकत्र जमलेले दिसले. स्पर्जन आत गेले आणि बाल्कनीच्या खाली असणाऱ्या बाकावर बसले.

लोक पाळकाची वाट पहात होते आणि लवकरच त्यांच्या लक्षात आले, की त्यांचे पाळक बहुधा बर्फाच्या वादळात अडकून पडले असावेत. काही क्षणातच एक सभासद उठले आणि हातात पवित्र शास्त्र घेऊन पुलपिटवर गेले. त्यांनी आपण निवडलेला शास्त्रभाग वाचला. यशया 45 : 22.'' पृथ्वीच्या सर्व सीमांनो ! मजकडे वळा, उद्धार पावा.'' ''हे येशू सांगत आहे !'' त्या सद्‌गृहस्थांनी सुरुवात केली ''वधस्तंभावरील येशू हे बोलत आहे.'' त्यांनी आपला उपदेश पुढे सुरू ठेवला, योहानाच्या पुस्तकातील अवतरण त्यांनी सांगितले, ''जसा मोशेने अरण्यात सर्प उंच केला होता तसे मनुष्याच्या पुत्रालाही उंच केले पाहिजे, ह्यासाठी, की जो कोणी विश्वास ठेवतो त्याला त्याच्याठायी सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे'' (योहान 3:14-15) सुमारे दहा मिनिटांनंतर, स्पर्जन सांगतात, त्या माणसाचा ''उपदेश करून संपला.'' त्याने आपल्या उपदेशाचा समारोप या शब्दांत केला : ''तारण होण्यासाठी महाविद्यालयात जाऊन शिक्षण घ्यावे लागत नाही ! तुम्हांला त्यासाठी हात-पाय देखील हलवावे लागत नाहीत ! एक साधी-सोपी गोष्ट याकरिता करावी लागते. **''येशूकडे पाहा - आणि जीवन जगा !''**

''मग'' स्पर्जन सांगतात ''बाल्कनीच्या खाली बसलेल्या माझ्याकडे पाहून उपदेश करणारे म्हणाले, 'तरुणा, तू दुःखी दिसत आहेस ! तू येशूकडे पाहात नाहीस तोवर तू नेहमीच दुःखी-कष्टी राहणार. तरुणा ! येशूकडे आपली नजर वळव, **आत्ताच** येशूकडे दृष्टी लाव !''

''मी खरोखर येशूकडे पाहिले'' स्पर्जन साक्ष देतात, ''आणि देवाच्या शांतीने माझे अंतःकरण भरून गेले. तसे माझ्या खांद्यांवरील पातकांचे ओझे खाली पडले ! त्याक्षणी मी उभे राहून त्यांच्यातील एका अति सात्विक माणसाबरोबर गीत गायले ते असे :

**भरिले कुंड रक्ताने,**
**दिले ते आम्हा येशूने.**
**पातकी त्यात बुडाले,**
**दोष सर्व वाहुनी गेले.**

**- विलियम कॉउपर**

परंतु पातकांची क्षमा केली जाणे हे जितके भव्य-उदात्त असते, तितकेच किंबहुना त्यापेक्षा अधिक विश्वासाने अद्‌भुत चमत्कार घडून येणे हे वैभवशाली आहे. पातकांची क्षमा

मिळणे म्हणजेच "देवापासून जन्म होणे" आणि अगापे प्रीतीमध्ये सहभागी होण्यास सुरुवात करणे होय. योहान म्हणतो त्याप्रमाणे, ".... जो कोणी प्रीती करितो तो देवापासून जन्मलेला आहे व देवाला ओळखतो..... आपण एकमेकांवर प्रीती करीत असलो, तर देव आपल्याठायी राहतो आणि त्याची प्रीती आपल्याठायी पूर्णत्व पावली आहे." (1योहान 4 : 7, 12).

दोन सत्य तत्त्वे यातून स्पष्ट दिसतात : 1) देवापासून जन्म होणे म्हणजे त्याचे प्रेम मिळणे होय, आणि 2) येशूने आज्ञा दिल्याप्रमाणे एकमेकांवर खरीखुरी प्रीती करणे म्हणजे "देवाची प्रीती पूर्णत्व पावणे" होय (1 योहान 2:5, पाहा मत्तय 22:34-49; योहान 13 : 34 - 35).

## परिपूर्ण प्रीती

या परिच्छेदात सांगितल्याप्रमाणे **अगापे प्रीतीच्या पायऱ्या** आहेत हे स्पष्टच आहे : "न्यायाच्या दिवसासंबंधाने आपल्या ठायी धैर्य असावे म्हणून त्याची प्रीती आपल्यामध्ये अशा प्रकारे पूर्णत्व पावली आहे; कारण जसा तो आहे तसे ह्या जगात आपणही आहो. प्रीतीच्या ठायी भीती नसते; इतकेच नव्हे, तर **पूर्ण प्रीती** भीतीला घालवून देते..... आणि भीतीला बाळगणारा **प्रीतीमध्ये पूर्ण** झालेला नाही" (1 योहान 4 : 17 - 18).

या परिच्छेदातील पूर्णतेशी संबंधित सर्व ग्रीक कियापदे व नामे टेलॉस ह्या मूळ शब्दापासून आलेले असून त्याचा अर्थ "परिणाम", "हेतू", "उद्देश" असा आहे. अगापे प्रीतीने आपले दैवी उद्दिष्ट साध्य केले - **तिने आमच्यामध्ये देहधारण केले** - तेव्हा आमच्याबद्दलही असे म्हणता येईल की "जसा तो आहे तसे ह्या जगात आपणही आहो" (व. 17). येथे "तो" ह्या सर्वनामाचा शब्दशः अर्थ "तो एक" असा आहे आणि हे सर्वनाम ह्या पत्रामध्ये ख्रिस्ताचा उल्लेख करण्यासाठी पाच वेळा वापरले आहे. म्हणूनच प्रेषित म्हणत आहे, "जसा ख्रिस्त आहे तसे ह्या जगात आपणही आहो." अगापे प्रीतीने "परिपूर्णतेची" उंची गाठली आहे - "ती परिपूर्ण करण्यात आली आहे - आमच्या ठायी ख्रिस्ताच्या चित्तवृत्तीची पुर्नघडण करण्यात आली तेव्हा हे घडले. देवाच्या प्रीतीचे आमच्या ठायी **पुन्हा देहधारण** होणे हाच / वैयक्तिक मुक्तीचा खराखुरा अंतिम हेतू आहे.

**देवाच्या प्रीतीचे आमच्याठायी पुन्हा देहधारण होणे हाच वैयक्तिक मुक्तीचा खराखुरा अंतिम हेतू आहे.**

"परिपूर्ण प्रीती" भीती बाळगत नाही. इतकेच नाही, तर न्यायाच्या दिवशी देवाला समोरासमोर भेटण्याची भीतीही पूर्ण प्रीतीच्याठायी नसते (पाहा 1 योहान 4:17-18). "प्रीती असली म्हणजे भीती पळून जाते" बार्कले[1] लिहितात, "भीती हे आता आपल्याला

शिक्षा होणार अशी अपेक्षा करणाऱ्याच्या भावनेचे गुणलक्षण आहे." हाच धागा पकडून वेस्ली म्हणतात, "**प्रीतीची** सत्ता असते तिथे क्षुद्र **भीती** फिरकणारही नाही; कारण अशा **भीतीच्या ठायी छळणूक** असते आणि प्रीतीमुळे मिळणाऱ्या समाधानाशी ही भीती विसंगत असते." यानुसार वेस्लींनी ख्रिस्ती लोकांची चार गटात विभागणी केलेली आहे. ते नमूद करतात - "स्वाभाविक मनुष्याला भय वाटत नाही तसे प्रेमही वाटत नाही; जो जागृत झाला आहे त्याला प्रीतीशिवाय भय वाटते; ख्रिस्ताशी नव्यानेच ओळख झालेले, भितात आणि प्रेम करतात; ख्रिस्तामध्ये परिपक्व झालेले, निर्भय प्रीती करतात."

वेस्लींना[2] ही परिपूर्ण प्रीती त्याच्या आरंभीच्या मेथाडिस्ट लोकांमध्ये पहायला मिळाली. "आमचे लोक चांगले मरतात !" ते म्हणाले. त्यांनी स्वतः प्रतिपादन केले- "मरण्याची कला" ही परंपरा चांगली आहे. अशक्त-दुर्बल वेस्लींनी आपल्या मरणसमयी आपली सर्व शक्ती एकवटून आयझॅक वॅट्स यांचे "माझ्या जीवात जीव आहे तोपर्यंत मी माझ्या निर्माणकर्त्याची स्तुती करीन"[3] ह्या आशयाचे गीत गायले. त्यांचे गाणे ऐकून त्यांच्याजवळ असणारे लोक आश्चर्यचकित झाले. गीताचे शब्द पुढे गाण्याचे वा बोलण्याचे प्रयत्न निष्फळ ठरले." "देव आपल्याबरोबर आहे ही सर्वांत चांगली गोष्ट आहे !" हे त्यांचे अखेरचे शब्द बोलण्यासाठी मात्र त्यांनी आपली शक्ती एकवटली.

काही वर्षांपूर्वी मी न्यूयॉर्कमधील एका मंडळीमध्ये उपदेश करण्यास गेलो होतो. गुरुवार व शुक्रवार अशा दोन्ही दिवशी संध्याकाळच्या सभा संपल्यानंतर एका स्त्रीने मला दरवाजातच थांबवून एक प्रश्न विचारला. ही स्त्री नव्यानेच ख्रिस्ताकडे आली होती. तिचा प्रश्न होता - "ख्रिस्ताने माझे तारण केले आहे हे मला ठाऊक आहे; पण एक **भीती** मला सतत सतावत आहे. मला काही त्याबद्दल समजत नाही. त्या-भीतीचे काय करावे हे तुम्ही मला सांगाल का ?"

तिच्या प्रश्नाचे उत्तर प्रभूनेच द्यावे याला प्राधान्य देऊन मी एवढेच म्हणालो की "तुम्ही उपासनासभांना येत राहा." शनिवारी संध्याकाळी प्रार्थनेसाठी पुढे येण्याचे आवाहन केल्यावर ही स्त्री सर्वप्रथम पुढे आली. काही क्षणानंतर देवाने तिची गरज पवित्र करणाऱ्या कृपेच्याद्वारे अत्यंत सुंदरपणे भागवली. रविवारी सकाळी उपसना संपल्यावर मी चर्चच्या दारात उभे राहून लोकांना भेटत होतो, तेव्हा ती स्त्री पुन्हा येऊन माझ्याशी बोलली, "मला ओळखले का ? दोन-तीन दिवसांपूर्वी मला त्रास देणाऱ्या भीतीबद्दल मी भेटून तुमच्याशी बोलले होते ? बंधू ग्रेटहाऊस, **ती भीती आता** गेली !"

**देवाबद्दलचे प्रेम आणि इतरांबद्दल वाटणारे प्रेम या गोष्टी अविच्छिन्नपणे जोडलेल्या आहेत**

परिपूर्ण प्रीती शिक्षा होईल अशी सतावणारी भीती पळवून लावते.' आता एकच भीती उरते, ती म्हणजे त्याला आमच्याबद्दल वाटणाऱ्या प्रीतीला आम्ही दुःखी करतो. **देवाची प्रीती** परिपूर्णतेप्रत पोचते तेव्हा आमची प्रीती परिपूर्ण होते आणि मग शिक्षा होईल ही भीती दूर होते. याशिवाय ह्या परिच्छेदात आणखी एक गोष्ट स्पष्ट केलेली आहे, देवाबद्दलचे प्रेम आणि इतरांबद्दल वाटणारे प्रेम या गोष्टी अविच्छिन्नपणे जोडलेल्या आहेत. विल्यम बार्कले ह्यांचे अवतरण द्यायचे, तर "सी.एच. डॉड्[4] ह्याविषयी म्हणतात, 'प्रीतीची ऊर्जा स्वतः एका त्रिकोणाच्या रूपात बाहेर पडते. ह्या त्रिकोणाच्या एका टोकाला देव, दुसऱ्या टोकाला स्वतः आणि राहिलेल्या टोकाला शेजारी असतात.' देव आमच्यावर प्रीती करतो, तर एकमेकांवर प्रीती करण्यास आम्ही बांधील आहोत, कारण मानवजातीमध्ये देवाचे जीवन आहे. या आमच्या समयी सर्वकालचे जीवन पुन्हा निर्माण करण्यास आमची नेमणूक झालेली आहे."

"पहिल्याने त्याने आपणांवर प्रीती केली, म्हणून आपण (देवावर आणि इतरांवर) प्रीती करितो." (1योहान 4 : 19). देवाची आमच्या अंतःकरणांमध्ये वसती आहे हे पुराव्यासह सिद्ध करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे आमच्या जीवनांतून सातत्याने इतरांबद्दलचे प्रेम दिसले पाहिजे. यामध्येच प्रीती पूर्णत्वास पोचते. "आत्म्याने परिपूर्ण होणे" (इफिस 5 : 18) म्हणजेच **प्रीतीने** परिपूर्ण होणे होय. एल्वूड एच. स्टोक लिहितात, "आशीर्वादित, दैवी, सार्वकालिक आत्म्या, मला प्रीतीने भरून आताच पूर्ण कर."

**अतूल्य प्रेम**

**सर्व प्रेमाहून थोर ते तुझे दिव्य प्रेम**
**हर्ष भूवरी उतरुनि आला, स्वर्गाचे धाम**
**विनम्रता ती तुझी अंतरी, अमुच्या ठासुन दे**
**मुगुट कृपेचा शिरावरती अमुच्या राहू दे**

**करुणाकर तू अतुल्य तूझी मनुजावर प्रीती**
**वर्णन करण्या शब्दच अपुरे कुंठित होय मती**
**भेट आमुची घे तू आता, ये कर जीवनोद्धार**
**डळमळणारी अंतःकरणे शांती सुखात उभार**
**सर्व समर्था धावुन ये तू, बंधपाश तोडी**
**तुजशी आता जीवन अमुचे चिरंतन जोडी**

**अमुचे हृदयी तुझीच देवा, वसती त्यात करी**
**तुला कधी नाहीच सोडणार, ये पाप ताप वारी**
**रात्रंदिन मी करीन सेवा खंड न पडणार**
**स्तुती महीमा नित्यचि गाइन, कधी न अडणार**

**- चार्ल्स वेस्ले**

### तुमच्या आध्यात्मिक वाटचालीसाठी प्रकाशशलाका

### मुख्य आधारस्तंभ

पुन्हा एकदा हा अध्याय वाचा आणि पुढे दिलेली चिन्हे वापरून विशिष्ट वाक्ये व परिच्छेदांसमोर खुणा करा :

△ तुमच्यासाठी नव्या असलेल्या कल्पना असणाऱ्या परिच्छेदांसमोर त्रिकोणाच्या चिन्हाने खूण करा.

✞ तुम्हांला प्रेरणा, नवीकरण, सांत्वन, आशा देणाऱ्या परिच्छेदांच्या समोर अधिक (+) चिन्हाची खूण करा.

○ तुम्हांला अस्वस्थ, निराश करणाऱ्या किंवा निरुपयोगी वाटणाऱ्या परिच्छेदांच्या समोर वर्तुळचिन्हाची खूण करा.

⇧ तुम्हांला मनापासून पटणाऱ्या परिच्छेदांच्यासमोर उभ्या बाणाच्या चिन्हाची खूण करा.

⇩ तुम्हांला मनापासून न पटणाऱ्या परिच्छेदांच्यासमोर उलट्या बाणाच्या चिन्हाची खूण करा.

? तुम्हांला न समजलेले परिच्छेद किंवा विधाने यांच्यासमोर प्रश्नचिन्हाच्या चिन्हाची खूण करा.

### आध्यात्मिक पायऱ्या

1. पवित्र शास्त्र अभ्यास : योहानाचे पहिले पत्र संपूर्ण वाचा. प्रीतीचा उल्लेख करणारे सर्व परिच्छेद पाहा आणि त्याची यादी तयार करा. तसेच प्रकाश आणि अंधःकार याविषयी 1 योहान काय सांगते हेही लक्षात घ्या.
2. "**एरॉस** (मानवी प्रेम) हे गरजेवर आधारित आहे, तर **अगापे** प्रीती (दैवी प्रेम) ही प्रेमाची देणगी आहे" या प्रकरणातील ह्या विधानाचा विचार करा. हे समजल्यामुळे तुमच्या वैयक्तिक, कौटुंबिक किंवा व्यावसायिक जीवनात कोणता

बदल घडून येईल ?

3. **प्रीतीच्या देणगीने** देव आणि लोकांकडून तुम्हांला कशाप्रकारे आशीर्वाद प्राप्त झाले हे आठवा. प्रेम मोठे मौल्यवान आहे, नाही का ? प्रेम ही अशी गोष्ट आहे, की त्याशिवाय आम्ही परिपूर्ण होत नाही. कादंबरीकार जॉन अपडाईक ह्यांनी आपल्या कादंबरीत आधुनिक संस्कृतीचे चित्रण केले आहे. यात ज्याच्यावर कोणीच प्रेम केले नाही असा एक माणूस स्वयंसहाय्य करणाऱ्या पुस्तकांच्या ढिगात बसून स्वतःच्याच आत्महत्येची योजना तयार करतो.

तुमच्याकडील प्रीतीच्या देणगीचा उपयोग करू शकेल अशी एखादी व्यक्ती तुमच्या डोळ्यांसमोर येते का ?

**उपयोगात आणावयाची साधने**

1. देवाबद्दलचे प्रेम आणि इतरांबद्दल वाटणारे प्रेम ह्या गोष्टी "अविच्छिन्नपणे जोडलेल्या आहेत" असे ह्या प्रकरणाचे लेखक नमूद करतात. मागच्याच प्रश्नात तुम्हांला 'तुमच्याकडील प्रीतीच्या देणगीचा उपयोग करू शकेल अशी एखादी व्यक्ती माहीत आहे का ?' असे विचारले होते. आता नाव, तारीख आणि ठिकाण नमूद करा - वेगळ्या शब्दांत नेमकी-नक्की योजना तयार करा. तुमच्या मित्राला या योजनेविषयी सांगा (नावे किंवा इतर अधिक माहिती तुम्ही देण्याची आवश्यकता नाही) म्हणजे तो किंवा ती तुम्ही "जबाबदारी" पार पाडता की नाही यावर लक्ष ठेवील.

2. जेम्स रसेल लोवेल ह्याच्या गीतातील पुढील कडवे पाठ करा :

**स्वातंत्र्य खरे इतरा द्यावे**
**बंधन शेजाऱ्याचे तोडावे**
**म्हणून हृदये व स्वहस्ते**
**इतरा आम्ही सोडवावे**

3. ज्या व्यक्तींच्या ठायी देवाची प्रीती पूर्ण झालेली असते अशाच व्यक्ती देवाच्या प्रीतीच्या देणगीत (**अगापे** प्रीती) इतरांना उत्तमप्रकारे सामावून घेऊ शकतात. यावर विचार करा.

*त्यांना सत्यात समर्पित कर....... आणि त्यांनीही सत्यात समर्पित व्हावे म्हणून मी त्यांच्याकरिता स्वतःला समर्पित करितो....... जी प्रीती तू माझ्यावर केली ती त्यांच्यामध्ये असावी आणि मी त्यांच्यामध्ये असावे.*

योहान 17 : 17, 19, 26

# 10

# खरे पवित्रीकरण

ख्रिस्ताबरोबर हे पवित्रीकरणाचे नाते जोडणे हे माझ्यासाठी सोपे नव्हते. इतर अनेक लोकांप्रमाणेच मी देखील पूर्ण पवित्रीकरणाचा अनुभव सातत्याने मिळवण्याचा प्रयत्न केला. माझा पालट झाल्यानंतर वर्षभराने मला माझ्या पाळकांबरोबर एका शिबिरसभेला जाण्याची संधी मिळाली. हे शिबिर कॅलिफोर्नियातील पासाडेना कॉलेजमध्ये होते. लांबचा प्रवास करून आम्ही तिथे पोचलो. त्या ठिकाणी बी. एफ. नीले आणि एच. व्ही मिलर ह्यांचे उपदेश होत. त्यांचे उत्तेजनात्मक उपदेश ऐकण्यासाठी तिथे दररोज हजारोंच्या संख्येने लोक येत असत. एका रात्री पूर्णपणे पवित्र होण्यासाठी म्हणून मी पुढे गेलो. मला पाहून सी. डब्ल्यू रुथ खाली उतरून प्रार्थना करण्यास आले. हे एकेकाळी लॉस एंजिलिस येथील फर्स्ट चर्च ऑफ द नॅझरिन येथे फिनिस एफ. ब्रेझी यांचे सहकारी होते. मी जरी देवाचा आस्थेने व कळकळीने शोध करणारा होतो आणि डॉ. रुथ ह्यांची प्रार्थना व मार्गदर्शनाचा लाभ मला झाला, तरी आशीर्वाद माझ्या हातून निसटून गेले.

काही दिवस गेले तसा माझा शोध कसून सुरूच होता. पुढच्याच वर्षीच्या एक मे ह्या दिवशी मी रविवारच्या रात्रीच्या जेवणानंतर स्वतःला माझ्या शयनखोलीत बंद करून घेतले आणि माझी गरज पूर्ण झाल्याशिवाय त्या खोलीतून बाहेर पडायचे नाही असा निश्चय केला. पवित्र **होण्याची** माझी मनापासूनची इच्छा प्रथमच स्पष्टपणे दिसत होती.

तेव्हा प्रभूने मला माझ्या सुप्त स्वभावात दडून बसलेला अहंकार मला दाखवला. माझ्या समस्येच्या अगदी गाभ्यापर्यंत जाऊन त्या वाणीने विचारले, "तुला परत अर्कान्सास (माझा जन्म व्हॅन बुरेन, अर्कान्सास येथे झाला होता.) येथे जाऊन तिथेच सेवाकार्य करावे आणि बिली ग्रेटहाऊस नावाचा कोणी मनुष्य या पृथ्वीतलावर होता हे जगाला कधीच समजू नये, असे तुला वाटते का ?" (उपदेश करण्याच्या पाचारणाला मी केव्हाच उत्तर दिले होते.)

"होय प्रभू", मी उत्तर दिले", मला प्रसिद्धी मिळाली नाही-माझे कोणी ऐकले नाही तरी चालेल; पण तू माझे अंतःकरण पवित्र कर."

मग त्या वाणीने खरेपणा पाहण्यासाठी आणखी पुढे विचारले, "चीन देशात मिशनरी म्हणून जाऊन सेवा करण्याची तुझी तयारी आहे का ?" (ही त्या ठिकाणी समाजवादाची क्रांती होण्यापूर्वीची गोष्ट आहे.)

"होय प्रभू !" मी प्रतिसाद दिला"; पण तू माझ्याबरोबर रूथ ह्यांना पाठवलेस तर मी जाईन." (मी तिथे जाण्याच्या अगोदरच गंभीरपणे विचार करत होतो !)

कोणताही दैवी प्रतिसाद नाही. मग माझे अंतःकरणातील सत्यता पडताळून पाहण्यासाठी वाणीने विचारले, "तिथे एकट्याने जाण्याची तुझी तयारी आहे का ?"

काही वेळ हो-नाही, हो-नाही करीत मी उत्तर दिले, "होय प्रभू ! तुझी तशीच इच्छा असेल, तर मी जाईन."

त्याक्षणी मी मोठ्या आनंदाने उडी मारली, माझे अंतःकरण आत्म्याने आणि अनिर्वचनीय आनंदाने भरून आले होते. (त्या काळात माझे चर्च अविवाहित पुरुषाला मिशनरी म्हणून पाठवत नसे हे मला ठाऊक नव्हते.) माझे समाधान झाले होते. मी तृप्त होतो. **ख्रिस्ताने माझा पूर्णपणे ताबा घेतलेला होता !** त्या रविवारी दुपारी मी जॉन वेस्लींच्या सोबत प्रार्थना केली,

**सूर्याखाली भूतलावर**
**हृदय माझे उतावीळ सांगण्यात**
**तुझेच राज्य माझ्यावर**
**प्रत्येकक्षणी, प्रभू तू विराजमान**

पुढील काही वर्षांमध्ये माझ्यावर ताणतणावाचे प्रसंग आले; परंतु ख्रिस्ताने त्या नेमक्या क्षणी मला सुरक्षित राखले, माझी तीव्र गरज पूर्ण केली, यावेळी त्याच्या इच्छेवर मी सर्व काही सोपवून दिले. केव्हा केव्हा माझी त्याच्यावरील पकड ढिली झाली आहे असे वाटायचे; परंतु त्याची माझ्यावरील पकड कधीच सुटून ढिली पडली नाही,

"त्याच्या कृपेच्या गौरवाची स्तुती व्हावी म्हणून हे झाले", (इफिस 1 : 6) आणि न्यूटन यांच्यासोबत मीही म्हटले,

**धोका, कष्ट, पाश या मधुनी,**
**आलो मी तुझ्या दारी.**
**कृपा तुझी सुरक्षा मज पुरवी,**
**आलो मी तुझ्या घरी.**

पूर्ण पवित्रीकरण हा फक्त अनुभवच नाही, त्यापेक्षाही काही जास्त आहे; ही खरोखर एक अनुभवजन्य वस्तुस्थिती आहे; परंतु अंतःकरणाच्या दृष्टीने पूर्ण पवित्रीकरण म्हणजे ख्रिस्ताबरोबर कराराचे नाते प्रस्थापित करणे तसेच आमच्या संपूर्ण जीविताचा संपूर्णपणे प्रभू होण्याची त्याला परवानगी देणे अशा प्रकारे समर्पण करणे, म्हणजे पौल रोमवासीयांना आग्रहाने सांगतो, तशा प्रकारे देवाला स्वतःला सादर करणे होय : "... मेलेल्यांतून जिवंत झालेले असे स्वतःस देवाला समर्पण करा आणि आपले अवयव नीतीची साधने होण्याकरिता देवाला समर्पण करा........ **पवित्रीकरणाकरिता**" (रोम. 6 : 13,19).

## आत्मत्यागाचा पेच आपण सोडवला पाहिजे

खरेखुरे पवित्र होण्यासाठी नैतिक निर्णयाची गरज आहे. आत्मत्यागाचा पेच आपण सोडवणे अगत्याचे आहे, त्यासाठी देवाची इच्छा जाणून घेतली पाहिजे. आमच्या ठायी अवशिष्ट राहिलेला आत्मकेंद्रितपणा आणि दुटप्पी स्वभाव याची आम्हाला दुःखदायक जाणीव होते तेव्हाच हा पेच उभा राहतो. पवित्रीकरण अधिक खोलवर जाणारी अशी गोष्ट आहे. क्षमा मिळावी म्हणून ख्रिस्ताला केल्या जाणाऱ्या प्राथमिक समर्पणापेक्षा ही पुढची गोष्ट आहे. स्वार्थी स्वभावाच्या व्याप्तीबद्दल अधिकपटीने खात्री पटावी ही त्यामागे प्रेरणा आहे. यासाठी आपला क्षुद्रपणा, महत्त्वाकांक्षा, अहंकार व स्वार्थ स्पष्टपणे तसेच पश्चात्ताप करून मान्य करणे आणि जाणीवपूर्वक, स्वेच्छेने स्वार्थीपणा देवाच्या प्रीतीमध्ये समर्पित करणे आवश्यक आहे. इ. स्टॅन्ली जोन्स[1] ह्यांनी म्हटले आहे :

परस्पर, आत्मसमर्पण नसेल, तर दोन व्यक्तींमध्ये प्रेम असत नाही. दोघांपैकी एकाने जरी आपलाच स्वार्थ कवटाळून बसायचे ठरवले, तरी प्रेम खुंटते. इथेही तसेच आहे.

मग संपूर्ण समर्पणाची किंमत चुकती करा. मला येथे समर्पण असे म्हणायचे आहे,

वाहून घेणे वा अर्पण करणे असा अर्थ अभिप्रेत नाही. अर्पण करताना अर्पण करावयाचे दान अद्याप तुमच्या हाती असते, तर समर्पणामध्ये तुम्ही त्या दानाचा पूर्णपणे त्याग करता ते दान तुमचे राहात नाही-आता त्यावर तुमचा हक्क नसतो. ते पूर्णपणे आणि सगळेच्यासगळे दुसऱ्याचे होते. आता तुम्ही स्वार्थकेंद्रित जीवन न जगता आत्म्याच्या मार्गदर्शनाने जीवन जगता. तुम्ही दोन इच्छांच्याऐवजी एकाच इच्छेचा पर्याय स्वीकारता. तुम्ही स्वतःशी म्हणता, "आता माझे सोडून देतो, देवाला चांगले ते करू देतो." तुम्ही स्वतःला ईश्वराच्या स्वाधीन करता. तुम्ही चांगल्याकरिता किंवा वाईटासाठी, धनासाठी वा दारिद्र्यासाठी, आजारात आणि आरोग्यात, जीवनामध्ये तसेच मरणामध्ये कशासाठीही समर्पण केले तरी तुम्ही स्वतःला त्याच्यासाठी ठेवता. **तुमची सूत्रे त्याच्या हाती आहेत.**

हे समर्पण उघड आहे, तसेच अव्यक्तही आहे. यामध्ये स्वतःचे संपूर्ण सर्वस्वी समर्पण तसेच अंतःकरणात वसलेली प्रत्येक मूर्ती - मग ती कितीही लहान असो - तिचे समर्पण केलेच पाहिजे, त्यांचा समावेश आहे. संत फेनेलॉन लिहितात[2], "'हे एवढेसेच आहे-ते काहीच नाही' आपण म्हणतो. होय, ते काहीच नाही; परंतु जे काहीच नसते-क्षुल्लक असते तेच तुमच्यासाठी सर्वस्व असते; जे क्षुल्लक असते तेच देवाकरिता नाकारण्यासाठी त्याची तुम्ही पुरेशी काळजी घेता; जे क्षुल्लक असते त्याची तुम्ही शब्दाने टर उडवता जेणेकरून ते नाकारण्याची सबब तुम्हांला मिळावी; परंतु अगदी तळाशी ही क्षुल्लक गोष्टच तुम्ही देवापासून मागे ठेवत आहात आणि त्यामुळेच तुमचे नुकसान होणार आहे."

समर्पण केल्याने पवित्र करणाऱ्या कृपेसाठी दार उघडले जाते. म्हणूनच याला स्वतःला मरणे-स्वार्थ सोडून देणे असे म्हणतात.[3]

आम्ही स्वत;ला सर्वस्वी देवाच्या हाती सोपवून देतो तेव्हा आमच्या अंतरंगाचे पवित्रीकरण पूर्ण करण्यासाठीचा त्याचा मार्ग मोकळा होतो. हे पवित्रीकरण तो आमची अंत;करणे पवित्र आत्म्याला पाठवून, शुद्ध करून व त्यांना प्रीतीमध्ये परिपूर्ण करून करतो. (रोम 8 : 3 - 4 ही वचने 13 : 8 - 10 ह्या वचनांशी ताडून पाहा). दैवी कृपेच्या ह्या खोलवर कार्य करण्यातून येशूने आमच्याकरिता केलेल्या अखेरच्या प्रार्थनेचे उत्तर देवाने दिले आहे : "त्यांनीही सत्यात समर्पित व्हावे म्हणून..... हयासाठी की, जी प्रीती तू माझ्यावर केली ती त्यांच्यामध्ये असावी आणि मी त्यांच्यामध्ये असावे." (योहान 17 : 19, 26). **मानवी समर्पण ज्याप्रमाणे अग्रेसर राहून खऱ्या पवित्रीकरणासाठी दार उघडते त्याप्रमाणे दैवी.... त्यावर शिक्कामोर्तब करून हा अनुभव सिद्ध करतो.** हा शेवटचा मुद्दा ओस्वाल्ड चेम्बर्स

पुढील शब्दांत मांडतात :[4]

एकदा का तुमचे येशू ख्रिस्ताशी वैयक्तिक नाते जुळले, की तुम्ही त्यापासून कधीही बाजूला होणार नाही. हाच पवित्रीकरणाचा अर्थ आहे. पवित्रीकरण म्हणजे केवळ अनुभव ह्या संकल्पनेला चिकटून राहण्याचे आमचे मानवी प्रयत्न देव अमान्य करतो. **आमचे पवित्रीकरणही पवित्र करणे अगत्याचे आहे** (पाहा योहान 17 : 19). याचा आम्हांला पूर्ण विसर पडतो. मी जाणून-बुजून माझे पवित्र केलेले जीवन देवाला त्याच्या सेवेकरिता दिले पाहिजे, जेणेकरून त्याला माझा उपयोग त्याचे हात व पाय म्हणून त्याच्या कार्यासाठी करून घेता येईल.

**मी जाणून-बुजून माझे पवित्र केलेले जीवन देवाला........ दिले पाहिजे, जेणेकरून त्याला माझा उपयोग त्याचे हात व त्याचे पाय म्हणून करून घेता येईल.**

आपल्या प्रभूने प्रमुख याजक म्हणून आपल्याकरिता केलेल्या प्रार्थनेकडे आता आपण वळू या. योग्य प्रकारे समजून घेतले, तर ही प्रार्थना शास्त्रलेखविषयक पवित्रीकरणाचे प्रमुख पैलू दाखवते.

**"त्यांना पवित्र कर."**

प्रथम, "त्यांना पवित्र कर" अशी येशू प्रार्थना करतो. याचा शब्दशः अर्थ **"त्यांना वेगळे कर"**, असा आहे. मूळ ग्रीक क्रियापद hagiadzo **हगयडझो** (पवित्र करणे) हे दोन मूळ शब्दांपासून तयार झाले असे ॲडम क्लार्क स्पष्ट करतात : **हा** (नकारात्मक) आणि **गे** (पृथ्वी) हे ते दोन शब्द आहेत. यातून असा अर्थ समजतो. क्लार्क सांगतात, "1) पृथ्वी पासून वेगळे करणे, **शुद्ध करणे, वेगळे करणे** आणि देवाला व त्याच्या सेवेला **वाहून घेणे** किंवा **समर्पित करणे**" आणि 2) **पवित्र अथवा शुद्ध करणे.**"

अशाप्रकारे, "त्यांना पवित्र कर" याचा शब्दशः अर्थ **"त्यांना पृथ्वीपासून बाजूला-वेगळे कर !"** याचाच अर्थ, "त्यांना सांसारिक आणि पातकी गोष्टींपासून वेगळे करून स्वर्गीय आणि पवित्र गोष्टींकडे वळव." वेगळे करण्याची ही प्रक्रिया पवित्रीकरणासाठीचे रूपक असून ते शास्त्रलेखात सर्वत्र पहायला मिळते. पुष्कळदा पवित्र शास्त्रात याची तुलना मौल्यवान धातू शुद्ध-स्वच्छ करणे याच्याशी केलेली आहे. मलाखीच्या पुस्तकातील एक संदर्भ निश्चित याविषयी सांगणारा आहे :

**पाहा, मजपुढे मार्ग तयार करण्यासाठी**
**मी आपला निरोप्या पाठवितो; ज्या**
**प्रभूला तुम्ही शोधिता तो एकाएकी**
**आपल्या मंदिरात येईल ; पाहा, करार**
**घेऊन येणाऱ्या निरोप्याची तुम्ही अपेक्षा**
**करीत आहात, तो येत आहे, असे**
**सेनाधीश परमेश्वर म्हणतो. त्याच्या**
**आगमनाच्या दिवशी कोण निभावेल ? तो प्रगट**
**होईल तेव्हा कोण टिकेल ? कारण तो धातू**
**गाळणाऱ्याच्या अग्नीसारखा, परटाच्या खारासारखा**
**आहे; रुपे गाळून शुद्ध करणाऱ्यासारखा तो**
**बसेल व लेवीच्या वंशजांस शुद्ध करील;**
**त्यांस सोन्यारुप्याप्रमाणे शुद्ध करील ;**
**मग ते धर्माने परमेश्वराला बली अर्पण करतील.**

**- मलाखी 3 : 1 - 3**

आपल्याला, अभिवचन दिल्यानुसार शुद्ध करण्यास येणाऱ्याला निरोप्या म्हणून नेमलेले आहे हे बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाला माहीत होते. यार्देन नदीच्या तीरावर उभे राहून त्याने घोषणा केली, "मी पाण्याने तुमचा बाप्तिस्मा पश्चात्तापासाठी करतो खरा; परंतु माझ्यामागून जो येत आहे तो माझ्यापेक्षा समर्थ आहे, त्याच्या वहाणा उचलून चालण्याची देखील माझी पात्रता नाही; तो पवित्र आत्म्याने व अग्नीने तुमचा बाप्तिस्मा करणार आहे (मत्तय 3 : 11). येथे चित्र आहे ते पूर्वीच्याकाळी धातू गाळून तो शुद्ध करणाऱ्याचे. हा धातू गाळणारा मुशीत घातलेल्या चांदीवर लक्ष ठेवून असतो. शुद्ध करावयाच्या धातूतील सर्व हलके-सलके इतर धातू वर येऊन काढून टाकले जात नाहीत, त्यातील सगळे हीण जळून जात नाही तोपर्यंत ती चांदी अग्नीवरून बाजूला करीत नाहीत. तसेच त्या ओतीव चांदीमध्ये आरशाप्रमाणे त्याला त्याचा चेहरा दिसत नाही तोपर्यंत तो मुशीतून चांदी काढत नाही. हा दाखला म्हणजे ख्रिस्त पवित्र आत्म्याच्या बाप्तिस्म्याने शुद्ध करतो हे दाखविणारा दाखला आहे असे जॉर्ज बट्ट्रिक म्हणतात.[6] येथे तुम्हांला दुहेरी प्रक्रिया पहायला मिळेल : प्रथम, चांदी खाणीतून बाहेर काढली जाते आणि मग ती शुद्ध करण्यासाठी मुशीत घातली जाते. अशाचप्रकारे आमचे पवित्रीकरणही दुहेरी आहे : प्रथम, आम्ही आज्ञापालनाने सुवार्तेला प्रतिसाद देतो तेव्हा

आम्हांला जगापासून वेगळे केले जाते आणि मग आम्ही शुद्ध करण्यासाठी स्वतःला मुशीत घालतो व सतत प्रार्थना करतो,

**ख्रिस्त, पावित्र्य, शांती, सत्प्रीती ती**
**शोभा, सौंदर्य माझिया जीवनी**
**येशू पवित्र तू, शुद्ध मज करी**
**तुझे सौंदर्य दिसो मज्जीवनी**

**- अलबर्ट ऑर्सबॉर्न**

सर्व सोडून माझ्यामागे या, ह्या आपल्या प्रभूच्या पाचारणाला प्रेषितांनी आज्ञापालनाने प्रतिसाद दिला. म्हणूनच त्यांच्याविषयी त्याला म्हणता आले, "जसा मी जगाचा नाही तसे तेही जगाचे नाहीत." (योहान 17 : 16). तथापी, जगापासून वेगळे करून ख्रिस्ताशी जोडले गेले असले, तरी त्यांचा मूर्खपणाचा अहंकार, मत्सर, राग आणि स्वार्थी महत्त्वाकांक्षा यातून अद्याप त्यांची जगातील प्रवृत्ती पहायला मिळते (मार्क 10 : 32 - 45). बाह्यात्कारी ते पवित्र केलेले असले तरी त्यांचे अंतरंग ऐहिक आणि सांसारिक गोष्टींनी भरलेले असते. एखादी गोष्ट जगातून काढून घेणे ही एक गोष्ट झाली; पण आमच्यामधून जगाला बाहेर काढणे ही फारच वेगळी गोष्ट आहे !

प्रेषित आणि त्यांच्याबरोबर पेंटेकॉस्टच्या दिवशी माडीवरील खोलीत एकत्र जमलेले विश्वासणारे ह्यांच्यासाठी येशूने केलेल्या प्रार्थनेला शब्दशः मिळालेल्या उत्तराचा पुरावा पाहून मन प्रफुल्लित होते. त्या दिवशी गौरवी ख्रिस्ताने अभिवचन दिलेल्या अत्म्याने त्यांचा बाप्तिस्मा केला (प्रे. कृ. 2 : 33), त्यांची अंत;करणे विश्वासाने शुद्ध केली (प्रे. कृ. 15 : 8 - 9), त्यांना प्रीतीत परिपूर्ण केले (प्रे.कृ. 2 : 37-42), आणि त्याच्या आत्म्याने परिपूर्ण अशा शरीररूपी मंडळीला त्याने नासरेथकर येशूच्याद्वारे सुरु केलेले सेवाकार्य पुढे सुरु ठेवण्यासाठी सामर्थ्य पुरविले (प्रे. कृ. 1 : 1,8).

आमचा प्रभू प्रार्थना करीत आहे. तो म्हणतो, "तथापि, "मी केवळ त्यांच्यासाठी नाही, तर त्यांच्या वचनावरून जे माझ्यावर विश्वास ठेवतात त्याच्यासाठीही विनंती करितो" (योहान 17 : 20). म्हणूनच ही प्रार्थना **मंडळीसाठी आहे** - कारण पवित्र शास्त्रामध्ये नमूद केलेले प्रेषितांचे शब्द तसेच ख्रिस्ताचे सेवक व शिक्षक ह्यांनी आम्हांला सांगितलेल्या गोष्टी याद्वारे तुम्ही आणि मी ख्रिस्तावर विश्वास ठेवला आहे.

विश्वासणारे ह्या नात्याने, आम्ही स्वतःला ख्रिस्ताच्या मुशीत घालणे अगत्याचे आहे. तसेच आमच्या पापी अंतःकरणातील भ्रष्टतेची आम्हांला जाणीव होऊन आम्ही ते शुद्ध करणाऱ्याने काढून टाकावे म्हणून कबूल करीत नाही, तोपर्यंत (1 योहान 1 : 7,9),

तसेच आमच्या पातकी, स्वार्थी इच्छेमुळे निर्माण होणारा सर्व क्षोभ निवळून त्याच्या परिपूर्ण शांतीमध्ये विसावत नाही तोपर्यंत (इब्री 4:9-10), तसेच आमच्या अंतःकरणाचे रूपांतर होऊन त्यातून प्रत्यक्ष ख्रिस्ताचे प्रतिबिंब परावर्तित होत नाही तोपर्यंत (2 करिंथ 3 : 18) आम्ही ख्रिस्ताच्या मुशीतच असणे अगत्याचे आहे.

**''त्यांना समर्पित कर''**

''त्यांना पवित्र कर'' अशी प्रार्थना / विनंती केल्यावर आमचा प्रभू पुढे म्हणतो, ''जसे तू मला जगात पाठविले तसे मीही त्यांना जगात पाठविले आणि त्यांनीही सत्यात समर्पित व्हावे म्हणून मी त्यांच्याकरिता स्वतःला समर्पित करितो.'' (योहान 17:18- 19)

पित्याने पुत्राला समर्पित केले आणि त्याला जगामध्ये पाठवले, तसे आता पुत्र मंडळीला पवित्र । समर्पित करून तिला जगामध्ये पाठवतो. एमिल बर्नर ह्यांनी एकदा म्हटले होते, ''विस्तवाचे अस्तित्व जसे अग्नीमुळे असते तसे मंडळीचे अस्तित्व तिच्या सुवार्ताप्रसाराच्या ध्येयामुळे असते.'' विस्तव विझतो तेव्हा त्याचे **अस्तित्व संपते.** म्हणूनच जगाला ख्रिस्ताची ओळख करून देण्याच्या ध्येयाने मंडळी पेटून उठत नाही. तेव्हा तिचे मंडळी म्हणून अस्तित्व संपुष्टात येते - आणि ती मंडळी म्हणजे एकतर परुशांचा संप्रदाय होतो किंवा एखादे सामाजिक मंडळ होते ! मंडळी ही पृथ्वीवरील अशी एकमेव संस्था आहे की, विल्यम टेम्पल आम्हांला आठवण करून देतात, की ती प्रामुख्याने जे सभासद नाहीत अशांसाठी अस्तित्वात आहे ! येशू आम्हांला आठवण करून देतो, की मंडळी आहे ती यासाठी की, त्यावरून जगाने समजून घ्यावे की, तू मला पाठविले आणि जशी तू माझ्यावर प्रीती केली तशी त्यांच्यावरही प्रीती केली.'' (योहान 17 : 23). म्हणूनच आपल्या मंडळीसाठी केलेल्या प्रमुख याजकाच्या मध्यस्थीच्या प्रार्थनेचा समारोप करताना येशू प्रार्थना करतो, ''हे न्यायसंपन्न पित्या..... मी तुझे नाव त्यांस कळविले आहे आणि कळवीन, **ह्यासाठी की, जी प्रीती तू माझ्यावर केली ती त्यांच्यामध्ये असावी आणि मी त्यांच्यामध्ये असावे**'' (योहान 17 : 25-26).

मी कोठेतरी एका चांगल्या भावाबद्दलची गोष्ट वाचली. आपले पाळक प्रभूच्या दुसऱ्या येण्यावर योग्य तो भर देत नाहीत असे ह्या भावाला वाटत होते. ''पाळकसाहेब'' त्याने विचारले, ''ख्रिस्त परत येणार आहे हे तुम्हांला ठाऊक नाही काय ?'' त्याला उत्तर मिळाले, ''तो इथून कोठे अन्यत्र गेल्याचे मला तरी माहित नाही !''

दोघांच्याही म्हणण्यात तथ्य आहे. आशीर्वादित आशा, ख्रिस्ताचे दुसरे येणे, हे सर्वांना दिसणार आहे. तो पेंटेकॉस्टच्या दिवसापासून मंडळीच्या बरोबर आहे, ह्या दिवशी पुनरुस्थित ख्रिस्त आत्म्याच्याद्वारे मंडळीमध्ये कायम राहण्यासाठी आला आणि

आत्म्याच्याद्वारे त्याने नासरेथकर येशूच्याद्वारे आरंभलेले सेवेचे कार्य पुढे सुरू ठेवण्यासाठी तो आला. हीच संकल्पना लूक प्रेषितांची कृत्ये सांगण्यास आरंभ करताना सांगत असल्याचे दिसते : "थियफिल, महाराज, येशूने जे प्रेषित निवडले होते. त्यांना पवित्र आत्म्याच्याद्वारे आज्ञा केल्यानंतर तो वर घेतला गेला, त्या दिवसापर्यंत **त्याने जे जे करावयास व शिकवावयास आरंभिले** होते त्या सर्वांविषयी मी पहिला ग्रंथ केला" (प्रे. कृ. 1 : 1 - 2). लूक येथे आम्हांला काही वेगळे समजावून सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. त्याने लिहिलेले शुभवर्तमानातील येशूच्या पृथ्वीवरील जीवन व सेवेच्या कार्याचा वृत्तांत म्हणजे आमच्या प्रभूच्या वैयक्तिक कार्याची केवळ सुरुवात होती, हे तो आमच्या मनावर ठसवू पाहात आहे. तो स्वतः येथे पृथ्वीवर असताना त्याने आरंभ केलेले सेवेचे कार्य आता त्याच्या आत्म्याने परिपूर्ण अशा नव्या शरीररूपी मंडळीच्याद्वारे त्याने सुरू ठेवले आहे.

पवित्र आत्मा मंडळीला पवित्र करून आत्म्याने परिपूर्ण करतो. एखाद्या साठवून ठेवलेल्या पाण्याचे शुद्धीकरण करतात तसे आत्मा शुद्धीकरण करीत नाही, तर वाहत्या पाण्यासारखे शुद्धीकरण करतो. खरे शुद्धीकरण - पवित्रीकरण हाच अंतिम शेवट नाही; तर आणखी एका अत्यंत श्रेष्ठ अशा अंतिम ध्येयाकडे जाण्याचे ते साधन असते. ख्रिस्त आम्हांला पवित्र-शुद्ध करतो - जेणेकरून आम्ही "पवित्र केलेले, स्वामीला उपयोगी पडणारे, प्रत्येक चांगल्या कामास तयार केलेले असे मानाचे पात्र व्हावे" (2 तीमथ्य 2 : 21). **"माय लेडी ऑफ द चिमणी कॉर्नर"** या पुस्तकात अलेक्झांडर आयर्विन आपल्या आईविषयी लिहितात. त्यांची आई आयरिश होती व ती शेतकरी होती. त्यांच्या आईचे नाव ॲना होते. एकदा, त्यांच्या शेजाऱ्यांकडे दुःखद प्रसंग घडला. त्यांची आई शेजारणीचे सांत्वन करण्यास गेली. "आता देवाला सांग, की ह्या दुःखद प्रसंगात तू माझ्याबरोबर आहे याची खूण म्हणून तू आपला हात माझ्या थकलेल्या-मरगळलेल्या डोक्यावर ठेव" असे म्हणून ॲनाने हळुवारपणे आपल्या शेजारणीचे सांत्वन केले.

**पवित्र आत्मा मंडळीला**
**साठलेल्या पाण्यासारखे नाही तर वाहत्या पाण्यासारखे**
**शुद्ध करून पवित्र करतो.**

"प्रार्थनेचे उत्तर मिळाले. देवाने माझे सांत्वन केले. त्याच्या हाताचा स्पर्शही मला जाणवला "आणि तो हात अगदी तुझ्या हातासारखा होता बघ, ॲना", शेजारीणबाईने सांगितले.

ॲनाने उत्तर दिले, "खरे आहे, हात माझा होता, तसा देवाचाही होता." "केव्हा केव्हा ?" ती पुढे म्हणाली, "देव बिशपांचा हात घेतो, डॉक्टरांचा हात घेतो, आईचा हात घेतो आणि कधी कधी तर तो माझ्यासारख्या वृद्धेचा हात घेतो."[7]

### खरीखुरी शुद्धता

**प्रेमाने ईश्वरा तुझ्या, अती भारावलो**
**उतराई मी होऊ कसा, मलाच घे आलो**

**हे हात घे तुझ्या हाती**
**सेवेस सिद्ध कर**
**हे पायही मी अर्पितो**
**दिशा दे, शक्ती भर**

**ही वाणी स्तुती गावया**
**सुस्वर दे मला**
**हे ओठ सुवार्ता सांगाया**
**तूं शब्द दे मला**

**हृदय घे तुला आसन**
**विराजमान हो**
**मला हवे तस घडव**
**तुझाच मान हो**

**मत्प्रेम मी अर्पी तुला**
**चरणात स्थान दे**
**सर्वस्व वाहतो तुला**
**तुझ्या कवेत घे**

**- फ्रान्सिस आर. हॅवेरगल**

**तुमच्या आध्यात्मिक वाटचालीसाठी प्रकाशशलाका / मार्गदर्शन**

मुख्य आधारस्तंभ, "आध्यात्मिक पायऱ्या" आणि "उपयोगात आणावयाची साधने"

ह्या आपल्या नेहमीच्या गोष्टींच्याऐवजी पवित्र करणाऱ्या कृपेचा आस्थेने शोध करणाऱ्यांना आम्ही मार्गदर्शन करणार आहोत.

**पवित्र करणारी कृपा कशी मिळवावी ?**

**अ) ही देवाची इच्छा आहे हे जाणून घ्या.**

"देवाची इच्छा ही आहे की, तुमचे पवित्रीकरण व्हावे" (1 थेस्सल 4 : 3). पौल थेस्सलनीकावासीय विश्वासणाऱ्यांसाठी प्रार्थना करतो. त्या प्रार्थनेशी तुमची आशा व अपेक्षा जुळवून घ्या : "शांतीचा देव स्वतः तुम्हांस परिपूर्णपणे पवित्र करो." (1 थेस्सल 5 : 23).

**ब) देवाला तुमच्या अंतःकरणाची तयारी करण्यासाठी आमंत्रित करा**

देव तुम्हांला स्वभावसिद्ध पातकाच्या अंतरंगात डोकवायला साहाय्य करील. पातकाच्या कृत्याची क्षमा करण्यात आली तरी अंतरंगातील पातक आत्म्याशी झगडत असते हे तो प्रामाणिकपणे तुम्हांला दाखवून देईल. तुमच्या स्वतःच्या अंतःकरणाच्या तीव्र ओढीचा उपयोग करून तो तुमचे मार्गदर्शन करील. तुम्ही त्याच्यावर तुमच्या पूर्ण अंतःकरणाने, आत्म्याने, मनाने व शक्तीने प्रेम करता अशा टप्प्यावर त्याने तुम्हांला आणल्यावर तो पवित्र करणारी कृपा पुरवितो. तुमचे अंतरंग शुद्ध करतो आणि तुम्हांला आपल्या प्रीतीने पूर्ण करतो. अभिवचन खात्रीचे आहे - "जसा तो प्रकाशात आहे तसे जर आपण प्रकाशात चालत असलो तर...... त्याचा पुत्र येशू ह्याचे रक्त आपल्याला सर्व पापांपासून शुद्ध करिते." (1 योहान 1 : 7).

**क) तुमचे समर्पण परिपूर्ण करा**

देवाला सर्वस्वी-संपूर्ण समर्पण करणे ही काही सोपी गोष्ट नाही, हे समपण म्हणजे कृपा देऊ करत असलेले स्वातंत्र्य व संरक्षण याकडे जाण्याचा एकच मार्ग आहे.

पुढे जॉन वेस्ली ह्यांच्या हस्तलिखित प्रार्थना पुस्तिकेतून घेतलेली प्रार्थना दिली आहे. ही प्रार्थना तुमची इच्छा असेल, तर तुम्हांला आपलीशी करता येईल.

**सर्व समर्पणाची प्रार्थना**

**अर्पित मी स्वतःला, करतो तुझ्या हवाली**
**सर्वस्वी मी तुझा रे, तू माय बाप वाली**

हा देह बुद्धी आत्मा, कीर्ती जुना स्वभाव
भौतीक सर्व नीती, ते नाव आणि गाव
हे सर्व त्यागले देवा, तव दे स्वभावशैली

हाती तुझ्या आता मी, तू पूस ते विकार
तू इच्छितो तसा रे, दे तू मला आकार
मी रिक्त जाहलो देवा, दे ही भरून झोळी

होता दुरात्म हल्ला, धावून तूच यावे
या दुर्बलास बापा, बलशालि तू करावे
तुझा बनीव हस्त, अन हात ठेव तू भाली

माझा मुळी न उरलो, झालो तुझाच भाग
संजीवनी हात दे, कधी जाहलोच राख
ही प्रार्थना तू ऐक, हो निरंतर माझा वाली

- जॉन वेस्ले

**ड ) विश्वासाने पवित्र करणारी कृपा तत्क्षणी मिळेल अशी अपेक्षा करा**

प्रथम, ही वाढ हळूहळू होणारी प्रक्रिया आहे असे वाटते आणि विश्वासणाऱ्याच्या अंतःकरणाची तयारी करण्यासाठी देवाला वेळ आवश्यक असतो हे खरेच आहे. (अर्थात्, पवित्रपणाच्या **दिशेने** आणि **मध्ये** वाढ होत असते हे नक्की). परंतु शतकानुशतकांतील देवाच्या लोकांच्या साक्षी पाहिल्या, की संपूर्ण पवित्रीकरण हे तत्क्षणी होते, हेच त्यातून नेहमी जाहीर केले गेले आहे. विश्वासणाऱ्याने संपूर्ण समर्पण करून त्याच्या किंवा तिच्या अंतःकरणाचे दरवाजे दोषमुक्त करणाऱ्या आत्म्याच्या अग्नीसाठी विश्वासाने उघडले म्हणजे त्याच क्षणी पवित्रीकरण होते.

**ई ) तुमच्या अंतःकरणाच्या उत्कंठेचे सोशिकपणे अनुसरण करणे**

तुम्ही तुमच्या अंतःकरणाच्या तीव्र उत्कंठेप्रमाणे अनुसरण केले, तर देव तुम्हांला पवित्र करणाऱ्या कृपेकडे आणि त्याच्याबरोबरच्या समृध्द सहभागितेमध्ये घेऊन जाईल. तुम्ही स्वतःला त्रास किंवा यातना होऊ न देता तुमच्या पूर्ण अंतःकरणाने शोध करा. तुम्हांला आशीर्वाद अगोदरच मिळाले आहेत असा दावा तुम्ही करावा असा प्रयत्न करणाऱ्या उत्साही व्यक्तींच्या प्रयत्नांचा प्रतिकार करा.

दरम्यानच्या काळात, तुम्ही आपले ख्रिस्ती जीवन बंद करून ठेवून देऊ नका. जॉन वेस्ली शिकवतात त्याप्रमाणे संपूर्ण पवित्रीकरणाची ''वाट'' पाहणे म्हणजे तुम्ही स्वतःला ''धार्मिक कृत्यांमध्ये'' (प्रार्थना, उपासना, उपदेश ऐकणे, प्रभुभोजन) आणि ''दयेच्या कृत्यांमध्ये'' (भुकेलेल्यांना भोजन देणे, दुर्बलांना मार्गदर्शन करणे, उघडे असणाऱ्यांना वस्त्रे देणे, आजाऱ्यांनी भेट घेणे) झोकून देणे होय.

देवाने तुम्हांला आपली पवित्र करणारी कृपा-ही कृपा ख्रिस्त वधस्तंभाच्याद्वारे देतो-पुरवावी असा विश्वास त्याच्यावर ठेवता येईल. हे शक्य व्हावे यासाठीच तो मरण पावला. तुम्ही पवित्र-शुद्ध व्हावे यासाठी त्याने प्रार्थना केली. तुमच्यासाठी त्याची इच्छा हीच आहे. तो पवित्र होण्यासाठी पाचारण करतो आणि अभिवचन देणारा विश्वसनीय आहे तो तसे करीलच. त्याच्यासमोर धीराने उभे राहा.

## फ) संपूर्ण पवित्रीकरणासाठी प्रार्थना

तुम्ही मूळचेच ख्रिस्ती असाल आणि तसे करण्यास आत्मा तुम्हांला प्रेरणा देत आहे असे तुम्हांला वाटते, तर पवित्र करणारी कृपा पुरवण्यासाठीची ही प्रार्थना करा आणि ही प्रार्थना ऐकून देव उत्तर देईल अशी विश्वासपूर्वक खात्री बाळगा :

हे प्रिय देवा, तुझ्यासमोर मी आपले अंतरंग उघडून ठेवले आहे. तुझ्या आत्म्याच्या अग्नीने मला शुद्ध कर. ख्रिस्ताला न शोभणाऱ्या गोष्टी काढून टाक. माझे दृष्टीकोन, माझा आत्मा, माझे प्रेम सर्व दोषविरहित असावे. माझ्यातील सर्व पातकीपणा काढून टाक.

मला तुझ्या प्रीतीने भर. मला त्रास देणाऱ्या किंवा माझ्याशी अन्यायाने वागणाऱ्यांशी मी प्रेमाने वागावे याकरितां तू आपली प्रीती माझ्याठायी घाल. मला दैवी प्रीतीची एक ज्योत असे कर.

माझे जे काही आहे ते सर्व घे - काहीही मागे शिल्लक ठेवू नकोस. माझी संपत्ती, पद किंवा नावलौकिक यावर माझा कसलाच अधिकार नाही. माझे शरीर, माझा आत्मा, माझे स्वातंत्र्य, माझे इष्टमित्र आणि माझे जीवन मी तुला देतो. तुझ्या इच्छेनुसार मला घडव. मला तुझी अधिक चांगली जवळून ओळख व्हावी आणि अनंतकाळ तुझीच सेवा घडावी अशीच माझी इच्छा आहे. माझ्या तारक येशूच्या नावात हे मागितले आहे म्हणून तू ऐक, आमेन.[९]

*मुलांनो, तुम्ही देवाचे आहा आणि त्यांच्यावर (खोटे संदेष्टे) तुम्ही जय मिळविला आहे, कारण जगात जो आहे त्याच्यापेक्षा तुम्हांत जो आहे तो मोठा आहे.*

1 योहान 4 : 4.

# 11

# पवित्र जीवन जगण्याचे रहस्य

"मला हे कधीच जमणार नाही !" ती मोठ्या दुःखाने म्हणाली. "देवासाठी जीवन जगावे असा मी जितका अधिक कसून प्रयत्न करते तितके अधिक दुःखदायक अपयश मला येते. मी पवित्र शास्त्र वाचून प्रार्थना करते. नियमित उपासनेला जाते. प्रामाणिकपणे दशांश देते. माझ्या शेजाऱ्यांना साक्ष देण्याचा प्रयत्न करते; परंतु देवाच्या संबंधात माझ्या पदरी रोज अपयशच येते. मला हे कधीच जमणार नाही !"

हे एकून तिचे पाळक हसले, तेव्हा तर तिला रडूच कोसळले. "कृपा करून माझी टर उडवू नका." तिने हरकत घेतली. "हा काही विनोद नाही."

"हा विनोद नाही, हे मला ठाऊक आहे." पाळक उत्तरले, "परंतु तुला हे समजले याबद्दल मी देवाचे आभार मानतो, तुला हे शक्य नाही; पण ख्रिस्ताने हे अगोदरच तुझ्यासाठी करून ठेवलेले आहे."

ख्रिस्ताने अगोदरच पापावर आणि आमच्यावर चाल करून येणाऱ्या अंधःकाराच्या सर्व सत्तांवर विजय मिळवला आहे. प्रेषित योहान खात्री देतो त्याप्रमाणे, "मुलांनो, तुम्ही देवाचे आहा आणि त्यांच्यावर (खोटे संदेष्टे) तुम्ही जय मिळविला आहे, कारण जगात जो आहे त्याच्यापेक्षा तुम्हांत जो आहे तो मोठा आहे." (1 योहान 4 : 4).

पौल थोडी वेगळ्याप्रकारे मांडणी करतो : "ख्रिस्त येशू ...... आपल्याला....... नीतिमत्त्व आणि पवित्रीकरण व खंडणी भरून प्राप्त केलेली मुक्ती असा झाला आहे"

(1 करिंथ । : 30). ख्रिस्त हा आमचे पवित्रीकरण तसेच नीतिमत्त्व आहे आमच्याकरिता मरण पावल्यामुळे तो आमचे नीतिमत्त्व आहे. तसेच आमच्याठायी राहून अधिकार जागवल्याने तो आमचे पवित्रीकरण आहे.

पुढे दिलेली तीन सत्य तत्त्वे ही पवित्र जीवन जगण्यासाठीच्या आधारभूत गोष्टी आहेत.

**लक्षात घ्यावयाचा फरक**

आपण पाहिले त्याप्रमाणे, नियमशास्त्र आणि शुभवर्तमान यातील फरक आपण आपल्या विचारांच्या आघाडीला ठेवणे अगत्याचे आहे. अन्यथा, आम्ही स्वतःलाच गोंधळात टाकून अनावश्यक अपराधाचे धनी होऊ.

नियमशास्त्र म्हणजे देवाची आमच्याकडून काय अपेक्षा आहे; तर शुभवर्तमान म्हणजे, त्याने दिलेल्या अभिवचनांच्या आधारे, तो आम्हांला देतो त्या गोष्टी, असे आपल्याला मार्टिन लूथर ह्यांच्या सुरात सूर मिसळून म्हणता येईल.

जुन्या करारातील करारनामा हा खरोखरच कृपेचा करारनामा होता; परंतु नियमशास्त्र हा त्याचा मध्यवर्ती पैलू होता. नियमशास्त्रातील सर्वांत मोठी आज्ञा कोणती असा प्रश्न विचारल्यावर येशूने उत्तर दिले : तू आपला देव परमेश्वर याच्यावरपूर्ण अंतःकरणाने ..... प्रती कर..... "तू आपल्या शेजाऱ्यावर स्वतःसारखी प्रीती कर. ह्या दोन आज्ञांवर सर्व नियमशास्त्र व संदेष्ट्यांचे ग्रंथ अवलंबून आहेत" (मत्तय 22 : 37, 39 - 40).

जुन्या करारनाम्यामध्ये जीवन देणारा, पवित्र करणारा आत्मा देण्याविषयी फारसे लिहिलेले नव्हते, हीच त्यातील उणीव होती. अगदी नेमकेपणाने सांगायचे झाले, तर आत्मा देण्याचे अभिवचन हेच नव्या कराराचे वेगळे वैशिष्ट्य आहे. आपल्या पुत्राच्याद्वारे, "नियमशास्त्र देहस्वभावामुळे दुर्बल झाल्याकारणाने जे त्याला असाध्य ते देवाने साध्य केले" (रोम 8 : 3). ख्रिस्ताच्याद्वारे देवाने पापाचा पाडाव-पराभव केला आणि पवित्र करणाऱ्या आत्म्याची ओतणी केली (रोम 1 - 4).

नियमशास्त्र ही दैवी आवश्यक गोष्ट म्हणून शिल्लक आहेच, येशूने त्यामध्ये भर घालून ते शुद्ध केले आहे; परंतु आनंदाची वार्ता अशी आहे, की आत्मा नियमशास्त्र परिपूर्ण करतो आणि तो आम्हांला दिलेला आहे ! नियमशास्त्र (देवाने दिलेल्या आज्ञा) हे जर जुन्या कराराचे मध्यवर्ती तत्त्व आहे, तर शुभवर्तमान (देव त्याने दिलेल्या अभिवचनानुसार वागतो) हा नव्या कराराचा गाभा आहे.

**आत्मसात करावयाचे अभिवचन**

पौलाने गलतीकरांना पत्र लिहिले आहे. ह्या गलतीकरांना नियमशास्त्रावर बोट ठेवून

चालणाऱ्या यहुद्यांनी नियमशास्त्राकडे पुन्हा वळण्यास फूस लावली, म्हणून पौलाने त्यांना लिहिले, "अहो, बुद्धीहीन गलतीकरांनो, वधस्तंभावर खिळलेला येशू ख्रिस्त ज्यांच्या डोळ्यांपुढे वर्णन करून ठेवला होता, त्या तुम्हांला-कोणी भुरळ घातली आहे का ? तुम्हांला नियमशास्त्रातील कृत्यांनी आत्मा मिळाला किंवा विश्वासपूर्वक ऐकण्याकडून मिळाला, इतकेच मला तुम्हांपासून समजून घ्यावयाचे आहे. तुम्ही इतके बुद्धिहीन आहा काय ? तुम्ही आत्म्याने प्रारंभ केल्यावर आता देहस्वभावाने पूर्णत्व मिळवू पाहत आहा काय ?" (गलती 3 : 1 - 3)

**ख्रिस्तावरील विश्वासापासून** मागे फिरून स्व-प्रयत्नांच्या दिशेने वाटचाल करणे हे "नियमशास्त्रांतील कृत्यांवर अवलंबून राहणे" (गलती 3 : 10) यासारखेच आहे आणि याचाच अर्थ, पुन्हा भीतीच्या बंधनात जखडून घेणे होय (पाहा रोम 8 : 15).

दुर्दैवाने, देवाने पवित्र होण्याकरिता केलेले पाचारण गंभीरपणे घेणारे बहुतेकवेळा क्षुद्र भीतीच्या विळख्यात सापडतात. जॉन वेस्लेंचे स्पष्ट मत आहे की, क्षमा करणारी प्रीती हीच सर्व गोष्टींच्या मुळाशी आहे. ख्रिस्त येशूमध्ये "आता दंडाज्ञा नाहीच" (रोम 8:1) ही खात्री हेच पवित्रीकरणाचे मूळ आहे. आपला "प्रियकराच्या ठायी स्वीकार केला आहे" (इफिस 1 : 6) याबद्दल देवाचे उपकार माना; परंतु "आमचा स्वीकार झाला आहे हे आम्ही स्वीकारणे अगत्याचे आहे ! "सैतानाच्या योजना" ह्या आपल्या उपदेशात वेस्ली इशारा देतात, की सैतानाकडे एक बलाढ्य शस्त्र आहे. हे शस्त्र म्हणजे आमचा देवाने स्वीकार केला आहे की नाही याविषयी आम्हांला शंका घ्यायला प्रवृत्त करणे, आमच्यातील उणीवांच्यामुळे हे घडते. शंकेला जागा करून वाट देणे म्हणजे प्रथम आमचा आनंद, मग आमची शांती आणि शेवटी विश्वास व प्रीती गमावून बसणे होय.

देवाच्या अभिवचनांवर आम्ही भरंवसा ठेवला पाहिजे. जर आम्ही "देहस्वभावाप्रमाणे नाही, तर आत्म्यानुसार आचरण करितो तर (आम्हांला) दंडाज्ञा नाही" (रोम 8 : 1). अंतःकरणाच्या पवित्रतेचा आशीर्वाद विश्वासाने मिळवण्याच्या टप्प्यावर आपण येतो तेव्हा 'आमचा स्वीकार करण्यात आला आहे' हा आनंद आम्ही टिकवून ठेवणे अगत्याचे आहे. केवळ विश्वासानेच आम्हांला पूर्ण पवित्रीकरणाच्या अनुभवात प्रवेश करता येतो. आम्ही आत्म्यामध्ये आरंभ केला आणि आत्म्यामध्ये आम्ही परिपूर्ण झालो. तारण विश्वासाने आहे, ही बाब पहिल्यापासून शेवटपर्यंत स्पष्ट आहे, पौल रोम येथील मंडळीला लिहितो, "नीतिमान विश्वासाने जगेल" (रोम 1 : 17).

आम्हांला खरोखर पवित्र आणि देवाच्या प्रीतीत परिपूर्ण करणारा विश्वास काय आहे ? पुन्हा एकदा जॉन वेस्लेंच्या[1] उत्तरावर लक्ष केंद्रित करा. इब्री 11 : 1 आणि

रोम 10 : 17 ह्या वचनांच्या आधारे त्यांनी हे उत्तर दिले आहे. ह्या उत्तरातील प्रमुख मुद्दे पाहा :

पहिली गोष्ट, देवाने पवित्र शास्त्रलेखात अभिवचन दिले आहे त्याचा हा दैवी पुरावा व खात्री आहे....

दुसरे म्हणजे देव दिलेले अभिवचन पाळावयास समर्थ आहे, त्याचा हा दैवी पुरावा व खात्री आहे...

तिसरी गोष्ट, दिलेल्या अभिवचनाप्रमाणे तो आत्ता तयार आहे आणि तशी त्याची इच्छा आहे...

देवा आत्ता आम्हांला शुद्ध करण्यास समर्थ आहे आणि तशी त्याची इच्छा आहे. अशा दोन्हींवर आमचा विश्वास आहे. शिवाय ही गोष्ट तो आताच करतो असा विश्वास धरणे हे देखील आमच्यासाठी अतिशय महत्त्वाचे व आवश्यक आहे. हा विश्वास ठेवला जातो त्याच घटकेला हे घडून येते : देव अंतरंगातील आत्म्याला म्हणतो, "तुमच्या विश्वासाप्रमाणे तुम्हांस प्राप्त होवो !"

"शांतीचा देव स्वतः तुम्हांस परिपूर्णपणे पवित्र करो आणि आपला प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्या आगमनसमयी तुमचा आत्मा, जीव व शरीर ही निर्दोष अशी संपूर्णपणे राखली जावोत. तुम्हांस पाचारण करणारा विश्वसनीय आहे; तो हे करीलच" (1 थेस्सल 5 : 23 - 24).

**जगण्यासाठी कृपा**

लक्षात ठेवा, "ख्रिस्त येशू... आपल्याला ...... पवित्रीकरण असा झाला आहे" (1 करिंथ 1 : 30). खरेखुरे पवित्र होणे म्हणजेच पौलाच्या सुरात सूर मिसळून म्हणणे, "ह्यापुढे मी जगतो असे नाही, तर ख्रिस्त माझ्याठायी जगतो" (गलती 2 : 30). पवित्रीकरणाच्या अवस्थेत पौलाने इफिसकरांस पत्रामध्ये केलेल्या प्रार्थनेच्या उत्तराच्या आपल्याला अनुभव आलेला असतो : "त्याने आपल्या ऐश्वर्याच्या समृद्धीप्रमाणे तुम्हांला असे दान द्यावे की, तुम्ही त्याच्या आत्म्याच्याद्वारे अंतर्यामी बलसंपन्न व्हावे, ख्रिस्ताने तुमच्या अंतःकरणामध्ये तुमच्या विश्वासाच्याद्वारे वस्ती करावी, ह्यासाठी की, तुम्ही.... देवाच्या सर्व पूर्णतेइतके परिपूर्ण व्हावे" ( इफिस - 3 : 16 - 17, 19).

ख्रिस्ती होणे म्हणजे, ईश्वरपरिज्ञानाचे अभ्यासक डाएटरिच् बॉनहोएफर् सांगतात, "पूर्वी जुन्या मनुष्याने (स्वभावाने) व्यापलेली जागा आता येशू ख्रिस्ताने व्यापलेली असणे."

याचाच अर्थ पवित्र असणे; खरेखुरे ख्रिस्ती असणे म्हणजेच पवित्र असणे, ह्या दोन्ही गोष्टी सारख्याच आहेत.

वस्ती करून असणाऱ्या आत्म्याच्याद्वारे ख्रिस्त माझ्याठायी राहतो आणि राज्य करतो, हेच पवित्रपणाचे सार आहे. जगावर विजय मिळवणारा विश्वास म्हणजे "जगात जो आहे त्याच्यापेक्षा तुम्हांत जो आहे तो मोठा आहे." (1 योहान 4 : 4), असे सांगणे होय.

"आपण जर आत्म्याच्या सामर्थ्याने जगतो", पौल आग्रहाने विनंती करतो, "तर आपण आत्म्याच्या प्रेरणेने चालावे" (गलती 5 : 25). आत्म्याच्या प्रेरणेने चालणे म्हणजे ख्रिस्त नसेल, तर आम्हाला "काही करता येत नाही" (योहान 15 : 5) हे लक्षात ठेवणे. असे करणे म्हणजे क्षणोक्षणी-प्रत्येक क्षणी त्याच्यावर अवलंबून राहणे होय.

**सखोल विचार करता, पवित्रपणा म्हणजे फक्त चांगल्या संवयी असणे नाही, आणि ख्रिस्ताबरोबरचे जवळकीचे, जिव्हाळ्याचे नाते आम्ही टिकवून ठेवले नाही, तर चांगल्या सवयी म्हणजे केवळ कापून फुलदाणीत ठेवलेली फुलांची रचनाच ठरेल.**

सखोल विचार करता, पवित्रपणा म्हणजे फक्त चांगल्या सवयी असणे नाही आणि ख्रिस्ताबरोबरचे जवळकीचे, जिव्हाळ्याचे नाते आम्ही टिकवून ठेवले नाही, तर चांगल्या सवयी म्हणजे केवळ कापून फुलदाणीत ठेवलेली फुलांची रचनाच ठरेल; परंतु जर आम्ही त्याच्यामध्ये राहिलो तर त्याचे जीवन हे आमचे जीवन होते, त्याची प्रीती आमची प्रीती आणि त्याचा आनंद हा आमचा आनंद होतो.

ख्रिस्ताला त्याच्या पवित्र प्रीतीचे जीवन आमच्यामध्ये जगण्यास परवानगी देणे हेच पवित्र जीवन जगण्याचे रहस्य आहे.

## तुमच्या आध्यात्मिक वाटचालीसाठी प्रकाशशलाका / मार्गदर्शन

### मुख्य आधारस्तंभ

### 1. तुम्हांला तुमच्या स्वबळावर पवित्र जीवन जगता येते का ?

आपल्या पृथ्वीवरील सुमारे एक अब्ज लोक हिंदू किंवा बौद्ध धर्माचे पालन करणारे आहेत. काही चांगले मुद्दे असले तरी हे धर्म निराशा करणारे आहेत. पुन्हा पुन्हा होणाऱ्या पुनर्जन्माच्या व्यूहातून सुटका करून घेण्यासाठी कसलीच आशा नाही. तुम्हांला, योग्य जन्म मिळेपर्यंत जन्मामागून जन्म घेत जीवन जगावेच लागते. नियम, सूत्रे दिलेली आहेत. उदाहरणार्थ, बौद्ध धर्मीय, चार महान सत्यांनी आरंभ करतात, त्याला योग्य जीवन जगण्याचे आठ मार्ग लावा व त्याला दहा

आज्ञा जोडा आणि त्यात पुरुषांसाठी 250 नियम व स्त्रियांसाठी 500 नियम यांची भर घाला. (स्त्रिया दुबळ्या असल्यामुळे त्यांना पुरुषांपेक्षा अधिक नियम लावून दिले आहेत. वास्तविक पाहता, अभिजात बौद्धधर्म शिकवतो, की स्त्रीने ज्ञान प्राप्त करून निर्वाणामध्ये अदृश्य होण्यापूर्वी तिचा पुरुष म्हणून पुनर्जन्म होणे आवश्यक आहे.) हिंदू धर्मातही असेच कडक नियम व कायदे आहेत. त्यांच्या शिकवणीनुसार तारणारा नाही तसेच खंडणी देऊन मुक्त करणारी कृपाही नाही. प्रत्येकाने स्वतःच स्वतःचा उद्धार केला पाहिजे आणि अगदी शेवटचे अंतिम ध्येय काय ? तर निर्वाणाच्या व्यक्तीविरहित अस्तित्त्वात विरून जाणे, येथे सर्व व्यक्तिविशेष कायमचे संपुष्टात येतात. व्यक्तिगत अस्तित्वाचा शेवट म्हणजे पुनर्जन्मांच्या चक्रांचा अत्यंत आशादायक शेवट, असे मानले जाते;; यात ज्ञान प्राप्त करून घेण्यास काहीच मदत मिळत नाही अथवा तारणाची आशाही नसते. गरिबीचे जीवन जगा म्हणजे तुम्ही कदाचित् एक भिकारी, गाढव, किंवा कीटक म्हणून परत याल. भारतातील एक जुने लोकगीत[2] निराशेकडे लक्ष वेधते :

**जन्म किती झाले आठवत नाही,**
**येणार किती जन्म माहित नाही.**
**परंतू, गोष्ट एक माहीत आहे मज,**
**दुःख, कष्ट यांनी भरले सारे पथ.**

**गाईडिंग लाईट्स ?** ह्या पुस्तकात मार्क अल्बर्चट[3] त्यांना उत्तर भारतात भेटलेल्या एका माणसाविषयी लिहितात : "ह्या माणसाने फक्त लंगोटी नेसलेली होती. त्याच्या अंगावर हिंदू प्रतीके रंगवलेली होती. यात भस्माचे पांढऱ्या रंगाचे तीन पट्टेही होते, यावरून तो विनाश करणाऱ्या शिवाचा भक्त, उपासक होता हे स्पष्ट होते. थंडीच्या दिवसांत एकदा एका लहानशा गुहेच्या बाहेर तो बसला होता. पिंजारलेले केस आणि वाढलेली दाढी अशा अवस्थेत तो थंडीत कुडकुडत बसला होता.

"तू असा का बसला आहेस ?" मार्कनी प्रश्न विचारला.

त्याने स्मितहास्य करून अस्खलित इंग्रजीमध्ये उत्तर दिले, "कदाचित् तुला समजणार नाही. मुंबईतील एका धनाढ्य घराण्यात माझा जन्म झाला. माझे पदवीपर्यंतचे शिक्षणही झाले आहे. हे सर्व निरर्थक-मिथ्या आहे असे मला वयाच्या तिसाव्या वर्षी वाटू लागले."

त्याने आणखी पुढे सांगितले की, 1,742 वेळा संसाराने त्याला जन्म-मरणाच्या फेऱ्यातून फिरवले होते. आता हे जन्म-मरण त्याला नको होते. त्याने सांगितले,

"मुंबईत राहून सुखाचे ऐषारामाचे जीवन जगायचे म्हणजे जन्म-मरणाच्या आणखी दुःखदायक फेऱ्यातून फिरणे होय, म्हणून त्याने आपले तारण (त्याचा ज्ञानमार्ग) मिळवण्याचा निर्णय घेतला, याकरिता त्याने सर्व गोष्टींचा त्याग गेला आणि तो तपस्वी पवित्र माणूस म्हणून जीवन जगत होता.

"याचा अर्थ - मी दररोज आठ तास ध्यान करतो आणि फक्त कंदमुळे, फळे, जंगलात मिळणारी वनस्पती इत्यादी खाऊन राहतो. मी पवित्र गंगानदीचे पाणी पितो..... माझा मृत्यू होईल तेव्हा मी..... ह्या दुःख आणि संकटांनी भरलेल्या ग्रहावर परत येणार नाही. मी ज्ञान मिळवलेले आहे."

ह्या विधानाची तुलना प्रकरण 11 मधील "तुला हे शक्य नाही; पण ख्रिस्ताने हे अगोदरच तुझ्यासाठी करून ठेवलेले आहे" ह्या विधानाशी करा. ख्रिस्ती धर्मामध्ये, आशा उथळ नाही, तिची परिपूर्ती झालेली आहे.

## 2. आधारभूत तत्त्वे

प्रस्तुत प्रकरणाच्या रूपरेषेमधील कोनशीलांची उजळणी करा, प्रत्येक भागातील मजकूराचा अभ्यास करा आणि त्यातून पुढे येणारे कालातीत तत्त्व तुमच्या स्वतःच्या शब्दांत मांडा.

लक्षात घ्यावयाचा फरक

कालातीत तत्त्व / सार्वकालिक तत्त्व ..............................

..................................................

आत्मसात करावयाचे अभिवचन

कालातीत तत्त्व / सार्वकालिक तत्त्व ..............................

..................................................

जगण्यासाठी कृपा

कालातीत तत्त्व / सार्वकालिक तत्त्व ..............................

..................................................

**आध्यात्मिक पायऱ्या**

## सातकलमी प्रश्नमंजूषा

1. नियमशास्त्र आणि कृपा (किंवा शुभवर्तमान) यामध्ये फरक करण्यास मी एकदा अपयशी ठरलो / ठरले जेव्हा मी ........................................

........................................................................

2. तुमचा कमकुवतपणा हेरून, देवाने तुमचा स्वीकार केला आहे याबद्दल तुम्हांला शंका घेण्यास सैतानाने प्रवृत्त करून किती काळ लोटला आहे ? मग तुमचा विश्वास परत कसा मिळाला ? तो परत मिळाला का ?

   प्रस्तुत प्रकरणातील जॉन वेस्ली यांचा "सैतानाच्या योजना" या शीर्षकाच्या उपदेशाचा उल्लेख पुन्हा वाचा.

3. मार्टिन लूथर यांच्या दृष्टिकोनातून नियमशास्त्र म्हणजे देवाची आमच्याकडून काय **अपेक्षा** आहे; पण शुभवर्तमान (कृपा) म्हणजे तो आम्हांला **देत असलेल्या** गोष्टी होय. ह्या दृष्टिकोनाचा आत्ता तुमच्या आध्यात्मिक जीवनावर काय परिणाम होत आहे ?

4. मी **ख्रिस्तावरील विश्वासापासून** मागे फिरून स्व-प्रयत्नांच्या दिशेने वाटचाल चालवली होती, तो क्षण ........................................

........................................................................

5. रोम 8 : 3 "नियमशास्त्र देहस्वभावामुळे दुर्बळ झाल्याकारणाने जे त्याला असाध्य ते साधण्याकरिता देवाने आपल्या स्वतःच्या पुत्राला पापमय देहासारख्या देहाने व पापाबद्दल पाठवून देहामध्ये पापाला दंडाज्ञा ठरविली", यावर विचार करा. समजा, आज रात्री तुम्हांला याच वचनावर कौटुंबिक भक्तीमध्ये बोलायचे असेल, तर तुम्ही काय बोलाल ?

6. प्रस्तुत प्रकरणामध्ये आपल्याला आत्म्यामध्ये चाला असे आग्रहाने विनंती करून सांगितले आहे, "क्षणोक्षणी, प्रत्येकक्षणी ख्रिस्ताच्या आत्म्यावर अवलंबून राहा." तुम्ही हे कौशल्याने कसे पार पाडले ? प्रत्येक क्षणी-क्षणोक्षणी आत्म्याच्याठायी वस्ती करून राहण्याच्या तुमच्या वागणुकीत सुधारणा करण्याकरिता तुम्ही कोणती एक गोष्ट कराल ?

7. प्रस्तुत प्रकरणाच्या अखेरीस लेखक "फुले कापून फुलदणीत ठेवलेली फुलांची रचना" हे रूप वापरतात. त्याचा तुमच्या दृष्टीने अर्थ काय आहे ?

## उपयोगात आणावयाची साधने

### 1 ) कोण म्हणाले ?

एखादा मुद्दा वा गोष्ट श्रोत्यांना पटवून देण्यासाठी योग्य पुरावा मांडण्याची आवश्यकता आहे, हा एक महत्त्वाचा पैलू आहे. म्हणजे, तुमच्याकरिता कोण साक्ष देते ? तुम्ही कोणाचा उल्लेख केलात ? प्रेषित योहानाचा की जॉन कोशरन, मार्टीन लूथर की मार्टीन मूल ?

प्रस्तुत प्रकरणामध्ये लेखकाने पवित्र शास्त्राच्या तीन लेखकांचा उल्लेख केला आहे. ते पवित्रपणाविषयी काय सांगतात ते पाहा :

पौल

मत्तय

योहान

लेखकाने त्यांच्या म्हणण्याला पुष्टी देणाऱ्या आणखीही काही लोकांचा उल्लेख केला आहे :

- जॉन वेस्ली

लिलीया एन्. मॉरिस

डाएटरिच् बॉनहोएफर

मार्टीन लूथर

या "साक्षीदारांना" काय म्हणायचे ते पाहा. त्यांच्या मतांवर विचार करा. तुमच्या आध्यात्मिक जीवनाच्या रोजनिशीमध्ये सध्या तुम्हांला अधिक योग्य, अर्थपूर्ण वाटणाऱ्या शब्दांची भर घाला.

### 2 ) गूढ रहस्याप्रमाणे जीवन जगणे

प्रस्तुत प्रकरणाच्या अखेरीस पवित्र जीवन जगण्याचे रहस्य प्रकट केले आहे - ख्रिस्ताला त्याचे पवित्र जीवन तुमच्याद्वारे जगू देणे.

रहस्य एका कार्डावर लिहा. ख्रिस्ताला त्याचे जीवन तुमच्याद्वारे जगू देण्याचे वचन त्या कार्डावर लिहा. ते लिहिलेले कार्ड सतत तुमच्या डोळ्यांसमोर राहील अशा रीतीने तुमच्या पवित्र शास्त्रात, तुमच्या पर्समध्ये किंवा पाकिटात ठेवा, तुमच्या कपाटाच्या - फ्रीजच्या दारावर लावून ठेवा.

*... आपण देवाच्या गौरवाच्या आशेचा अभिमान बाळगतो.*
*... कारण आपणाला दिलेल्या पवित्र आत्म्याच्याद्वारे*
*आपल्या अंतःकरणांत देवाच्या प्रीतीचा वर्षाव झाला आहे.*
रोम 5 : 2, 5.

# 12

# परिपूर्ण प्रीती, गौरवाची चुणुक

आतापर्यंत प्रस्तुत पुस्तकाच्या पानापानांमध्ये आपण ख्रिस्ती ईश्वरी सूत्राचे खास आगळे-वेगळे वैशिष्ट्य पाहिले - हे वैशिष्ट्य शुभवर्तमान आणि नियमशास्त्र यात भेद असल्याचे दाखवते. शुभवर्तमान हे पवित्र आत्म्याचे दान आहे, यात देवाने त्याच्या लोकांना जुन्या करारात दिलेल्या सर्व अभिवचनांची परिपूर्ती आहे आणि आता ते आपल्याला तारणाच्या इतिहासाच्या "शेवटच्या दिवसा"कडे घेऊन जात आहे.

पेन्टेकॉस्टच्या दिवशी प्रेषित पेत्राने केलेली नाट्यमय घोषणा ही देवाच्या अभिवचनाची परिपूर्ती होती :

योएल संदेष्ट्याच्याद्वारे जे सांगितले होते ते हे आहे :

> "देव म्हणतो, शेवटल्या दिवसात असे होईल की,
> मी मनुष्यमात्रावर आपल्या आत्म्याचा वर्षाव करीन तेव्हा
> तुमचे पुत्र व तुमच्या कन्या संदेश देतील, तुमच्या
> तरुणांस दृष्टांत होतील व तुमच्या वृद्धांस स्वप्ने पडतील,
> आणखी त्या दिवसात मी आपल्या दासांवर व आपल्या
> दासींवर आपल्या आत्म्याचा वर्षाव करीन, म्हणजे ते
> संदेश देतील आणि वर आकाशात अद्‌भुते व खाली
> पृथ्वीवर चिन्हे म्हणजे रक्त, अग्नी व धूम्ररूप वाफ
> अशी मी दाखवीन; परमेश्वराचा महान् व प्रसिद्ध दिवस

> येण्यापूर्वी सूर्य अंधकारमय व चंद्र रक्तमय होईल,
> तेव्हा असे होईल, की जो कोणी परमेश्वराच्या नावाने
> त्याचा धावा करील तो तरेल.''
>
> (प्रे. कृ. 2 : 16 - 21).

या ठिकाणी योएल संदेष्टा सांगत असलेले ''शेवटचे दिवस'' म्हणजे अभिवचनाने देऊ केलेले तारणाचे युग, आत्म्याचे युग; ह्या युगाचा आरंभ पेंटेकॉस्टच्या दिवशी झाला आणि ''परमेश्वराचा महान् व प्रसिद्ध दिवस येईपर्यंत'' म्हणजे ख्रिस्त शेवटची मुक्ती देण्यासाठी व न्याय करण्यासाठी परत येईल तोपर्यंत हे युग सुरू राहणार आहे.

**देवाच्या आत्म्याचा वर्षाव म्हणजे त्याने भरभरून केलेली प्रीती होय.**

''रोमकरांचा पेंटेकॉस्ट'' असे ज्या शास्त्रलेखाबद्दल म्हटले जाते त्या ठिकाणी प्रेषित पौल तारणाच्या युगामध्ये पवित्र आत्म्याचे दान मिळाले त्याचे नीतिविषयक महत्त्व आम्हांला सांगतो : ''आपणांला दिलेल्या पवित्र आत्म्याच्याद्वारे आपल्या अंतःकरणात देवाच्या प्रीतीचा वर्षाव झाला आहे.'' (रोम 5 : 5). देवाच्या आत्म्याचा वर्षाव म्हणजे त्याने भरभरून केलेली प्रीती होय.

पौलाच्या लिखाणातील संपूर्ण, भरपाई करून मुक्त करणारे तारणाचे महत्त्व समजावून घ्यायचे, तर आपण त्याचा संदर्भ लक्षात घेणे अगत्याचे आहे, ''म्हणून आपण विश्वासाने नीतिमान् ठरविलेले आहोत म्हणून आपणांला आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताच्याद्वारे देवाबरोबर शांती आहे. आपण ज्या कृपेमध्ये आहो, त्यात आपला प्रवेशही त्याच्याद्वारे विश्वासाने झाला आहे आणि आपण देवाच्या गौरवाच्या आशेचा अभिमान बाळगतो. इतकेच नाही, तर संकटांचाही अभिमान बाळगतो, कारण आपल्याला ठाऊक आहे की, संकटाने धीर, धीराने शील व शीलाने आशा निर्माण होते आणि आशा लाजवित नाही, कारण आपणांला दिलेल्या पवित्र आत्म्याच्याद्वारे आपल्या अंतःकरणात देवाच्या प्रीतीचा वर्षाव झाला आहे'' (रोम 5 : 1 - 5).

पेंटेकॉस्टच्या दिवशी देवाने ''आपल्या प्रीतीचा वर्षाव'' प्रेषितांच्या अंतःकरणात केला आणि यामुळेच त्यांची जीवने प्रीतीत त्याच्यासाठी व त्यांच्या सहकारी बांधवांच्या सेवेकरिता म्हणून वेचण्यास भाग पाडले. ही सेवा त्यांनी ठाम-दृढ अशा विश्वासाने केली. देवाने आपल्या पुत्राला मेलेल्यातून उठवून-वधस्तंभावर खिळलेल्या येशूला उन्नत करून व आपल्या स्वतःच्या उजव्या हाताला बसवून आपल्या राज्याचा आरंभ केला आणि ह्या राज्याची परिपूर्ती म्हणजे तो आपल्या पुत्राला दुसऱ्यांदा त्याच्या लोकांना मुक्ती देण्यासाठी व जगाचा न्याय करण्यासाठी पाठवणार आहे.

अशाचप्रकारे, पिता, पवित्र आत्म्याच्याद्वारे आमच्या अंतःकरणांत आपल्या प्रीतीचा वर्षाव करतो तेव्हा आपणही देवाची ओळख करून घेण्यास व त्याच्यावर प्रेम करण्यासाठी तसेच इतरांसाठी आमचे जीवन वेचण्यास मोठ्या उत्साहाने आवेशी होतो. याबद्दलची खात्री आम्हांला असते, की ज्याने आमच्या ठायी चांगले काम आरंभिले तो ते "येशू ख्रिस्ताच्या दिवसापर्यंत सिद्धीस नेईल" (फिलिप्पै 1 : 6).

शुभवर्तमानाविषयीचा विश्वास, प्रेम आणि आशा ही अशा प्रकारची आहे.

आम्हांला दिलेल्या पवित्र आत्म्याच्याद्वारे आमच्या अंतःकरणात देवाच्या प्रीतीचा वर्षाव झाला आहे, तेच आमचे **पावित्र्य** आणि आमची **आशा** होय.

ह्या प्रत्येक सत्याचा आपण थोडक्यात आढावा घेऊ.

**पहिली गोष्ट, देवाच्या प्रीतीने आमची अंतःकरणे भरून वाहत आहेत हे आमचे पावित्र्य त्याच्या नियमशास्त्रातील प्रीतीच्या आज्ञेची पूर्णता होय.**

### नियमशास्त्रातील महान आज्ञा

आपण पूर्वी पाहिलेल्या एका मुद्द्याची पुन्हा उजळणी करू या. नियमशास्त्रातील सर्वात मोठी आज्ञा कोणती असा प्रश्न विचारणाऱ्या शास्त्र्याला येशूने उत्तर दिले, "**तू आपला देव / परमेश्वर ह्याच्यावर पूर्ण अंतःकरणाने, पूर्ण जीवाने व पूर्ण मनाने प्रीती कर'** हीच मोठी व पहिली आज्ञा आहे. हिच्यासारखी दुसरी ही गोष्ट आहे की, '**तू आपल्या शेजाऱ्यावर स्वतःसारखी प्रीती कर.'** ह्या दोन आज्ञांवर सर्व नियमशास्त्र व संदेष्ट्यांचे ग्रंथ अवलंबून आहेत." (मत्तय 22 : 36 - 40).

### नियमशास्त्र आणि शुभवर्तमान

नियमशास्त्र आणि शुभवर्तमान यातील फरक तुम्हांला ठाऊक असेल, तर तुम्ही ईश्वरपरिज्ञान तज्ज्ञ आहात यावर मार्टीन लूथर ह्यांनी भर दिला आहे. म्हणूनच हा विचार करा की, देवाचे नियमशास्त्र परिपूर्ण प्रीतीची आज्ञा देते (अनु. 6:4-5; लेवीय 19:18) पण ही प्रीती ते देत नाही; परंतु देवाचे शुभवर्तमान काय सांगते ऐका : "नियमशास्त्र देहस्वभावामुळे दुर्बळ झाल्याकारणाने जे त्याला असाध्य ते साधण्याकरिता देवाने आपल्या स्वतःच्या पुत्राला पापमय देहासारख्या देहाने व पापाबद्दल पाठवून देहामध्ये पापाला दंडाज्ञा ठरविली; ह्यात उद्देश हा की, (देव आणि इतरांबद्दल वाटणारे प्रेम - 5 : 5; 13 : 8 - 10) जे आपण देहस्वभावाप्रमाणे नव्हे, तर आत्म्याप्रमाणे चालतो त्या आपणामध्ये नियमशास्त्राने लावून दिलेले आचरण पूर्ण व्हावे" (रोम 8 : 3 - 4). देव पवित्र आत्म्याच्याद्वारे आमच्या अंतःकरणांत आपल्या प्रीतीचा वर्षाव करतो. या कृतीतून तो आमच्या ठायी नियमशास्त्राला अपेक्षित असणारी आज्ञापालनाची वृत्ती-स्वभाव निर्माण करतो.

## परिपूर्ण प्रीती

प्रेषित योहान आपल्या पहिल्या पत्रामध्ये काय लिहितो ते ऐका, "प्रियजनहो, आपण एकमेकांवर प्रीती करावी, कारण प्रीती देवापासून आहे; जो कोणी प्रीती करितो तो देवापासून जन्मलेला आहे व देवाला ओळखतो. जो प्रीती करीत नाही तो देवाला ओळखीत नाही; कारण देव प्रीती आहे..... आपण एकमेकांवर प्रीती करीत असलो आणि "त्याच्या वचनाप्रमाणे चालतो" (2 : 5) तर देव आपल्या ठायी राहतो आणि त्याची प्रीती आपल्या ठायी पूर्णत्व पावली आहे. ..... देवाची आपल्यावर जी प्रीती आहे ती आपल्याला कळून आली आहे व आपण तिच्यावर विश्वास ठेवला आहे. देव प्रीती आहे, जो प्रीतीमध्ये राहतो तो देवामध्ये राहतो व देव त्याच्यामध्ये राहतो. न्यायाच्या दिवसासंबंधाने आपल्या ठायी धैर्य असावे म्हणून त्याची प्रीती आपल्यामध्ये अशा प्रकारे पूर्णत्व पावली आहे; कारण जसा तो आहे तसे ह्या जगात आपणही आहो" (1 योहान 4 : 7 - 8, 12, 16 - 17).

वर वचन 17 मध्ये "तो" हे सर्वनाम आहे, प्राथमिकदृष्ट्या हा उल्लेख बहुधा ख्रिस्ताच्या संदर्भात असावा असे वाटते (पाहा मत्तय 5 : 48) परंतु ऑगस्टीन ह्यांना येथे डोंगरावरील प्रवचनातील येशूच्या नीतितत्त्वाशी समांतर मुद्दा दिसला. देव जो पिता तो सर्व व्यक्तींवर विनाअट प्रेम-प्रीती करतो - यामध्ये त्याचे शत्रू तसेच त्याचे मित्रही आले-तसे "ह्या जगात आपणही आहो." जर आपण त्याच्या **अगापे** प्रीतीने विनाअट प्रेम केले तरच याचा उपयोग आहे. अशाप्रकारे प्रीती करणे म्हणजेच "जसा आमचा स्वर्गीय पिता पूर्ण आहे तसे पूर्ण होणे" (पाहा मत्तय 5 : 48). "हे असे झाले पाहिजे; पण आमच्याकडून हे होणार नाही" हे आम्हांला माहित आहे." बोनी थर्स्टन म्हणतात "पण आम्ही जेव्हा आमच्या इच्छेने येशूच्या मागे जातो, त्याचे अनुकरण करतो, तेव्हा 'एखादी व्यक्ती आम्हांला आवडत नसेल' तरी तिच्यासाठी चांगले काम आम्हांला करता येते."[1]

इफिसकरांनी प्रीतीमध्ये परिपूर्ण व्हावे यासाठी पौल प्रार्थना करतो : "..... त्या पित्यासमोर मी गुडघे टेकून अशी विनंती करितो, की त्याने आपल्या ऐश्वर्याच्या समृद्धीप्रमाणे ..... तुम्ही त्याच्या आत्म्याच्याद्वारे अंतर्यामी बलसंपन्न व्हावे; ख्रिस्ताने तुमच्या अंतःकरणामध्ये तुमच्या विश्वासाच्याद्वारे वस्ती करावी; ह्यासाठी की, तुम्ही प्रीतीत मुळावलेले व पाया घातलेले असे असून ...... तुम्ही देवाच्या सर्व पूर्णतेइतके परिपूर्ण व्हावे" (इफिस 3 : 14, 16 - 17, 19).

**देवाने आमच्या अंतःकरणात प्रीतीचा वर्षाव केला आणि आत्म्याच्याद्वारे ती आमच्या ठायी परिपूर्ण केली** हे ख्रिस्ती व्यवस्थेतील सर्वश्रेष्ठ अभिवचन

आहे. वेस्ली सांगतात''[2] - जोवर तुम्हांला उचलून अब्राहामाच्या उराशी नेले जात नाही तोवर यापेक्षा उंचावर तुम्हांला जाताच येणार नाही.''

**दुसरी गोष्ट आणि तितकीच महत्त्वाची, देवाने पवित्र आत्म्याच्या द्वारे आमच्या अंतःकरणांत प्रीतीचा वर्षाव केला. हीच आमची आशाही आहे - ख्रिस्त परत येईल तेव्हा गौरवाची खात्री पटून त्याचा पहिला हप्ता आम्हांला मिळेल.**

''खाणे व पिणे ह्यात देवाचे राज्य नाही, तर नीतिमत्व, शांती व पवित्र आत्म्याच्याद्वारे मिळणारा आनंद ह्यात ते आहे.'' (रोम 14 : 17). आत्म्यामधील ह्या आशीर्वादांचा अनुभव यावा याकरिता ''अंतःकरणात अगोदरच स्वर्ग उघडलेला असणे'' अगत्याचे आहे, असे वेस्ली सांगतात. पवित्र आत्मा ''ख्रिस्ती आत्म्यालाही प्रेरणा देतो, आपण देवाचे मूल असल्याची साक्ष आत्मा देतो, त्यातून विश्वसनीय आनंद मिळतो आणि यातून त्याला 'अनिर्वाच्य गौरवयुक्त आनंदाचा उल्लास मिळतो.''''[3]

## आत्म्याची मोहोर आणि हमी

''देवाची वचने कितीही असोत, त्याच्याठायी होय हे आहे'', पौल 2 करिंथ 1 : 20-20 ह्या वचनांत लिहितो, '' म्हणून आम्ही देवाच्या गौरवाला त्याच्याद्वारे 'आमेन' म्हणतो. जो आम्हांला अभिषेक करून तुमच्याबरोबर ख्रिस्ताच्या ठायी सुस्थिर करीत आहे तो देव आहे; त्याने आम्हांला मुद्रांकित केले व आमच्या अंतःकरणांत आपला आत्मा हा विसार दिला'', पुन्हा इफिस 1 : 13 - 14 ह्या वचनांमध्ये तो म्हणतो, ''तुम्हीही....... त्याच्यावर विश्वास ठेवला आणि त्याने देऊ केलेल्या पवित्र आत्म्याचा तुम्हांवर त्याच्याठायी शिक्का मारण्यात आला आहे. देवाच्या गौरवाची स्तुती व्हावी म्हणून त्याच्या स्वकीय जनांच्या, खंडणी भरून मिळवलेल्या, मुक्तीसाठी हा [illegible] आत्मा आपल्या वतनाचा विसार आहे.''

ह्या दोन शास्त्रभागांमध्ये आपल्याला अद्‌भुत आणि मौल्यवान असे रूपक पहायला मिळते. सर्वप्रकारची पत्रे आणि अधिकृत दस्तऐवज पूर्वीच्या काळी लाखेने सीलबंद करीत असत. लाख गरम करून पत्रावर लावली जात असे आणि मग पाठवणारा त्यावर आपली मोहोर उमटवत असे. अशा प्रकारे पत्र वा दस्तऐवज अधिकृतपणे मोहोरबंद करून पाठवले जात असत. **विश्वासणाऱ्याच्या जीवनातील पवित्र आत्मा म्हणजे त्या जीवनावरील मान्यतेचा दैवी शिक्का-मोहोर होय.''** तथापी, देवाने घातलेला स्थिर पाया टिकून राहतो, त्यावर हा शिक्का मारलेला आहे 'प्रभू आपले जे आहेत त्यांना ओळखतो' आणि 'जो कोणी प्रभूचे नाव घेतो त्याने अनीतीपासून दूर रहावे''' (2 तीमथ्य 2 : 19). नम्र-लीन अंतःकरणात मवाळपणा आणि मृदुपणा असेल, तर

पवित्र आत्मा ही मोहोर असते आणि त्यावर उमटवलेली ख्रिस्ताची प्रतिमा ही ओळख पटण्यासाठीची खूण असते. उमटवलेली मोहोर-मारलेला शिक्का हा एकाचवेळी विश्वासणाऱ्यासाठी खात्री तर जगासाठी चिन्ह असे असते.

विसाराचे रूपक आणखी एक सुंदर सत्य समोर ठेवते. विसार म्हणजे काम पूर्ण करण्यापूर्वी दिलेली हमी रक्कम किंवा advance असतो, त्यामुळे करार पक्का होतो आणि व्यवहार पूर्ण करण्याची जबाबदारी ग्राहक व व्यापारी अशा दोघांवरही असते. पवित्र आत्म्याची मिळालेली देणगी हा जणू काही पहिला हप्ता होय. पुढे ख्रिस्त आमचे तारण पूर्ण करण्यासाठी परत येणार आहे, तेव्हा आम्हांला देवाच्या योजनेतील अनंत आशीर्वाद मिळणार आहेत. म्हणजेच जितका काळ आम्ही देवाच्याठायी राहतो आणि तो आमच्याठायी राहतो तोवर आम्हांला स्वर्गात जाण्याची **हमी** तसेच त्याची **झलक** पहायला मिळाली आहे. "देवाच्या पवित्र आत्म्याला खिन्न करू नका" पौल ताकीद देतो, "'खंडणी भरून प्राप्त केलेल्या मुक्तीच्या दिवसापर्यंत तुम्ही त्या आत्म्याच्या योगे मुद्रित झाला आहा" (इफिस 4 : 30) आम्ही अधिक देवाच्या प्रीतीत राहतो आणि त्याची प्रीती आमच्याठायी वस्ती करते. तसेच "आम्ही अनीतीपासून मागे फिरतो" आत्म्याचा शिक्का आमचा आहे आणि आम्ही स्वर्गात जाणार अशी आमची खातरजमा होऊन त्याची झलकही पहायला मिळाली आहे.

### "आत्म्याचे प्रथम फळ"

रोम 8 मध्ये पौल आणखी एक रूपक वापरतो. "आत्म्याचे प्रथम फळ" (व. 23). ख्रिस्ती लोक लुटत असलेल्या आनंदाबद्दल तो बोलत आहे. ह्या रूपकावर विचार करा. कालेब व यहोशवा ह्यांनी कनान देशातून आणलेले द्राक्षांचे घड, दूध आणि मध ह्या गोष्टी म्हणजे वचनदत्त भूमीची झलक होती (अर्थात, त्यांनी पुढे होऊन तो देश ताब्यात घेतला असता, तर त्यांना हे सर्व मिळाले असते), त्याचप्रमाणे पवित्र आत्मा हे "प्रथम फळ" आहे, आम्ही ख्रिस्ताला पाहू तेव्हा आम्हांला मिळणाऱ्या गौरवाची ही झलक आहे.

सी. एफ. बटलर ह्यांनी आम्हांला गायला शिकवले,

**स्वर्गाची प्रचिती**

**सुहास्य वदन येशूचे जोवरी न पाहिले**
**तोवरी तो स्वर्ग दूर, ते स्वप्न एक वाटले**
**परंतु सत्य प्रगटले, येशूठायी भेटले**
**स्वर्गरूप मन्मनी सिद्ध आज जाहले**

**स्वर्ग आहे जाणले, गा हालेलुया ! सत्य ते**
**मी पापमुक्त जाहलो, स्वर्गात साक्ष गाजते**
**चिरंत सत्य हे असे, अनंतकाल टिकणार**
**सृष्टि विलय होई तो, ठायी ठायी भेटणार**

**कुठे असो भूमंडली सागरी भूमीवरी**
**येशू राहतो जिथे, स्वर्ग तिथे अवतरी**
**येशुची सक्षमता, स्वर्गची, ना अन्य कांही**
**अंतरात घे तया वेळ अजून गेली नाही**

स्वर्गाच्या ह्या झलकीविषयीच पौल आमच्या शास्त्रभागात बोलत आहे. "म्हणून आपण विश्वासाने नीतिमान ठरविलेले आहो म्हणून आपणाला आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताच्याद्वारे देवाबरोबर शांती आहे. आपण ज्या कृपेमध्ये आहो, त्यात आपला प्रवेशही त्याच्याद्वारे विश्वासाने झाला आहे आणि आपण देवाच्या गौरवाच्या आशेचा अभिमान बाळगतो. इतकेच नाही, तर संकटांचाही अभिमान बाळगतो, कारण आपल्याला ठाऊक आहे की, संकटाने धीर, धीराने शील व शीलाने आशा निर्माण होते आणि आशा लाजवीत नाही, कारण आपणाला दिलेल्या पवित्र आत्म्याच्याद्वारे आपल्या अंतःकरणात देवाच्या प्रीतीचा वर्षाव झाला आहे" (रोम 5 : 1 - 5).

**पवित्र आत्मा ख्रिस्ताच्या विजयाची साक्ष देतो**

आमच्याठायी वस्ती करून असलेला पवित्र आत्मा ही अनुभवण्याची गोष्ट आहे, हा अनुभव ख्रिस्ताच्या सध्याच्या स्वर्गीय राज्याविषयी आणि भविष्यात गौरवाने येण्याविषयी **अंतरंगात साक्ष** देतो. यावर विचार करा. आमच्यामध्ये राहणारा पवित्र आत्मा आमच्या अंतरंगाची खातरजमा करतो ती अशी की, ख्रिस्ताचे मरण आणि पुनरुत्थानाने आमच्या-वतीने सर्पाचे डोके ठेचले गेले आणि आमचे तारण निश्चित झाले. "ह्या जगाच्या अधिपतीचा न्याय झाला आहे." (योहान 16 : 11). सैतान हा पराभूत झालेला शत्रू आहे.

देवाच्या देह धारण केलेल्या पुत्राने आपल्या वधस्तंभावर सैतानाला पदच्युत केले, पापाचा नाश केला आणि मरणाची सत्ता मोडून काढली. तो **विजयी ख्रिस्त** आहे ! सैतानाची शेपटी अद्याप वळवळ करून गोंधळ माजवत आहे (आरंभीचे प्रधान प्रवचक म्हणतात त्याप्रमाणे), असे असले तरी त्याचा शेवट नक्की आहे !" जगाचे राज्य आमच्या प्रभूचे व ख्रिस्ताचे झाले आहे आणि तो युगानुयुग राज्य करील" (प्रकटी. 11 : 15).

**पवित्र आत्मा आमच्या अंतःकरणात वस्ती करतो त्यामुळे ख्रिस्ताने दुष्टपणावर मिळवलेला विजय आमचा सैतान, पाप आणि मरण यावर आत्ता मिळवलेला विजय होतो, यातून आम्हांला अमरत्व आणि सार्वकालिक जीवनाची खात्री मिळते !**

समजा, एके दिवशी एखादा उपग्रह आपल्या ग्रहावर येऊन आदळला तर ? शास्त्रवचन सांगते " न हालविता येणारे राज्य" आपल्याला मिळाले आहे" (इब्री 12 : 28). येशूने उत्तर दिले, "माझे राज्य ह्या जगाचे नाही" (योहान 18 :36). "ती आशा आपल्याला जिवाचा नांगर असून स्थिर व अढळ पडद्याच्या आतल्या भागी पोहोचणारी आहे. तेथे मलकीसदेकाच्या संप्रदायाप्रमाणे युगानुयुगीचा प्रमुख याजक झालेला येशू अग्रगामी असा आपल्याकरिता आत गेला आहे" (इब्री. 6 : 19-20). "परंतु सर्व काही त्याच्या अधीन ठेविले आहे, असे अजून आपल्या दृष्टीस पडत नाही खरे. देवाच्या कृपेने प्रत्येकाकरिता मरणाचा अनुभव घ्यावा म्हणून ज्याला देवदूतांपेक्षा किंचित्काल कमी केले होते, तो येशू मरण सोसल्यामुळे गौरव व थोरवी ह्यांनी मुकुटमंडित केलेला असा आपण पाहतो" (इब्री 2 : 8-9).

## पवित्र आत्म्यामध्ये ख्रिस्ताचा विजय आमचा होतो

ह्या सगळ्याचा सारांश पौल सांगतो, "**आशा लाजवीत नाही. कारण, आपणाला दिलेल्या पवित्र आत्म्याच्याद्वारे आपल्या अंतःकरणात देवाच्या प्रीतीचा वर्षाव झाला आहे.**" पवित्र आत्मा आमच्या अंतःकरणात वस्ती करतो. त्यामुळे ख्रिस्ताने दुष्टपणावर मिळवलेला विजय आमचा सैतान, पाप आणि मरण यावर आता मिळवलेला विजय होतो, यातून आम्हांला अमरत्व आणि सार्वकालिक जीवनाची खात्री मिळते !

देवाच्या कृपेने आणि पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने आम्ही सैतान आणि सैतानाच्या शक्तीवर "विजय मिळवलेला" आहे, "कारण जगात जो आहे त्याच्यापेक्षा तुम्हांत जो आहे तो मोठा आहे" (1 योहान 4 : 4) ! देवाने ख्रिस्ताच्याठायी "देहामध्ये पापाला दंडाज्ञा ठरविली" म्हणून मी साक्ष देतो, "ख्रिस्त येशूमधील जीवनाच्या आत्म्याचा जो नियम त्याने मला पाप व मरण ह्यांच्या नियमापासून मुक्त केले आहे" (रोम 8 : 3,2) आणि जेव्हा देवाची प्रीती आमच्या ठायी परिपूर्ण होते तेव्हा "न्यायाच्या दिवसासंबंधाने आपल्याठायी धैर्य असावे म्हणून त्याची प्रीती आपल्यामध्ये अशा प्रकारे पूर्णत्व पावली आहे; कारण जसा तो आहे तसे ह्या जगात आपणही आहो. प्रीतीच्याठायी भीती नसते; इतकेच नव्हे, तर पूर्ण प्रीती भीती घालवून देते" (1 करिंथ 15 : 57).

**"स्वर्गाचे दार अगोदरच आमच्या अंतःकरणात उघडले आहे"**

इब्री लोकांस पत्रात आम्हांला सांगितले आहे की, पवित्र आत्म्यामध्ये आम्ही ".... येणाऱ्या युगाच्या सामर्थ्याची रुची घेतली आहे" (6 : 4 - 5). हे गौरवी सत्य चार्ल्स वेस्ली ह्यांनी काव्यमय स्वरूपात मांडले आहे.

**धन्यवादीत आशा**

अहा, किती धन्य आमुची आशा
भूवरीच स्वर्गसुखाची
रुची दिली प्रभू परमेशा
ही आशा इतुकी छान
भूवरीच दिधली अनुभूती
किती स्वर्ग असेल महान
स्व-खिस्तठायी झोकता
पात्र भरभरून वाहते
पुनरुत्थानाची सय येते
गौरवी समक्षता त्याची
स्वर्ग अनुभवा देते
दिव्यत्वाचे मग येई भरते

एक लहान मुलगा पतंग उडवत होता. पतंग आकाशात इतका उंच गेला होता, की तो डोळ्यांना दिसत नव्हता. हा मुलगा न दिसणाऱ्या पतंगाची दोरी हातात घेऊन उभा असलेला एका माणसाने पाहिला. त्याने विचारले, "तू काय करीत आहेस ?" "माझा पतंग उडवत आहे." "पतंग वर तिथे आहे हे तुला कसे काय समजते ? तो तुला दिसत तर नाही." त्या मुलाने उत्तर दिले, "नाही, तो मला दिसत तर नाही; पण तो वर आहे हे मला माहित आहे, कारण मला त्याची ओढ जाणवते आहे." आमच्या अंतःकरणात दैवी प्रीतीचा महापूर आणणारा पवित्र आत्मा ही स्वर्गीय ओढ असून त्यातून आम्हांला आमच्या अंतिम तारणाची खात्री मिळते. "आशा लाजवीत नाही, कारण आपणाला दिलेल्या पवित्र आत्म्याच्याद्वारे आपल्या अंतःकरणात देवाच्या प्रीतीचा वर्षाव झाला आहे !"

"देवाचे गूढ ज्ञान आम्ही सांगतो", पौल 1 करिंथमध्ये लिहितो, "हे तर ह्या शास्त्रलेखाप्रमाणे आहे :

**'डोळ्याने जे पाहिले नाही, कानाने जे ऐकले नाही,**
**व माणसाच्या मनात जे आले नाही ते आपणावर**
**प्रीती करणाऱ्यांसाठी देवाने सिद्ध केले आहे.'**

"कारण देवाने ते आत्म्याच्याद्वारे आपल्याला प्रगट केले आहे" (1 करिंथ 2 : 7, 9 - 10) ! **आमेन !**

**तुमच्या आध्यात्मिक वाटचालीसाठी प्रकाशशलाका / मार्गदर्शन**

**मुख्य आधारस्तंभ**

प्रस्तुत प्रकरणाची रचना काही महत्त्वपूर्ण मुद्द्यांच्याभोवती केलेली आहे. हे महत्त्वपूर्ण मुद्दे पुढे दिले आहेत. यातील प्रत्येक मुद्द्याचे मध्यवर्ती कार्य आणि शास्त्रलेखातील आधार याची उजळणी करा.

**प्रीती**

**पवित्रपणा**

**सेवा**

**आशा**

**स्वर्ग**

**आध्यात्मिक पायऱ्या**

**1. पूल बांधणे**

प्रत्येक शिक्षक, वक्ता आणि प्रचारकाने त्यांच्या त्यांच्या शिकवणुकीतील तत्त्वे, मते आणि कल्पना यांचा विद्यार्थ्यांच्या किंवा श्रोत्यांच्या दररोजच्या जीवनापर्यंत एक पूल बांधला पाहिजे. शिकवणाऱ्याची तत्वे, सिद्धांत व कल्पना ह्यांची त्याने श्रोत्यांच्या दैनंदिन जीवनाशी सांगड घातली पाहिजे. ती त्यांची जबाबदारी आहे. केव्हा केव्हा ही सांगड प्राचीन काळाला आधुनिक काळाशी जोडणारी असते किंवा संक्षेपाची सांगड प्रत्यक्षातील गोष्टीशी घातली जाते. कधी कधी सिद्धांत व प्रत्यक्ष कृती अथवा सर्वसाधारण गोष्ट व निश्चित गोष्ट किंवा नकारात्मक व सकारात्मक गोष्ट यांची सांगड घालण्याची जबाबदारी आमची असते. पुलाच्या खांबांवर असणाऱ्या कोनशिलेच्या शिळांचा विचार करा. एक किंवा अनेक खांब आणि तुमचे स्वतःचे व्यक्तिगत जीवन यांच्यामध्ये एक पूल बांधा. हा पूल कदाचित तुमच्या जीवनातील पुढे दिलेल्या मुद्द्यांशी सांगड घालेल :

शारीरिक अस्तित्व

कौटुंबिक जीवन

सामाजिक जीवन

व्यावहारिक जीवन

आध्यात्मिक जीवन

देव, मंडळी, इतर लोक यांची सेवा.

**2. मननासाठी**

**रूपांतर :**

"हे देवाच्या पुत्रा, माझ्याकरिता अद्‌भुत चमत्कार कर आणि माझे अंतःकरण बदलून टाक ; माझ्यातील दुष्टपणा बदलून टाकणे यापेक्षा तू माझी खंडणी भरून सुटका करण्यासाठी देहधारण केले हे अधिक अवघड आहे."

**- प्राचीन आयरिश प्रार्थना, 1448**

**ख्रिस्ती सेवा :**

"मी समुद्रातील बेट व्हावे, जमिनीवरील टेकडी मी व्हावे, चंद्र अस्तास जाईल तेव्हा मी लुकलुकणारा तारा व्हावे, दुर्बलाच्या हातातील आधाराची काठी मी व्हावे."

**- प्राचीन स्कॉटिश म्हण**

**आशा :**

"तुम्हांविषयी माझ्या मनात जे संकल्प आहेत ते मी जाणतो... ते तुम्हांस तुमच्या भावी सुस्थितीची आशा देणारे आहेत."

यिर्मया 29 : 11

**उपयोगात आणावयाची साधने**

## इतरांना सांगा

आता, हे संपूर्ण पुस्तक तुमचे वाचून झाले आहे. प्रार्थनापूर्वक तुम्ही यावर काम-कृती केली आहे. त्यामुळे सदर पुस्तकाचा अन्य कोणासाठी एक साधन म्हणून तुम्हांला आता उपयोग करता येईल. इतरांना सांगा. तुम्ही पूर्ण केलेला हा अभ्यासक्रम आणखी कोणाला तरी उपयुक्त आहे, त्यामुळे त्याचा फायदा होणार आहे असे तुम्हांला वाटले तर सदर पुस्तक त्याला बक्षिस म्हणून किंवा वापरण्यासाठी द्या.

सदर पुस्तक तुम्ही ज्या व्यक्तीला देणार त्याच्याकरिता एखादे टिपण वा पत्र लिहा. यामध्ये शाबासकीचे दोन शब्द लिहा. चांगले स्वभाववैशिष्ट्य, एखादे उत्तम उदाहरण किंवा तुम्हांला वा इतरांना उपयुक्त ठरलेली कृती यांचा उल्लेख करा. तसेच प्रस्तुत पुस्तकाचा तुम्हांला कसा उपयोग झाला त्याचा थोडक्यात सारांश लिहा. याशिवाय, पुस्तकाविषयी चर्चा करण्यासाठी, त्यातील मुद्दे, आव्हाने आणि निष्कर्ष यावर ऊहापोह करण्यासाठी आपण एकत्र भेटू असेही सुचवा.

# Notes

## Foreword

1. William M. Greathouse, "Before I Go Let Me Say . . . ," Herald of Holiness. July 1989, 6.

2. Ibid., 7.

## Chapter 1

1. George Croft Cell, *The Rediscovery of John Wesley* (New York : Henry Holt and Co., 1935), 359.

2. Adam Clarke, *Christian Theology*, ed. Samuel Dunn (New York : T. Mason and G. Lane, 1840), 183.

3. Richard P. Heitzenrater, *Wesley and the People Called Methodists* (Nashville : Abingdon Press, 1995), 121.

4. John Wesley, "The Circumcision of the Heart," in *Wesley's Standard Sermons,* ed. Edward H. Sugden (London: Epworth Press, 1921), 1 : 267.

5. *The Letters of the Rev. John Wesley,* ed. John Telford (London: Ep-worth Press, 1931), 5:322.

6. John Wesley, *A Plain Account of Christian Perfection* (Kansas City : Beacon Hill Press of Kansas City, 1966), 83.

7. Ibid., 54.

8. Ibid., 83.

9. Letters. 4:208,

10. Wesley, A Plain Account, 82.

11. Ibid ., 82-83.

12. *John Wesley's Sunday Service of the Methodists in North America* (Nashville : The United Methodist Publishing House and the United Methodist Board of Higher Education and Ministry, 1984), 125.

## Chapter 2

1. Norman H. Snaith, *The Distinctive ideas of the Old Testament* (London : Epworth Press, 1960), 21.

2. A term coined by Rudolf Otto, *The Idea of the Holy: An Inquiry into the Non-rational factor in the idea of the Divine and Its Relation to the Rational,* trans. John W. Harvey, 2nd ed. (London: Oxford University Press, 1950)

3. Snaith, *Distinctive Ideas*, 30.

4. Ibid.

5. Donald E. Demaray, ed., *The Daily Wesley,* trans. Paul Gerhardt (Anderson, Ind.: Bristol House, 1994), 95.

6. Ibid.,48.

7. George Allen Turner, *The Vision Which Transforms* (Kansas City : Beacon Hill Press, 1964), 17.

8. Theodorus C. Vriezen, *An Outline of Old Testament Theology* (Newton, Mass : Charles T. Bradford Co., 1958).

9. John W. Harvey, preface to Otto, *The Idea of the Holy,* xviii.

**Chapter 3**

1. Statement of the National Conference of Catholic Bishops, 1975;cited by Walter Harrelson and Randall M. Falk, *Jews and Christians : A Troubled Family* (Nashville: Abingdon Press, 1991), 14.

2. George Alien Turner, *The More Excellent Way* (Winona Lake, Ind. : Light and Life Press, 1952), 31.

3. Colin W. Williams, *John Wesley's Theology Today* (London : Ep-worth Press, 1960), 179.

4. Albert Outler, *John Wesley* (New York: Oxford University Press, 1964), 157-58.

5. Richard J. Foster, *Freedom of Simplicity* (San Francisco: Harper and Row Publishers, 1981), 36.

6. John Wesley, "On a Single Eye," Sermon 118 in *The Works of John Wesley,* ed. Thomas Jackson, 3rd ed. (reprint, Kansas City: Beacon Hill Press of Kansas City, 1979), 7:297.

7. Seren Kierkegaard, *Purity of Heart Is to Will One Thing* (New York : Harper and Brothers, 1956), 72.

8. Stephen Green, in *Biblical Resources for Holiness Preaching : From Text to Sermon*, ed. H. Ray Dunning and Neil B. Wiseman (Kansas City: Beacon Hill Press of Kansas City, 1990), 105.

9. See Luke 1:6; I Cor. 1:8; Eph. 1:4; 5:27 (NASB); Phil. 2:15; Col. 1:22-23; I Thess. 5:23; 2 Pet. 3:14 (KJV).

10. *Theological Dictionary of the Bible*, ed. Gerhard Kittel and Gerhard Friedrich (Grand Rapids: William B. Eerdmans Publishing Co., 1972), 8:73-77.

11. William Barclay, *The Letters to the Galatians and Ephesians, in The Daily Study Bible* (Philadelphia: Westminster Press, 1977), 78-79.

12. Turner, The Vision Which Transforms, 45.

13. Ibid., 46.

**Chapter 4**

1. Wallace Hamilton, Who Goes There? (West-wood, N.J.: Fleming H. Revell Co., 1958), 36-37.

2. Wesley, "The Scripture Way of Salvation," in *Wesley's Standard Sermons*. 2:448,457.

3. Gerhard Ebeling, *Luther: An introduction to His Thought* (Philadelphia: Fortress Press, 1972), 110-11.

4. *Works of Martin Luther*, translated with introductions and notes (Philadelphia: Muhlenberg Press, 1932), 6:451.

5. Wesley, "The Circumcision of the Heart," 1:267.

6. *John Wesley's Sunday Service of the Methodists in North America,* 125.

7. Wesley, "The Way to the Kingdom," Sermon 7 in Works. 5:79.

8. Wesley, "Upon Our Lord's Sermon on the Mount," Discourse 8, Sermon 28 in Works, 5:376-77.

9. Samuel Medley, "The Glorious Hope" *in Worship in Song* (Kansas City: Lillenas Publishing Co., 1972), No. 293.

**Chapter 5**

1. Irenaeus, Against the Heresies, trans. Dominic J. Unger (New York : Paulist Press, 1992), 3.14.7.
2. Ibid.
3. Gustaf Aulen, *Christus Victor*, trans. A. G. Hebert (New York: Macmillan Co., 1951); see esp. pp. 16-35.
4. C. H. Dodd, *The Epistle to the Romans, in The Moffatt New Testament Commentary* (New York: Harper and Brothers Publishers, 1932), 93.
5. John Wesley, *Explanatory Notes upon the New Testament* (London : Epworth Press, 1950), 546.
6. Wesley D. Tracy, ed., *The Redeemed Will Walk There: Sermons on the Life of Holiness* (Kansas City: Beacon Hill Press of Kansas City, 1983), 44.
7. Irenaeus, *Against the Heresies* 2.22.4.

**Chapter 6**

1. William E. Sangster, *The Pure in Heart* (New York and Nashville : Abingdon Press, 1964), 235-36. This is the thesis of the late Nazarene general superintendent R. T. Williams in his book *Temptation : A Neglected Theme* (Kansas City: Nazarene Publishing House, 1920).
2. Bill Bright, *How to Walk in the Spirit* (San Bernardino, Calif.: Campus Crusade for Christ, 1971), 47-48.
3, From a prayer of Jeremy Taylor, quoted by Bob and Michael W. Benson, *Disciplines of the Inner Life* (Waco, Tex.: Word Books, 1985), 22.

**Chapter 7**

1. John Wesley, "A Plain Account of Christian Perfection," in *Works*, 11:387.
2. J. S. Whale. *Christian Doctrine* (New York: The MacMillan Co., 1945), 53.

3. Wesley, "On Working Out Our Own Salvation," Sermon 85 in *Works*, 6:509.
4. Ibid.
5. Wesley, "On Patience," Sermon 83 in *Works*, 6:488-89.
6. P. F. Bresee, "Pentecost," in *Sermons from Matthew's Gospel* (Kansas City; Nazarene Publishing House, n.d.), 39.
7. Wesley, "On Patience," 6:489.
8. Ibid.
9. Wesley, "A Plain Account," 11:402.
10. Wesley, "On Working Out Our Own Salvation," 6:509.
11. Karl Barth, *The Epistle to the Romans* (London: Oxford University Press, 1933), 314.

**Chapter 8**

1. George Lyons, "Modeling the Holiness Ethos: A Study Based on First Thessalonians," *Wesleyan Theological Journal* 30, No. I (spring 1995): 188-89.
2. Ibid., 194.
3. Daniel Brett Spross, "Sanctification in the Thessalonian Epistles in a Canonical Context" (Ph.D. diss., Southern Baptist Theological Seminary, 1987), 21 (citing J. B. Lightfoot). The Greek verb *katartisai* and its derivatives occur in the New Testament with a wide variety of meanings. The disciples were "*mending* their nets" (Matt. 4:21; Mark 1:19; emphasis added). The fractious Corinthians were commanded to "*become perfect*" (2 Cor. 13:9, emphasis added). The NRSV rendering of *katartisai*, "*restore*" (emphasis added), violates the context; there is no evidence in the Epistle of any loss of faith on the part of the Thessalonians.
4. Suggested in private conversation by Alex R. G. Deasley.
5. Lyons, "Modeling the Holiness Ethos," 191-92.
6. The adverb translated "worthy" does not imply that moral living is a means of earning God's call to Kingdom glory.

Rather, it is "a recognition that God's call to future salvation makes certain behaviors 'appropriate' in the present. A holy God demands a holy people (cf. I Pet.1:13-16)" (Lyons, "Modeling the Holiness Ethos." 203).

7. Spross, "Sanctification in the Thessalonian Epistles," 34.

8. Ibid., 41-42.

9. Ibid., 43.

10. Lyons, "Modeling the Holiness Ethos," 192. The clearest illustration of this necessary human cooperation in order to effect sanctification is Paul's injunction in Rom. 6:12-19.

11. Spross, "Sanctification in the Thessalonian Epistles," 44, quoting Ernest Best, *A Commentary on the First and Second Epistles to the Thessalonians* (New York: Harper and Row, 1972), 242.

12. Spross, "Sanctification," 46, quoting D. E. H. Whiteley, *The Theology of St. Paul* (London: Oxford University Press, 1964), 85.

13. Leon Morris, "The First and Second Epistles to the.Thessalonians," in *The New International Commentary on the New Testament* (Grand Rapids: William B. Eerdmans Publishing Co., 1959), 180.

14. Spross, "Sanctification in the Thessalonian Epistles," 46.

15. Morris, "Thessalonians," 80. The second half of the adverb, *teleis*, derives from the root *telos*, meaning "end," "goal," "purpose." D. Edmond Hiebert explains *holoteleis*: "wholly affecting the end, reaching the intended goal, hence has here the force of no part being left untouched" (*A Call to Readiness : The Thessalonian Epistles* [Chicago: Moody Press, 1971), 251).

16. Clarke, *Christian Theology*, 183.

17. Thus, John Wesley uses "entire sanctification" and "Christian perfection" interchangeably.

18. Spross, "Sanctification in the Thessalonian Epistles," 50, quoting Gordon Pitts Wiles, "The Function of Intercessory Prayer in Paul's Apostolic Ministry with Special Reference

to the First Epistle to the Thessalonians" (Ph.D. diss., Yale University, 1965), 132.

19. Spross, "Sanctification," 51, quoting Best, *Thessalonians*, 182.

20. Wesley, "The Scripture Way of Salvation," 2:457-59.

21. Wesley, *A Plain Account,* 86.

**Chapter 9**

1. William Barclay, *The Letters of John and Jude*, rev. ed., in *Daily Study Bible Series* (Philadelphia: Westminster Press, 1976), 98.

2. Wesley, *Explanatory Notes upon the New Testament*, 915. For Wesley's classification of "babes" and "fathers," see I John 2:12-18 (Notes, 906-8).

3. Heitzenrater, *Wesley and the Methodists*, 308.

4. Barclay, *The Letters of John and Jude*, 98.

5. Robert T. Young, *A Sprig of Hope* (Nashville: Abingdon Press, 1980), 79.

**Chapter 10**

1. E. Stanley Jones, *Abundant Living* (New York: Abingdon Press, 1941), 157.

2. Francois Fenelon, *Christian Perfection*, ed, Charles F. Whiston, trans. Mildred Whitney-Stillman (New York: Harper and Brothers Publishers, 1947), 36.

3. John Wesley asks : "Is this death to sin, and renewal in love, gradual or instantaneous?" Answer: "A man may be dying for some time; yet he does not, properly speaking, die, till the soul is separated from the body; and in that instant, he lives the life of eternity. In like manner, he may be dying to sin for some time; yet he is not dead to sin, till sin is separated from his soul; and in that instant, he lives the full life of love. . . . It is often difficult to perceive the instant when a man dies; yet there is an instant in which life ceases" (*A Plain Account*, 62, 115).

4. Oswald Chambers, *My Utmost for His Highest*, ed. James Reimann (Grand Rapids: Discovery House, 1992), Dec. 3.

5. Adam Clarke, *The New Testament of our Lord and Saviour Jesus Christ* (New York: Methodist Book Concern, n.d.), 1:639.

6. George A. Buttrick, *The interpreter's Bible* (New York and Nashville: Abingdon Cokesbury Press, 1951 ), 7:266.

7. William M. Greathouse, *The Fullness of the Spirit* (Kansas City: Nazarene Publishing House, 1958). 89.

8. Stephen J. Harper, "The Devotional Life of John Wesley. 1703-1738" (Ph. D. diss., Duke University, 1981), 2:538.

9. This entire section, "How to Receive Sanctifying Grace", is extracted from Wesley D. Tracy et al., *The Upward Call : Spiritual Formation and the Holy Life* (Kansas City : Beacon Hill Press of Kansas City, 1994), 45-47.

**Chapter 11**

1. Wesley, "The Scripture Way of Salvation", 2:457-59.

2. George A. Mather and Larry A. Nichols, *Dictionary of Cults, Sects, Religious and the Occult* (Grand Rapids : Zondervan Publishing House, 1993), 120.

3. Stephen M. Miller, ed., *Misguiding Lights ?* (Kansas City : Beacon Hill Press of Kansas City, 1991), 61.

**Chapter 12**

1. Bonnie Bowman Thurston, "Matthew 5:43-48", *Interpretation* 41 (April 1887): 173.

2. Wesley, *A Plain Account*, 99.

3. John Wesley, "The Way of the Kingdom", in *John Wesley's Sermons : An Anthology*, ed. Albert C. Outler and Richard P. Heitzenrater (Nashville : Abingdon Press, 1991), 127.